178 C NO-3745

वारकरी संजीवन
अर्थात्
आध्यात्मिक जीवन

Q:69
155H9

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q:69 3745
155H9
Panduranga.
Adhyatmik jivan

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

Q169
155H9

P. G. Gundhakar Swami
3745 Math Sanstan
Barsi

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ॐ

॥ श्रीविठ्ठल प्रसन्न ॥

" संख्यारहित जीवना । असंख्य जीवपाळणा ।
नमो तुज संजीवना । पुंडलिकधना पांडुरंगा ॥

ज्ञा. म. कृत नमनस्तोत्र.

वारकरी संजीवन

अर्थात्

आध्यात्मिक जीवन

प्रकाशक

ह. भ. श्री. फुलचंद गोवर्धनदास खडलोया (सोलापूर)

भूमिका लेखक व संपादक

ह. भ. प. श्रीकृष्णदास लोहिया महाराज
श्रीकृष्णदास निवास, पंढरपूर.

शके १८७१] आवृत्ति पहिली [सन १९४९

५०००

विजयादशमी

किंमत १। रुपया.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मुद्रकः—
गोविंद यशवंत गुणे
चिंतामणी प्रेस, कोल्हापूर.

9:69
155H9

प्रकाशकः—श्रीयुत ह. भ. फुलचंद गोवर्धनदास खडलोया
सोलापूरकर यांनीं श्रीकृष्णदास निवास, घ. नं. ३२२७
विजापूरगल्ली, श्रीक्षेत्र पंढरपूर येथें प्रसिद्ध केलें.

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDIR
LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. ......3745......

संपादकः—
श्री. ह. भ. प. श्रीकृष्णदास लोहिया महाराज,
श्रीकृष्णदास निवास, पंढरपूर.

(संपादकांनीं सर्व हक्क आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.)
CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

समर्पणपत्रिका

ज्या श्रीहरिच्या कृपाप्रसादानें आम्हास परमदयालु
ब्रह्मविद्वरिष्ठ
ह. भ. प. श्रीबंकटस्वामीमहाराज
हे श्रीगुरु लाभले असून
श्रीसंतमुकुटमणि योगिराज श्रीज्ञानेश्वर माऊलींच्या
चरणीं श्रद्धापूर्वक अनुराग उदित झाला त्या
भक्तवत्सल श्रीरुक्मिणीप्राणसंजीवन

★ सच्चिदानंदघन प्रभु श्रीपांडुरंग ★

चरणीं
ही वारकरी संजीवनाची अल्पकृति परमादरानें
व कृतज्ञतेनें नम्रतापूर्वक समर्पण करितों.

संतचरणरज
श्रीकृष्णदास लोहिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

" उगवलें विंब अद्वैत स्वयंभ । नाम हें सुलभ—
विठ्ठलराज " ॥ १ ॥ नि. नाथ



" रुक्मिणीरमण दयाघन, अघनाशन प्रभु उभा कसा ठेला
पुंडलिकें जन तरण्या कटिकर ठेवूनि उभा असा केला ॥ १ ॥
श्रीपुंडलीकवरदा, दासासुखदा भवाब्धि तरण्याला
शरणागत आम्ही झालों भक्तिसुखाचा आनंद लुटण्याला ॥ २ ॥

—श्रीकृष्णदास लोहिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रकाशकाचे दोन शब्द

परमदयाघन कृपानिधि भक्तकामकल्पद्रुम श्रीपांडुरंगकृपेनें "वारकरी संजीवन अर्थात् आध्यात्मिक जीवन" हा ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचा सुयोग या दासास प्राप्त झाला याबद्दल त्या दयाघन प्रभूचे कृतज्ञतापूर्वक उपकार स्मरून दोन शब्द लिहिण्याचें साहस करीत आहे. भाविक जनतेच्या पूजापाठांतून नित्य नियमासाठीं ह. भ. प. पूज्य श्रीकृष्णदासजी लोहिया महाराज यांनीं पूर्वींचेच प्रसिद्ध असलेले साधुसंतांचे कांहीं ग्रंथ व निवडक स्तोत्रें, विष्णुसहस्रनाम, भगवद्गीता वगैरे ग्रंथ एकत्रित करून नित्योपयोगी अशा 'वारकरी संजीवन अर्थात् आध्यात्मिक जीवन' या ग्रंथाची रचना करून मुमुक्षु जनहितार्थ त्याचें प्रकाशन करून प्रसिद्ध करण्याची या दासास आज्ञा केल्यामुळें मला हा सेवेचा सुयोग प्राप्त करून दिल्याबद्दल हा दास त्यांचा कृतज्ञतापूर्वक आभारी आहे. आमच्यासारख्या सांसारिक व्यापानें वेढलेल्या लोकांना महाभारत, रामायण, भागवतादि विस्तीर्ण ग्रंथ वाचण्यास, श्रवण करण्यास व विचार करण्यास सवड मिळणें शक्य नसल्यामुळें थोडा वेळ मिळेल तेवढ्यांत साधुसंतांचें मनोगत कळण्यास या संजीवनांतील प्राकृत व संस्कृत भागांतील 'चांगदेवपासष्टि' व 'अनुभवामृत', 'चिरंजीवपद', 'भगवद्गीतादि' आध्यात्मिक ग्रंथांचा विचार श्रीगुरूंच्या साहाय्यानें केल्यास व प्रतिदिवशीं 'श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत नमनस्तोत्र', 'हरिपाठ', 'विष्णुसहस्रनामादि' निवडक स्तोत्रें नित्य नियमानें म्हटल्यास त्याचें जीवन आध्यात्मिक बनून तो निजात्मसुखाला प्राप्त होऊन श्रीपांडुरंगचरणकमलाच्या भक्तीचा स्वाद त्यास अखंड भोगण्यास मिळेल यांत शंका नाहीं.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

या वारकरी संजीवन ग्रंथांत जें श्रीपांडुरंगाचें खास छायाचित्र देण्यांत आलें आहे त्याचा ब्लॉक श्री. ह. भ. प. पूज्य श्रीकृष्णदासजीमहाराज यांचे व आमचे बडवे श्रीमंत नरहर वासुदेव यांनीं समस्त बडवे मंडळाच्या संमतीनें तयार करून आम्हांस दिला याबद्दल समस्त बडवे मंडळाचें व आमचे बडवे श्रीमंत नरहर वासुदेव ऊर्फ काकासाहेबांचें आम्ही आभारी आहोंत.

कोल्हापूर येथील चिंतामणी प्रेसचे व्यवस्थापक व कार्यकारी मंडळीनें या ग्रंथाच्या छपाईचें काम उत्तम, सुवाच्य व वेळेवर करून दिल्याबद्दल त्यांचे व ह. भ. प. रामभाऊ यादव व श्रीयुत पराडकर यांनीं प्रुफें वगैरे तपासण्याचें कामीं सहाय्य केल्याबद्दल त्यांचे आम्ही आभारी आहोंत.

शेवटीं हा 'वारकरी संजीवन ग्रंथ' मनुष्यमात्रांचें जीवन बनून लोक वैदिकमार्गानुसार धर्मतत्पर होत्साते भक्तिसुखाचा आनंद घेवोत अशी श्रीपांडुरंगचरणीं प्रार्थना करून हे प्रस्तावनारूपी दोन शब्द पुरे करतो.

श्रीक्षेत्र पंढरपूर, आश्विन शु॥ १० (विजयादशमी) शके १८७१	श्रीपांडुरंगदासानुदास, **फुलचंद गोवर्धनदास** **खडलोया** (सोलापूर).

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ श्री ॥

" वारकरी संजीवन अर्थात् आध्यात्मिक जीवनाची "

भूमिका

श्रीरुक्मिणीपांडुरंग प्रसन्न

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनं ।
देवकीपरमानंदं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥

जी वस्तु आपणास ज्या कामासाठीं एखाद्यापासून मिळाली त्याच कामासाठीं आपण त्या वस्तूचा उपयोग केला पाहिजे. जर त्या वस्तूचा उपयोग आपण फालतु कामांत केला तर ज्याच्यापासून ती वस्तू ज्या करारानें ज्या कामासाठीं आणली व त्या कामांत वापरली नाहीं तर आपण वस्तु देणाराचे गुन्हेगार ठरतो. उदाहरणार्थः—आपणांस शेतीखात्यांत बागाइताकरतां विहिरींतून पाणी काढण्यासाठीं ऑइल एंजिन कंट्रोल भावानें मिळावें म्हणून आपण सरकारच्या शेती (Agricultured) खात्याकडे अर्ज केला व त्याप्रमाणें विहिरीवर बसवण्याकरितां आपणास एंजिन मिळालें. परंतु आपण त्या एंजिनचा उपयोग शेतीकडे न करतां गांवांत फाउंडेशन करून पिठाचे गिरणीसाठीं केला तर आपण जसे सरकारचे गुन्हेगार ठरतों, या दृष्टांताप्रमाणें आपणांस हें मनुष्यशरीर प्राप्त झालें आहे अथवा दिलें आहे. तें देणारानें ज्या कार्यासाठीं ज्या करारानें दिलें त्याच कार्यासाठीं त्याचा उपयोग आपण केला नाहीं तर आपणास ज्यानें देह दिला त्याचे आपण गुन्हेगार ठरूं. हा मनुष्यदेह " देवे दिला देह भजना गोमटा. " कोणीं दिला म्हणाल तर " देवे दिला " असें तुकाराममहाराज म्हणतात. कशाकरितां दिला तें कारणही ठिकठिकाणीं सुचवितात. " भजनासाठीं दिला " अथवा " दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मुख बोलाया वचन। जेणें तूं जोडशी नारायण। नासे जीवपण भवरोग ॥१॥"

अनिष्टनिवृत्ति व इष्टप्राप्तीसाठीं दिला. ही अनिष्ट निवृत्ति म्हणजे काय? व इष्टप्राप्ति म्हणजे काय? याचा विचार पुढें करूं. तूर्त एव-ढेंच सांगावयाचें कीं, हा मनुष्यदेह स्वर्गांतील देवादिकांना देखील दुर्लभ आहे. "इहलोकीचा हा देह। देव इच्छिताती पाहे ॥१॥" कुठले देव म्हणाल तर भागवतकार म्हणतात, "स्वर्गिणोऽप्येतमिच्छन्ति लोकं निर-यिणस्तथा" ॥ भा. अ. २०।१२ "ज्यांसी स्वर्गभोगाची थोर जोडी। जींहिं अमरत्वाची उभविली गुढी। जे पडले स्वर्गाचे चांदवडी। ते वांछिती आवडी नरदेहातें ॥१२५॥" "स्वर्गींचे अमर इच्छिताती देवा। मृत्युलोकीं व्हावा जन्म आम्हां ॥१॥" असा देवादिकांना दुर्लभ असणारा मनुष्यदेह प्राप्त झाला ही महद्भाग्याची गोष्ट होय. सहजासहजीं ही गोष्ट घडणें शक्य नाहीं. "पावलो हा देह काकतालीन्यायें। न घडे उपाये घडो आले ॥१॥" अघडती गोष्ट घडून आली. कारण "दुर्लभो मानुषो देहो" साधुसंतांनीं मनुष्यदेहाचें दुर्लभत्व जागजागीं वर्णन केलें आहे. "नरदेह दुर्लभ जाणा रे तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा." असा दुर्लभ मनुष्यदेह प्राप्त होऊन त्याचा विनियोग आपण फालतु कामाकडे करतों. 'विषयओढीं भुलले जीव। आतां यांची कोण करील कींव। नुपजे नारायणीं भाव। पावोनी ठाव नरदेह ॥ १ ॥' भगवान देखील पश्चात्तापाचे उद्गार काढतात कीं, "पाहे पां शरिराचिया गांवा। जयालागीं आले पांडवा। तो कार्यार्थ आघवा। सांडूनिया ॥ १०५ ॥ इंद्रियग्रामींचें राजबिदीं। अहंममतेचिया जल्पवादी। विकारांतरांची मांदी। मेळविताती ॥ १०६ ॥ ज्ञा. अ. ७"

भगवान् म्हणतात, अर्जुना, पहा, ज्या कामाकरतां या शरीररूपी गांवाला तें आले तो कार्यभाग सर्व सोडून देऊन इंद्रियरूपी गांवाच्या राजरस्त्यावर मी माझेपणाचे बडबडीनें नानाप्रकारच्या विकारांचे समुदाय ते मिळवितात.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रमाण–'देवधर्म सांदी पडले सकळ । **विषयीं गोंधळ गाजतसे.**' मनुष्यमात्रांना स्वकर्तव्याचा विसर पडून ते विषयार्जनांत शरीराचा विनियोग करतात. अर्थात् मीं वर लिहिल्याप्रमाणें "जी वस्तु आपणांस ज्या कामासाठीं मिळाली ती वस्तु त्याच कामाकरतां न वापरली तर तो जसा गुन्हा ठरतो तसें हा नरदेह ज्या कामाकरितां प्रभूंनीं अदृष्टवशात् दिला त्याचा उपयोग ज्यांनीं ज्यांनीं त्या कामाकडे केला नाहीं ते ईश्वराचे गुन्हेगार ठरून यमाच्या शिक्षेला पात्र होतात. " नरके पच्यमानश्च यमेन परिभाषितः । किं त्वया नार्चितो देवः केशवः क्लेशनाशनः ॥ १ ॥ " " जे नाहीं भजले एका भावें हरी । तया दंड करी यमधर्म ॥ १ ॥ यमधर्म म्हणे तया दोषियासी । कां रे केशवासी चुकलेती ॥ २ ॥ चुकले ती कथा पुराण–श्रवण । होते तुम्हां कान डोळे मुख ॥३॥ " याचें कारण प्रायः लोकांना ही गोष्ट माहीत नाहीं कीं, हा देह कोणीं दिला ? व कशासाठीं दिला ? म्हणून ते त्याचा उपयोग भगवद्भजनाकडे न केल्यामुळें दुःखयातनेस पात्र होतात. एवढ्याकरितां या दोन गोष्टींचा आपण विचार करूं.

(१) मनुष्यदेह

पहिला प्रश्न हा आहे कीं, नरदेह कोणीं दिला ?— कित्येकांचे मतें शुक्रशोणिताचें मिश्रण झालें कीं, हा देह तयार होतो. यालाच स्वभाववाद असें म्हणतात. भगवंतांनीं सोळाव्या अध्यायांत असुरी संपत्तीच्या वर्णनप्रसंगीं या नास्तिकमताचा उल्लेख करतांना असें म्हटलें आहे कीं,

> **असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ।**
> **अपरस्परसंभूतं किमन्यत् कामहैतुकम् ॥ ८ ॥ १६ अ.**

ते असुरी संपत्तीचे लोक हें जग असत्य व धर्माधर्मव्यवस्थितीरहित आणि ईश्वररहित आहे. तें कामहेतुक व स्त्रीपुरुषाच्या परस्पर संयोगानें उत्पन्न होणारें आहे, असें म्हणतात. जो कांहीं सृष्टीचा व्यवहार चालतो तो सहजच निसर्गानें चालत आहे. त्याला कोणी चेतनकर्ता ईश्वर वगैरे मानण्याची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आवश्यकता नाहीं. शास्त्रमर्यादा, विधिनिषेध, धर्माधर्म, स्वर्ग, नरक, पापपुण्यादिकांचा त्यांच्या मतांत अत्यंताभाव आहे. "म्हणोनी देवो गोसावी। तो धर्माधर्म भोगवी। आणि परत्राच्या गांवीं। करी तो भोगी ॥ ३०६ ॥ परी परत्र ना देवो। न दिसे म्हणोनी ते वावो। आणि कर्ता निमे मा ठावो। भोग्याशी कवणु ॥ १०७ ॥ म्हणोनी नरक स्वर्गु। नव्हे पापपुण्य भागु। जें दोहीं ठायीं सुखभोगु। कामाचाचि तो ॥ ३०९ ॥ याकारणें कामें। स्त्रीपुरुष-युग्में। मिळती तेथ जन्मे। आघवें जग ॥३१०॥" ते म्हणतात कीं, स्त्री व पुरुषांची जोडपी जेथें कामोपभोगाच्या इच्छेनें एकत्र होतात तेथें हें जग उत्पन्न होतें. अर्थात् सृष्टीच्या बुडाशीं जर कोणी चेतनकर्ता नाहीं तर या देहाचा कर्ता कोणी असेल व त्यानें हा देह दिला म्हणून त्याचे उपकार मानण्याची आवश्यकताच नाहीं. आज जगांत हाच वाद (हेंच मत) विशेषत्वानें थैमान घालत आहे. (बोकाळला आहे) देहापलीकडे कोणी उपास्य देवता म्हणून यांना मान्य नाहीं. म्हणून केवळ देहाचीच उपासना करण्यांत यांचें सर्व आयुष्य खर्ची पडतें. पण या लोकांच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहीं कीं, या देहाला आपण इतकें जपतां जपतां किंवा व्यवस्था ठेवतां ठेवतां हें शरीर पडलें कसें? यांतील हालचाल कां बंद पडली? देह तर जडमूढ पडला असून यांतील जीवात्मा कुठें गेला? कोणत्या तत्त्वानें हें शरीर चलनवलन करीत होतें, या सर्व प्रश्नांचें उत्तर द्यावें लागेल कीं, 'येनेक्षते शृणोतीदं जिघ्रति व्याकरोतिच। स्वाद्वस्वादू विजानाति तत्प्रज्ञानमुदीरितम् ॥ (पंचदशी ५-१)' श्रीविद्यारण्यस्वामींनीं या शरीराचें चलनवलनादि खानपानादि व्यवहार चैतन्यसत्तेनें होतात असें प्रतिपादिलें आहे. तें चेतनरहित शरीर म्हणजे शव-प्रेत झालेलें आपण पाहतों. अर्थात् 'चाले हें शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविते हरिविण ॥ १ ॥ देखवी ऐकवी एक नारायण। तयाचें भजन चुको नका ॥ २ ॥ तु. म.' त्या चैतन्याला शास्त्रांतून 'प्रज्ञानं ब्रह्म' असें म्हटलें असून भक्तिसांप्रदायांतून देव, हरि, नारायण असें म्हणतात. या स्वभाववादी लोकांना ईश्वरानें एवढीशी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

साधारण बुद्धि दिली नाहीं कीं, एखाद्या गांवाला पाटील वगैरे कोणी कर्ता नसला तर त्या गांवचा व्यवहार सुव्यस्थित चालत नाहीं. जिल्ह्याचा अधिकारी नसला तर त्या जिल्ह्यांत सुव्यवस्था राहात नाहीं. देशाचा राजा राज्यासिंहासनावर नसला तर चोहोंकडे बेबंदशाही (बंडाळी) माजतें. मग या सृष्टीच्या बुडाशीं जर कोणी चेतनकर्ता नसेल तर ही सृष्टि सुव्यवस्थित कशी चालेल ? वेळच्यावेळीं सूर्यानें उगवावें, वाऱ्यानें क्षणभरसुद्धां स्वस्थ राहूं नये, अग्नीनें जाळावें, मेघानें वर्षाव करावा, डोंगरानें आपलें आसन सोडूं नये, समुद्रानें आपली मर्यादा उल्लंघन करूं नये, (जर दहावीस मैल मर्यादा सोडून समुद्र अलीकडे आला तर मुंबई, मद्रास, कराची या शहरांचें काय होईल कोण जाणें !) पृथ्वीनें सर्व प्राण्यांचा भार वहावा हा धाक या सर्वांना कुणाचा ? किंवा हें सर्व निसर्गानें चालतें ? याचें उत्तर श्रुति भगवतीनें असें दिलें आहे. ‘ भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः । भयादिन्द्रश्चवायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥ क. व. २।६।४.’ या मंत्रांतील अस्य या पदानें परमात्मसत्तेनें सृष्टीचे सर्व व्यवहार चालतात असें सूचित केलें आहे. भगवान देखील गीतेंत असेंच प्रतिपादन करतात. ‘ गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् । प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम्॥ गी. अ. ९।१८ ’ ‘ तो विश्वश्रियेचा भर्ता । मीचि गा पंडुसुता । मी गोसावी समस्ता । त्रैलोक्याचा ॥ २८० ॥ आकाशें सर्वत्र वसावें । वायुनें नावभरी उगें नसावें । पावकें दहावें । वर्षावें जळें ॥ २८१ ॥ पर्वती बैसका न संडावी । समुद्रीं रेखा नोलांडावी । पृथ्वीया भूतें वहावी । हे आज्ञा माझी ॥ २८२ ॥ ’ तात्पर्य– श्रुतिस्मृतिपुराणांतून याचा स्पष्ट निर्देश केला आहे कीं, सृष्टीचा कर्ता सर्वतन्त्र स्वतंत्र सर्वज्ञ असा परमेश्वर आहे. स्वभावतः सृष्टी होऊं शकतच नाहीं.

‘ जगतां यदि नो कर्ता कुलालेन विना घटः । चित्रकारं विना चित्रं स्वत एव भवेत्तदा ॥१॥ ’ अर्थः– जगाचा जर कोणी कर्ता नसेल तर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कुंभारावांचून घट व चित्रकारावांचून चित्राहि आपोआपच होईल. परंतु तसें झालेलें अद्याप कोणाच्याही प्रत्ययास आलेलें नाहीं. यावर एक दृष्टांत येथें उद्धृत करतों. त्यायोगें स्वभाववाद्यांचें कसें चुकतें हें वाचकांच्या लक्षांत येईल.

एक आंग्लविद्याविभूषित गृहस्थ देवधर्म न मानणारे निसर्गवादी मताचे होते. ते नेहमीं म्हणत कीं, मी देव, शास्त्र कांहीं मानीत नाहीं. देव असता तर दिसला नसता कां? ईश्वराचें अस्तित्व मानणाऱ्या मनुष्याच्या पुरुषार्थाची हानी होते. देव पाहिजे कशाला? उन्हाळ्यांत उन्हाळा, पावसाळ्यांत पावसाळा, हिवाळ्यांत हिवाळा असा सृष्टिक्रम सहजच चालू आहे. ज्वारी पेरली कीं ज्वारीच येते, बाजरी पेरली कीं बाजरी, गव्हाचें गहूं वगैरे. तसेंच मनुष्य मेला कीं पुन्हां मनुष्यच होतो. पशूंचे पशू, पक्षांचे पक्षी होतात. पापपुण्य वगैरे कांहीं नाहीं. सृष्टि म्हणजे निसर्गानें केलेलें सौंदर्यप्रदान होय. असें ते नेहमीं म्हणत. परंतु त्यांचा मुलगा प्राग्जन्माच्या पुण्याईनें त्यांच्या विरुद्ध संस्काराचा असलेमुळें जरी तो शिक्षण घेऊन सुशिक्षित झाला होता तरी ईश्वर, शास्त्र व साधुसंतांच्या वचनावर विश्वास ठेवणारा असा आस्तिक भावनेचा असल्यामुळें त्याला बापाचें हें बोलणें पटत नसें.

एके दिवशीं वडील आकरा वाजतां ऑफिसला गेले असतां त्यांनीं दत्तात्रयाचें चित्र फारच सुंदर काढलें. एक वृक्ष आहे, त्याखालीं दत्तात्रय उभे आहेत, जवळ गाय उभी आहे, दोन तीन कुत्रे आहेत, असें तें रंगभरीत चित्र काढून वडिलांच्या बैठकींत टेबलावर ठेवलें. पांच वाजतां रावसाहेब ऑफिसांतून आले असतां कपडे बदलतांना त्यांची दृष्टि त्या टेबलावर ठेवलेल्या चित्राकडे गेली व विचारलें कीं, " बाळू, अरे हें दत्तात्रयाचें चित्र इतकें सुंदर कोणीं काढलें ? " तेव्हां बाळासाहेब म्हणाले, ' दादा ! अहो, चित्र काढणारा दुसरा कोणी नसून तें नेचर आहे. सिसपेन उठली व तिनें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पुष्ठ्यावर औटलाइन आंखली व प्रत्येक रंगाच्या कांड्यांनीं त्यांत हवा तसा रंग भरला. त्यामुळें हें चित्र तयार झालें.'

हें ऐकून त्याचे वडील म्हणाले, "अरे बाळू, तूं मूर्ख तर नाहींस ! शिसपेन, रंगाच्या कांड्या जड बिचाऱ्या, त्या चित्राची कल्पना कशा करूं शकतील व त्यांत रंग कसा भरूं शकतील ? त्याचा कल्पक कोणी तरी मनुष्य असला पाहिजे, व त्यानें आपल्या कल्पनेप्रमाणें चित्राची सुंदर रेखाटणी करून त्यांत रंग भरला असला पाहिजे." यावर बाळासाहेब म्हणाले, "तसें नाहीं हो दादा ! तें चित्र म्हणजे निसर्गानें केलेलें सौंदर्यप्रदान होय." हें ऐकून रावसाहेब मुलावर रागावले व म्हणाले कीं, "अरे, हें चित्र जर कोणी नेचर आहे असें म्हणेल तर त्याला मी **गाढव** म्हणेन." हें ऐकून बाळासाहेब म्हणाले, "दादा ! चित्रांतील गाय, कुत्रें, वृक्ष, दत्तात्रयाची मूर्ति उत्तम रंगभरीत आहे म्हणून तिला नेचर म्हणणाऱ्यास तुम्ही गाढव म्हणणार !" रावसाहेब म्हणाले; 'हो ! हो ! अवश्य म्हणणार!' तेव्हां बाळासाहेब म्हणाले, 'दादा, या सृष्टींतील सौंदर्य गाई घोडे मनुष्यादि हजारों प्राणी, हजारों प्रकारचीं फुलें फळें, त्यांची भिन्न भिन्न रुचि-रव असें सृष्टिसौंदर्य आहे कीं, ज्याची 'मनसाऽपि अचिंत्यरचनारूपं इदं जगत्' ह्या जगाचीं तर मनानेंहि ज्याच्या रचनेविषयीं कल्पना करतां येत नाहीं त्या जगाला Nature म्हणजे निसर्ग म्हणणाऱ्यास **गाढवाचें बाप** म्हटलें तर काय हरकत आहे ?' हें ऐकून रावसाहेब हंसले, व म्हणाले, 'बाळू, पर्यायानें तूं मला गाढव ठरविलेंस.' बाळासाहेब म्हणाले, 'दादा, तसा अर्थ (उद्देश) नाहीं; पण आपण थोडा विचार करा कीं; ज्या चित्राची कल्पना करणारा जसा चित्राहून भिन्न कोणी मनुष्य असला पाहिजे असें आपण म्हणतां ना ! त्याचें रहस्यच असें आहे कीं, चित्र जड असून त्याचा कल्पक जसा त्याहून भिन्न ! मनुष्य म्हणजे चेतन, क्रियावान् व

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ज्ञानवान् पाहिजे तसेंच ही सृष्टि जड असून तिचा कल्पक कोणी चेतन असा सर्वज्ञ सर्वशक्तिमान असलाच पाहिजे. त्यालाच शास्त्रांतून ईश्वर, ब्रह्म असें म्हणतात.

महर्षि व्यासांनीं ब्रह्मसूत्राच्या प्रथम अध्यायाच्या पहिल्या अधिकरणाच्या प्रथम सूत्रांत " अथातो ब्रह्मजिज्ञासा ॥ १ ॥ " ब्रह्माची जिज्ञासा करावी असें म्हटल्यानंतर सहजच प्रश्न उपस्थित होतो कीं, ' किं लक्षणं तद्ब्रह्म ' ब्रह्माचें काय लक्षण आहे ? याचें उत्तर दुसऱ्या सूत्रांत दिलें. " जन्माद्यस्य यतः ॥ २ ॥ " ह्या जगाचे जन्मादि (उत्पत्ति, स्थिति, लय) ज्याच्यापासून होतात तें ब्रह्म होय. या सूत्राचें विषयवाक्य म्हणजे तैत्तिरीय श्रुति होय. " यतो वा इमानि भूतानि जायन्ते । येन जातानि जीवन्ति । यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति । तद्विजिज्ञासस्व । तद्ब्रह्मेति (तैत्ति० ३। १) "

साधुसंत देखील असेंच प्रतिपादन करतात. 'ज्ञा. म. ३३२ आदिपुरुषां जय विश्वंभरिता नानापरी तुझा खेळू । जया ब्रह्मगोळु कल्पकोडी घडी मोडितां नलगे वेळु । ' अथवा ' एकले न कंठेचि म्हणोनिया येणें । केलीं निर्माण वो चौदाही भुवनें ॥गगन चंद्र सूर्य मेघ तारांगणें । पांचही महाभूतें भौतिकें भिन्नें भिन्नें वो ॥ १ ॥ ऐसा लाघविया मायासूत्रधारी ॥ ध्रु० ॥ ' अथवा ' जयापासोनि सकळ । महीमंडळ हें झालें ॥ १ ॥ तो एक पंढरीचा राणा । नये अनुमाना श्रुतीसी ॥ २ ॥ ' सारांश ही सृष्टि जीवाच्या भोगाकारितां परमेश्वरानें केली. याचा अर्थ असा नाहीं कीं, तो नैय्यायिकमताप्रमाणें कुलालासारखा निमित्तकारण आहे. तर असें नसून ' यथोर्णनाभिः सृजते गृह्णतेच ' या ऊर्णनाभीच्या (कोळ्याच्या) दृष्टांताप्रमाणें प्राणी अदृष्टवशेंकरून तो अभिन्ननिमित्तोपादानकारण आहे. अर्थात् संपूर्ण जगत् जर परमेश्वरानें रचलें आहे तर जगदंतःपाती हें शरीर कोणीं केलें असावें तर त्यांनींच केलें आहे. ' मज कर्त्याची प्राप्ति । होआवयालागीं निश्चितीं । स्वांशें प्रकाशोनी ज्ञानशक्ती । पौरुषी प्रकृति म्यां केली ॥ २४६ ॥ ए. भा. अ. ७ व. असें भगवान् म्हणतात.

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सूक्ष्मसृष्टीची रचना केली तरी त्यांत जिवाला शुभाशुभकर्मांचा भोग होणें शक्य नाहीं म्हणून अपंचिकृत भूतांचें पंचीकरण करून या स्थूळ शरिराची रचना भगवंतांनीं केली. " तद्भोगाय पुनर्भोग्य भोगायतन-जन्मने । पञ्चीकरोति भगवान् प्रत्येकं वियदादिकम् ॥२६॥ पञ्चद० तत्त्व-विवेक. " भगवंतांनीं अपंचिकृत भूतांचें पंचीकरण कां केलें म्हणाल तर जिवाच्या ठिकाणीं कर्तृत्व भोक्तृत्व त्याच वेळां दिसून येतें कीं, जेव्हां तो जीव कर्मानुसार एखाद्या स्थूल देहांत प्रवेश करतो. 'ज्ञा.अ. १५–परी कर्ता भोक्ता ऐसें । हें जीवाचें तैंचि दिसे । जैं शरीरीं कां पैसे । येकाधिये ॥३६१॥ जैसा आथिला आणि विलासिया । तैंचि वोळखों ये धनंजया । जैं राजसेव्या ठाया । वस्तीसि ये ॥३६२॥ तैसा अहंकर्तृत्वाचा वाढु । कां विषयेंद्रियांचा धुमाडु । हा जाणिजे तैं निवाडु । जैं देह पावे ॥३६३॥ ' भगवान म्हणतात, अर्जुना, जसा एखादा पुरुष ऐश्वर्यसंपन्न व विलासी आहे हें तेव्हांच ओळखतां येतें कीं, जेव्हां तो एखाद्या प्रसिद्ध अशा राजधानीच्या ठिकाणीं राहावयास येतो त्याप्रमाणें अहंकाराचें आधिक्य अथवा विषय व इंद्रियें यांचा धुमाकुळ, यांची स्पष्टता त्याच वेळेला दिसून येतें कीं जेव्हां जीवाला कर्मानुसार एखादा स्थूल देह प्राप्त होतो. तात्पर्य, स्थूल देहावांचून जीवाला कोणतेंही कार्य करतां येत नाहीं अथवा सुखदुःखाचा भोग घेतां येत नाहीं. एतदर्थ भगवंतांनीं अपंचिकृत भूतांचें पञ्चीकरण करून हें स्थूल शरीर जिवास दिलें, याच अभिप्रायानें तुकाराम महाराज म्हणतात, " दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलाया वचन " अथवा " देवें दिला देह भजना गोमटा " ही गोष्ट प्रायः लोकांना माहित नाहीं कीं, हा देह सहजच प्राप्त झाला कां कोणीं दिला. एथपर्यंतच्या विचारानें साधु-संतांच्या वचनावरून ही गोष्ट सिद्ध झाली कीं, हा देह प्रभूंनीं दिला.

पण तो कशाकरितां दिला असा दुसरा प्रश्न आहेच.

प्रश्न दुसरा:–देवांनीं देह कशासाठीं दिला? याचें उत्तर तुकाराम महाराज देतात कीं, " दिलीं इंद्रियें हात पाय कान । डोळे मुख बोलाया वचन ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जेणें तूं जोडसी नारायण । नासे जीवपण भवरोग ॥१॥ ',
चैतन्याला जीवपणा प्राप्त होणें हा मोठा रोग आहे. ज्ञानेश्वर महाराज यालाच क्षयरोगाची उपमा देतात. " आत्मया जीवबुद्धि । जे लागली होती **क्षयव्याधी** " देहबुद्ध्यादि अनात्मपदार्थ मी आहें म्हणजे मी जीव आहें असा भ्रमाचा क्षयरोग आत्म्याला झाला आहे. या जीवपणामुळेंच चैतन्याला जन्मावांचून जन्मावें लागतें व मरणावांचून मरावें लागतें. वास्तविक जीवाचें मूळस्वरूप असें आहे कीं, " न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः । अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२०॥ गी. अ. २ " अथवा " कदाचिदात्मा न मृतो न जायते। न क्षीयते नापि विवर्धतेऽनवः॥ निरस्तसर्वातिशयः सुखात्मकः। स्वयंप्रभः सर्वगतोऽयमद्वयः ॥ ३५ ॥ –रामगीता " याप्रमाणें अजर, अमर, अविनाशी सुखरूप आत्म्याला जीवदशा प्राप्त झाल्यामुळें म्हणजेच देहादिकाशीं तादात्म्य केल्यामुळें प्राप्त असलेलें सुख तिरोहित (रुद्ध) झालें असून जीवस्वरूपीं नसलेलें जन्ममरणाचें दुःख प्राप्त झालें, **हेंच आहे अनिष्ट.** " प्रथम केला गर्भी वास । काय ते सांगावे सायास । दुःख भोगिलें नवही मास । आलो जन्मास येथवरी ॥ १ ॥ तु. म. " अथवा " काय सांगूं गर्भीची यातना । मज भोगिता नारायणा ॥ " तुकाराम महाराज जन्मसमयींच्या दुःखाबद्दल देवाजवळ उद्गार काढतात कीं, हे प्रभो, नवमहिनेपर्यंत मातेच्या उदरांत अतिशय कष्ट सहन करावे लागले.

गर्भांत कोणत्या प्रकारचें दुःख जीवाला कसें सोसावें लागतें याचें वर्णन नाथमहाराजांनीं भागवताच्या १० व्या अध्यायांत केलें आहे. ' मातेच्या जठरकुहरीं । विष्ठामूत्रांच्या दाथरीं । अधोमुख नवमासवरी । उकडी भारी जठराग्नी ॥ २८ ॥ विष्ठालेपु चहूंकडे । नाकीं तोंडीं कृमी किडे । गर्भवासींचे कष्ट गाढे । कोणापुढें सांगेल ॥ २९ ॥ कट्वम्ल लवण मेळें । गर्भवतीचे पुरती डोहळे । त्वचेवीण गर्भांग पोळे । तेणें दुःखे लोळे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अतिदुःखी ॥ ४३० ॥ ते गर्भोदरींची व्यथा । नेणती माता आणि पिता । तेथ नाहीं कोणी सोडविता । जीवींची व्यथा जीव जाणे ॥ ३१ ॥ ज्या ठायाची करूं नये गोठी । प्रकट दाऊं नये दिठी । ते योनिद्वारें अतिसंकटीं । जन्म शेवटीं जीवासी ॥ ४३२ ॥' अशा संकोचित द्वारांतून जन्म घेतांना जीवाला असें दुःख भोगावें लागतें, त्याचप्रमाणें मृत्युसमयींही अतिशय क्लेश सोसावे लागतात. 'एरव्हीं आयुष्याचें सूत्र विघडतां। भूतांची उमटें खडाडता । काय न मरतयाही चित्ता । युगांतु नोहे ? ॥ १८२॥ ज्ञा. अ.७' भगवान म्हणतात, अर्जुना, सहज विचार करून पाहिलें तर आयुष्याची दोरी तुटली कीं, मरणाऱ्या प्राण्याची खळबळ उडते व ते मृत्युसमयींचे क्लेश पाहून न मरणाऱ्याच्याही चित्ताला प्रलयकाळ ओढवला असें वाटत नाहीं काय ? तर होय. याप्रमाणें जन्ममृत्यूचें भयंकर दुःख जीवाला भोगावें लागतें तेंही एका जन्माचें किंवा एका मरणाचें नव्हे तर 'पुनरपि जननं पुनरपि मरणं पुनरपि जननी जठरे शयनम् ।' 'किती जन्म झाला फेरा । गणित नाहीं जी दातारा.' हजारों वेळां जन्मावें लागतें व हजारों वेळां मरावें लागतें किन्तु 'एकएक योनी कोटी कोटी फेरा' असें जिवाला लाखों जन्ममरणांचें दुःख भोगावें लागतें. 'जन्ममरणापरतें दुःख । कोणतें आणिक सांग पां ॥ १ ॥' व हेंच आहे अनिष्ट.

जीवाला नको म्हणजे काय तर दुःख, आणि पाहिजे म्हणून काय तर सुख, हेंच आहे इष्ट. अर्थात् अनिष्टनिवृत्ति म्हणजेच दुःखनिवृत्ति व इष्टप्राप्ति म्हणजे सुखप्राप्ति व्हावी. एतदर्थ मनुष्यदेहाची रचना आहे. यद्यपि जीवमात्रांना अनिष्ट असें दुःख नको व इष्ट असें परमसुख पाहिजे तथापि अनिष्टनिवृत्त्यर्थ व इष्टप्राप्त्यर्थ जीवानें मनुष्येतर हजारों शरीरें धारण केलीं तरी ही गोष्ट पार पडणें शक्य नाहीं. कारण 'इतर देहाचिया ठायीं । हा विचारूचि नाहीं । केवळ शिश्नोदर पाही । व्यवसावो देही करिताती । ए. भा. २५८.' इतर योनींतून अनिष्ट असें दुःख भोगीत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असतां त्या दुःखाला कंटाळून जीवात्मा प्रभूला शरण गेला. "किती वेळां जन्मा यावें । किती व्हावें फजीत ॥ १ ॥ म्हणोनिया जीव भ्याला । शरण गेला विठूशीं ॥२॥ तु. म."

दयाघन परमात्म्यानें या अत्यंत दुःखनिवृत्यर्थ व परमानंदप्राप्त्यर्थ जीवाला हा नरदेह दिला. 'दिला करुणाकरें । मनुष्यदेह सत्संग ॥१॥' कारण 'वेदत्रयीच्िया पाना । नये अन्यत्र लागो अर्जुना । जे मनुष्यावांचुनि विधाना । विषय नाहीं ॥१७८॥ ज्ञा. अ. १५' कारण तिन्ही वेदांचे आज्ञेला मनुष्याशिवाय दुसरें कोणी पात्र नाहीं. म्हणून एवढ्या-करितां जीवाला अनिष्ट अशी दुःखनिवृत्ति व इष्ट अशी परमानंदप्राप्ति ज्या शरिरानें करून घेतां येईल अशा मनुष्यशरिराची रचना भगवंतांनीं केली. भागवत अ. ९–

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयाऽऽत्मशक्त्या
वृक्षान् सरीसृपपशून खगदंशमत्स्यान् ।
तैस्तैरतुष्ट हृदयः पुरुषं विधाय
ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः ॥ २८ ॥

होचि जाणावया निजरूपातें । पूर्वी तेणें श्रीअनंतें । निजमायेचेनि हातें । केली बहुतें शरीरें ॥ ३२१ ॥ एकें केलीं जे भूचरें । एकें ते केली खेचरें । एकें केलीं जळचरें । चरें अचरें ती एकें ॥ २२ ॥ वृक्ष सर्प पशु-दंश । राक्षस पिशाच बक हंस । मत्स्यकच्छादि अशेष । सृजी बहुवस योनींतें ॥ २३ ॥ ऐशा चौऱ्यायशी लक्ष योनी । सृजूनी पाहे परतोनी । तंव निजप्राप्ती लागोनी । न देखे कोणी अधिकारी ॥ २४ ॥ ऐशिये देखोनि सृष्टीतें । सुख न वाटेचि देवातें । मग मानवी प्रकृतीतें । आदरें बहुतें निर्मिली ॥२५॥ बाहुल्यें मनुष्यदेहीं । निजज्ञान घातलें पाहीं । जेणें ज्ञानें देहीं । विदेह पाहीं पावती ॥ २६ ॥ आहारनिद्राभयमैथुन । सर्वा योनींसी सम-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

समान । मनुष्यदेहींचें ज्ञान । अधिक जाण सर्वांशीं ॥ २७ ॥ देखोनि मनुष्यदेहासी । सुख झालें भगवंतासी । अधिकार ब्रह्मज्ञानासी । येणें देहेंसी मत्प्राप्ती ॥ ३२८ ॥

याप्रमाणें भगवत्प्राप्तीला योग्य असा मनुष्यदेह मिळाला असतां याच शरीरानें '**तैसे येणेंचि शरीरें** । शरिरा येणें सरें । किंबहुना येरझारे । चिरा पडे ॥ १३६ ॥ ज्ञा. अ. १२' अनिष्ट अशी दुःखनिवृत्ति करतां येते तसेंच "**तें सुख येणेंचि देहें** । पाय पाखाळणिया लाहे । जो भूत वैषम्यें नाहे । विषमबुद्धि । १०७५ ज्ञा. अ. १३.' याच शरिरानें इष्ट अशी सुखप्राप्तीही करून घेतां येते. एवढ्याकरतांच भगवंतांनीं जीवाला 'दिला करुणाकरें । मनुष्यदेह सत्संग ॥' असें तुकाराम महाराज म्हणतात.

मनुष्यदेहाचें कर्तव्य

येथपर्यंतच्या विचारानें मनुष्यदेह कोणीं दिला ? व कशासाठीं दिला हें सप्रमाण सिद्ध झालें कीं, देह देवांनीं दिला व तो कृतार्थ होण्यासाठीं दिला. 'निजात्मप्राप्ती लागोनी । देवें केली मनुष्ययोनी' म्हणून प्रत्येक मनुष्यानें भगवंताचे उपकार स्मरून कृतज्ञतापूर्वक त्याचें भजनपूजनादि केलें पाहिजे. 'तयाचें भजन चुकूं नका' हेंच प्रत्येक मनुष्यमात्राचें स्वकर्तव्यपालन होय. ज्या उद्देशानें आपण नरदेह धारण केला तें कार्य प्रधान समजून बाकीचीं कामें अप्रधान समजलीं पाहिजेत. अनिष्टनिवृत्ति व इष्टप्राप्ति भगवतसाक्षात्कारावांचून होणें शक्य नाहीं. मनुष्य स्वप्रयत्नानें गरिबाचा श्रीमंत होईल, बाळ्याचा बाळासाहेब होईल, रावस्याचा रावसाहेब होईल, काय वाटेल तें होतां येईल. परंतु अनिष्टनिवृत्ति व इष्टप्राप्ति भगवत्साक्षात्कारावांचून कोणत्याहि लौकिक उपायानें होणें शक्य नाहीं. श्रुति भगवती सांगते:—

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

"यदा चर्मवदाकाशं वेष्टयिष्यान्ति मानवाः ।
तदा देवमविज्ञाय दुःखस्यान्तो भविष्यति" श्वेता. श्व. ६।२०

ज्यावेळेला मनुष्य परिछिन्न व मूर्त कातड्याप्रमाणें विभु व अमूर्त अशा आकाशाला गोळा करून मुरळीवजा करतील त्याच वेळेला देवाला न जाणतां मनुष्याच्या दुःखाचा अंत होईल. परंतु हें होणें अशक्य कोटींतील आहे. जन्ममृत्यूचें उल्लंघन करण्याकरितां परमात्म्यालाच जाणलें पाहिजे. श्रुतिः-'तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति नान्यः पन्था विद्यतेऽयनाय' श्वेता. श्वे. ३-८-३५ "तरति शोकं आत्मवित"

(१) मृत्युउल्लंघन (२) शोकतरण (३) ग्रंथीभेद (४) संशयछेद आणि (५) कर्मक्षय, हे परमात्मस्वरूपाला जाणल्याखेरीज होणें शक्य नाहीं. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'कांहीं नेणोनिया आन। एकला विठ्ठलचि जाण ॥ १ ॥ पुढति पुढति मना। एकला विठ्ठलचि जाणा ॥ २ ॥ गुरुगम्य हे तयाची खूण। एकला विठ्ठलाचि जाण ॥३॥'

सारांश परमात्मस्वरूपाची ओळख झाल्याखेरीज आत्यंतिक दुःख-निवृत्ति आणि परमानंदप्राप्ति होणें शक्य नाहीं. 'जे जाणतले यासाटीं। संसार काढूनियां काटी। जिरोनि जाइजे पोटीं। नित्यानंदाच्या ॥ ८६६ ॥' भगवान म्हणतात, अर्जुना, जें ज्ञेयस्वरूप (परमात्मतत्त्व) जाणल्यामुळें संसाराचें कुंपण काढून म्हणजेच संसाराचा निरास करून नित्यानंदाच्या पोटांत जिरून जावें म्हणजे नित्यानंदरूप व्हावें येवढी शक्ति परमात्मज्ञानांत आहे. अतः तें ज्ञान संपादन करणें मनुष्याचें आद्यकर्तव्य आहे. 'भा. अ.९ मनुष्यदेहींचेनि ज्ञानें। सच्चिदानंद पदवी घेणें। एवढा अधिकार नारायणें। कृपावलोकनें दिधला ॥ ३३० ॥ नरदेह परमपावन। पावोनि न साधी ब्रह्म-ज्ञान। तो लांडा गर्दभ जाण। पुच्छेंवीण दुपायी ॥ ३४८ ॥ मनुष्यदेही ब्रह्मज्ञान। पुढील जन्मीं मी करीन। म्हणे तो नागवला जाण। सोलीव अज्ञान त्याचेंनी ॥३४९॥' म्हणजे अवश्य संपादन करून दुःखसंबंधरहित

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सुखाला प्राप्त होतो; व तें ब्रह्मज्ञान ज्या सद्‌गुरूंच्या मुखानें सत्शास्त्र श्रवण केलें असतां महावाक्यविचारानें हृदयांत उदयाला येतें त्या सद्‌गुरूची भेट व सत्शास्त्रश्रवण भगवंताचे अनुग्रहावांचून होत नाहीं.

' यावन्नानुग्रह साक्षाज्जायते परमेश्वरात् ।
तावन्न सद्‌गुरुः कश्चित्सच्छास्त्रमपि नो लभेत ॥१॥ यो.वा.'

भगवंताचा अनुग्रह झाल्यावर कोणत्याच गोष्टी दुर्मिळ राहात नाहींत. ' जरी हा हो कृपा करील नारायण । तरी हेंचि ज्ञान ब्रह्म होय ॥१॥ ' भगवत्कृपा संपादन करण्यास नारदांनीं भक्तिसूत्रांत अखंड भजन करणें असें सांगितलें आहे. " अव्यावृतभजनात् " ॥३६॥ ना. भ. सतत प्रेमयुक्त अंतःकरणानें भजन करणारास हा ज्ञानयोग भगवान देतो असें गीताकार म्हणतात. " तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥१०॥ गी. अ. १० " ' वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः । जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥१–२–७ ' श्रीकृष्ण परमात्म्याच्या ठिकाणीं प्रथम भक्ति उत्पन्न झाली म्हणजे भक्तीपासून वैराग्य व वैराग्यापासून उपनिषदांत वर्णिलेलें ज्ञान प्राप्त होतें. " पुढें भक्तीनें धरिलें हातीं । मागें ज्ञान वैराग्य धर्म येती । स्थिर केलीं जीं आचपळें होतीं । सिद्ध आणुनि लाविली पंथीं गा " ॥१॥ परमात्मभक्तीनें सर्व गोष्टी साध्य होतात यांत संशयच नाहीं. म्हणून प्रत्येक मनुष्यानें आपलें आध्यात्मिक जीवन बनविण्यासाठीं ' कांहीं थोडा बहुत लागपाठ । करा भक्तिभाव धरा बळकट । तनमन ध्यान द्या लावुनिया नीट । जरी करणें असेल गोड शेवट गा ॥१॥'

सारांश प्रत्येक मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे कीं, साधुसंतांच्या वचनावर विश्वास ठेऊन त्यांनीं दाखविलेल्या मार्गानेंच गेले असतां आपलें परम कल्याण होईल. " मार्ग दावुनि गेले आधी । दयानिधी संत ते ॥ १ ॥ तेणेंचि पंथे चालो जातां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥ २ ॥ नि. रा. आमचा

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काल भगवत्भक्तीला प्रतिकूल आहे; ज्या आध्यात्मिक जीवनानें जीवाचें परम कल्याण होतें असा साधुसंतांचा व श्रीहरिगुरुकृपेनें आमचा अनुभव आहे, त्या आध्यात्मिक जीवनाकडे आधुनिक लोकांचें लक्ष नाहीं, त्याचें शिक्षण दिलें जात नाहीं, त्याच्या शाळा नाहींत, कॉलेजें नाहींत, त्याच्याकरतां एक पैचा देखील कोणी त्याग करण्यास तयार नाहीं. "पैं दृष्टादृष्टाचिये जोडी- । लागीं भांडवल न सुटे कवडी । जेथ सर्वस्वें हानि तेथ कोडी । वेंचिती गा ॥५०८॥ ज्ञा. अ. ९." भगवान म्हणतात, अरे अर्जुना, ज्याच्यापासून इहपरलोकीचा लाभ होतो त्याकरितां एक कवडीदेखील कोणी खर्चण्यास तयार नाहीं. आणि ज्या भौतिक जीवनांतील शहाण-पण संपादन करण्यानें अंतिम कांहींच साध्य होत नाहीं, त्याच्याकरतां मात्र शाळा, कॉलेज, हायस्कुल वगैरे द्वारा कोट्यावधी रुपये खर्च होत असून धार्मिक जीवनापासून जीवाला परावृत्त करण्याचे प्रयत्न केले जात आहेत; त्याचें कारण गुरुजी (ह. भ. प. ब्रह्मविद्वरिष्ठ श्रीरंगनाथमहाराज पर-भणीकर) नेहमीं म्हणत असतात कीं, ब्रह्मीभूत श्रीगुरु दादा (ह. भ. प. विनायकबुवा साखरेमहाराज) असें म्हणत असत कीं—पाश्चात्य विद्येनें या लोकांचें चित्त अशुद्ध झाल्यामुळें त्यांना वैदिक विद्येचें महत्त्व वाटत नसून वेदवेदांतशास्त्रज्ञ व्यास, वशिष्ठ, शुकाचार्यादिकांचें महत्त्व न कळल्यामुळें हे सुशिक्षित लोक, जर्मन तत्त्ववेत्ता कँट असें लिहितो, तर नित्से असें म्हणतो, रशियन तत्त्ववेत्ता मार्कस् असें म्हणतो व लेनिन असें लिहितो, ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल असें प्रतिपादन करितो, वगैरे पाश्चात्य लोकांचें कौतुक करतात, परंतु यांच्या बुद्धींत असा विचार येत नाहीं कीं, अरे हे कँट, नित्से, मार्कस् लेनिन, डार्विन, ॲरिस्टॉटल वगैरे माणसें पंचीकृत भौतिक तत्त्वांचे शोधक असे **जडवादी** असून यांचा अपंचिकृत अशा अतींद्रिय विषयांत आणि निजात्मस्वरूपांत प्रवेश नसल्यामुळें यांची योग्यता भगवान श्रीकृष्ण, प. श्रीमहर्षि व्यास, वसिष्ठ, शुकाचार्यादि थोर पुरुषाएवढी असणें शक्य आहे काय?

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

साधुसंत आध्यात्मिक तत्त्वाचे **अनुभवी** असे **चेतनवादी** आहेत; पण ही गोष्ट चित्ताच्या अशुद्धतेनें यांच्या लक्षांत न आल्यामुळें सद्यःकालांत साधुसंतांच्या वचनाची अवहेलना होऊन पामर लोकांच्या मताला महत्त्व प्राप्त होणें हाच कलिकाल होय. "पहा हो कलीचें महिमान । असत्यासी रिझले जन । पापा देती अनुमोदन । करिती हेळण संतांचें ॥ १ ॥ थोर या युगाचें आश्चर्य । ब्रह्मकर्म उत्तम सार । सांडुनियां द्विजवर । दावलपीर स्मरताती ॥२॥ राहिले वर्णाश्रमधर्म । अन्योन्य विचरती कर्म" अथवा "गीता लोपली गायत्रीं । भरले चमत्कार मंत्रीं । अश्वाचिये परी । कुमारी विकिती वेदवक्ते ॥ ३ ॥" अशा विपरित कलिकालात निदान इहपरलोकी कल्याणइच्छु भाविक श्रद्धावान विचारी मनुष्यानें तरी 'मुकती तीं द्यावी मुकों । आपण नये त्यांचे शिकों ॥ १ ॥ भाविकांनीं दुर्जनांचे । कांहीं मानूं नये साचे ॥ २ ॥' नास्तिक दुर्जनांचा सहवास सोडून सत्संगतींत भक्तिपथानें गेल्यास त्याचें जीवन आध्यात्मिक बनून तो कायमचा सुखी होईल. एवढ्याकरितां मार्गदर्शक म्हणून साधुसंतांच्या ग्रंथाधारें या वारकरी संजीवन ग्रंथाची योजना श्रीहरिगुरुकृपेनें झाली आहे.

"आध्यात्मिक जीवन" संपादण्यासाठीं मनुष्यानें "वारकरी संजीवन ग्रंथांतील" प्रमेय (विषय) आत्मसात करणें म्हणजेच स्वकर्तव्यपालन करणें होय. या संजीवन ग्रंथांत भजन आहे, भक्ति आहे, ज्ञान आहे, परमात्मसाक्षात्कार करून देणारें भगवद्गीतारूपी सत्शास्त्र आहे, गीतेच्याद्वारां उपदेश करणारा चराचर परमगुरु असा भगवान श्रीकृष्ण उपदेशक आहे. नित्यनेमाकरितां हरिपाठ, विष्णुसहस्रनाम, वगैरे ग्रंथ यांत आहेत. व परमात्मस्वरूपाची ओळख (ज्ञान) होण्यासाठीं चांगदेवपासष्टी, अनुभवामृतादि आध्यात्मिक ग्रंथ या वारकरी संजीवनांत आहेत. यांतील समग्र ग्रंथांचें महत्त्व वर्णन करूं गेलों तर स्वतंत्र असा एक ग्रंथ लिहूनही या ग्रंथांचें महत्त्व वर्णन केलें जाणार नाहीं. शिवाय या ग्रंथाचें वैशिष्ट्य मी वर्णन केलें तरच लोकांना

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कळेल असें नसून भक्तिसंप्रदायांतील लोकांशीं " वारकरी संजीवनांतील " ग्रंथ नित्य परिचयाचे आहेत. सर्वतोप्रकारें मार्गदर्शक म्हणजे वारकरी संजीवनांतील ग्रंथ होत. म्हणून प्रत्येक मनुष्यानें शुद्ध आचरणानें राहून यांचे नित्यनियमानें विचारपूर्वक पठण, पाठणादि केलें असतां त्याचें जीवन आध्यात्मिक बनून तो कायमचा सुखी होईल.

कोणते नियम मनुष्यानें नियमितपणें पाळल्यास त्याची जीवनयात्रा सफल होईल अशी नियमावली पुढें परिशिष्टांत दिली आहे.

तसेंच या संजीवनांतील ग्रंथांचें महत्त्व त्यांच्याच वचनाधारें पुढें परिशिष्टांत उद्धृत केलें आहे.

या ग्रंथांत कांहीं निवडक स्तोत्रें दिलीं आहेत. त्यांपैकीं "श्रीमुकुंदाष्टक नांवाचें स्तोत्र" रचियते (पुण्यांतील माझे प्रियबंधु नि. क. यो. श्रीयुत मुरलीधर लोहिया यांचे पितृचरण तीर्थस्वरूप श्रीचतुर्भुज काकाजी यांनीं स्थापन केलेल्या श्रीमुकुंदभवन संस्कृत पाठशाळेंत त्यांच्या आश्रयी राहून तेथील सुप्रसिद्ध वे. शा. पंडित श्रीशंकरशास्त्री मारुलकर यांच्या कृपेनें विद्या संपादन करून पाठशाळेंत कांहीं दिवस अध्यापनकार्य करून हल्लीं श्रीयुत ह. भ. प. फुलचंदजी खडलोया यांच्या आश्रयी सोलापूर येथें वास्तव्य करून तेथील सिद्धेश्वर विद्याप्रसारक मंडळानें चालविलेल्या करंजकर हायस्कूलच्या संस्कृत अध्यापकपदावर आरूढ असलेले) माझे परमस्नेही भागवतानुरागी कविशेखर पंडित राधाकृष्ण तिवारी हे होत. हें मुकुंदाष्टक भक्तिरसपरिपूर्ण असल्यामुळें तेंही आम्हीं या निवडक स्तोत्रमालिकेंत संग्रहित केलें आहे.

या वारकरी संजीवन ग्रंथाच्या प्रकाशनासंबंधीं माझे प्रेमी श्री.ह.भ.प. फुलचंदजी खडलोया सोलापूरकर यांना सूचना केली असतां त्यांनीं प्रेमादरानें ती सूचना मान्य करून या ग्रंथाचें प्रकाशन स्वखर्चानें केलें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

असून थोडी घस सोसून ग्रंथाची स्वल्प किंमत ठेवून जनताजनार्दनाच्या सेवेंत सादर केल्याबद्दल आम्ही त्यांना शुभ आशीर्वादात्मक धन्यवाद देतों.

शेवटीं 'वारकरी संजीवन अर्थात् आध्यात्मिक जीवन' हा ग्रंथ लोकांचे प्रेमादरास पात्र होऊन भाविकजन यांतील प्रत्येक ग्रंथाचें श्रवण, मनन, निदिध्यासन करून निजात्मस्वरूपीं तल्लीन होवून कांहीं स्तोत्रें नित्यनियमानें पाठ करून भक्तिसुखाचा स्वाद घेवोत, अशी जगच्चालक प्रभू श्रीपांडुरंगचरणीं प्रार्थना करून ही लांबलेली भूमिका पुरी करतों.

विजयादशमी
शके १८७१
श्रीक्षेत्र पंढरपूर.

हरिॐ
संतचरणरज
श्रीकृष्णदास लोहिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विषयानुक्रमणिका
भाग पहिला.

विषय	पृष्ठांक
१ श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत नमनस्तोत्र	१
२ श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ व गुरुवारचे अभंग (३१-३७)	९
३ श्रीएकनाथमहाराजकृत हरिपाठ	१८
४ श्रीएकनाथमहाराजकृत चिरंजीवपद	२६
५ श्रीचांगदेवपासष्टि	२९
६ अमृतानुभव	३४

भाग दुसरा
नित्योपयोगी श्लोकसंग्रह

७ प्रातःस्मरण पहिलें	९४
८ प्रातःस्मरण दुसरें	९५
९ स्नान व सूर्यनमस्कारविधि	९६
१० तीर्थप्राशन	९८
११ भोजनविधि	९८
१२ दीपवंदन	९९
१३ श्रीपरब्रह्मस्तुति	९९
१४ श्रीशिवस्तुति	१००
१५ श्रीविष्णुस्तुति	१००
१६ श्रीरामस्तुति	१०२

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१७ श्रीमारुतिस्तुति १०३
१८ श्रीकृष्णस्तुति १०३
१९ श्रीगुरुस्तुति १०६

निवडक स्तोत्रें

२० श्रीपांडुरंगाष्टक १०७
२१ श्रीहरिशरणाष्टक १०९
२२ श्रीमुकुन्दाष्टक १११
२३ श्रीगोविन्दाष्टक ११३
२४ श्रीदीनबन्धुअष्टक ११५
२५ रामरक्षास्तोत्र ११७
२६ षट्पदी १२२
२७ निर्वाणदशक १२३
२८ कौपीनपंचक १२५
२९ आत्मषट्क १२६
३० साधनपञ्चक १२८
३१ श्रीविष्णुसहस्रनाम १३०
३२ श्रीमद्भगवद्गीता १५४
३३ सामुदायिक प्रार्थना २२०

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ॐ

॥ श्रीविठ्ठलप्रसन्न ॥

वारकरी संजीवन अर्थात् अध्यात्मिक जीवन

भाग पहिला

१

श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत नमनस्तोत्रप्रारंभ:

नमो कालकौतुहल । नमो चक्रचालक गोपाळ । नमो विश्वप्रतिपाळ । प्रभंजन ॥ १ ॥ नमो शिवशिवेशा । नमो शिवादिविश्वेशा । नमो रूपा अष्टदिशा । व्यापक नारायणा ॥ २ ॥ नमो सकळ गर्भोद्भवा । नमो चित्तचालकभावा । नमो विष्णुमूर्ति देवाधिदेवा । श्रीविठ्ठला ॥ ३ ॥ नमो भजनशील व्यापका । नमो ज्योतिर्लिंगदीपका । नमो नमो तुज एका । आत्मव्यापका जगद्गुरु ॥ ४ ॥ नमो श्रीये श्रीनिवासा । नमो आगमपरेशा । नमो ज्ञानगम्याधीशा । प्रतिकुळा ॥ ५ ॥ नमो स्वलीलाविनटा । नमो स्तुतिवैकुंठपीठा । नमो रूपादिश्रेष्ठा । वैकुंठींचिया ॥ ६ ॥ नमो दर्शनस्पर्शना । नमो उपरतीनिधाना । नमो तितिक्षादारुणा । कमळालया ॥७॥ नमो त्रिगठी आदटा । नमो त्रिगुणा तूं उद्भटा । नमो सत्वरूप सद्टा । ब्रह्मनामा ॥८॥ नमो राजेश्वरा हरी । नमो विगळित संहारि । नमो वाचा वक्ता

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

करी । वाचाळ वाक्पुष्पी ॥ ९ ॥ नमो तमहर्ताकर्ता । नमो सकळसंहर्ता । नमो काळकाळूदाता । रक्षिता हरिभक्ता ॥ १० ॥ तुज नमो हरहरेश्वरा । नमो न देखो दुसरा । नमो वेदांत-सागरा । सर्वेश्वरा तुज नमो ॥ ११ ॥ श्रुति निराश्रय नमो । नमो ज्ञानरूप नमो । नमो द्वैतनिरसन नमो । करी तूं निजकरें ॥ १२ ॥ नमो व्यक्ताव्यक्तहरी । नमो मायासंहारकेसरी । नमो सर्वांच्या माजघरीं । नांदसी तूं आत्मारामा ॥ १३ ॥ जिवशिव नमो तुज । नमो सर्वजीवबीज । नमो तूंचि सहज । गरुडध्वजा श्रीविठ्ठला ॥ १४ ॥ लीलेस्तव नटारंभ । नमो जग-दादिअखिलस्तंभ । उभा राहोनी प्रतीभ । भीमातीरीं पंढरीये ॥ १५ ॥ नमो ऐशिया रूपेशा । नमो त्रैलोक्यविस्तारठसा । नमो आदिपरेशा । जगदादीशा युगादि ॥ १६ ॥ नमो पुरुषो-त्तम परेशा । नमो सकळही उदासा । करूनि जीवरूप ठसा । नांदसी तूं चराचरीं ॥ १७ ॥ मधुसूदना तुज नमो । मधुमाधवा हृदयरमो । नमो मधुरगीततमो । माजघरीं आत्मयाचिये ॥ १८ ॥ त्रिविधतिमिरनाशा । परमपरमानंदउल्हासा । नमो पुरविसी आशा । हरिभक्ताची श्रीहरी ॥ १९ ॥ नमो वासनाचक्रचाळी । नमो तंडनितंडगली । नमो सर्वेही हारिली । प्रपंचरचना ॥ २० ॥ नमो श्रीधर श्रीकर । नमो सर्वसंग निर्विकार । नमो निष्कृतिनिकार । हरिसी नामें एक ॥ २१ ॥ नमो शांतिदयाक्षमा । नमो कृपाकर पुरुषोत्तमा । नमो कासव-दृष्टीसमा । निष्कलंकनाथा ॥ २२ ॥ नमोऽविद्याविश्वायछेदका ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नमो एकार्णवपावका। नमो द्वादशअर्का। सुभापका वेदवक्त्या ॥ २३ ॥ नमो चित्तचकोरहर्त्या। नमो सर्वकारणकार्यकर्त्या। नमो तुजवांचोनी सत्या। विवेक प्रत्यया पैं नये ॥ २४ ॥ नमो अद्वैत अनंता। नमो निर्द्वंद्वभोक्ता। नमो नित्यानित्यस्मरता। तुज नमो नमो ॥ २५ ॥ नमो दुर्गतीहरणा। नमो सर्वहरण-भरणा। नमो सर्वदुष्टनिवारणा। भयहरणा जगदीशा ॥२६॥ नमो शिवशक्तिसमलिंगा। नमो भक्षक काळवेगा। रुद्रादित्या वसु पैं गा। सम सर्वांगा परमपरेशा ॥ २७ ॥ नमो कृत्रिमदहना। नमो कृशकरणहरणा। नमो प्रतिपाळकरणा। नारायणा तुज नमो ॥ २८ ॥ नमो इंद्रियें नियंत्या। नमो प्रपंच अकृत्या। नमो दीनादित्या। सकळवृद्धि तूंची ॥ २९ ॥ नमो अवधूत-दत्ता। नमो अपरमितासिता। नमो सर्वांगुष्ठसत्ता। तूं चाळिता हृषिकेशीं ॥ ३० ॥ नमो दुष्टदर्पादर्पा। नमो चमत्कार गंगा सर्पा। नमो नमो हरणपापा। नमो स्वल्पारामकृष्णा ॥ ३१ ॥ नमो चतुर वेददीप्ता। नमो हरणकारण तूं सुप्ता। जागृतीस्वप्न-गुप्ता। सत्य सुप्ता महाविष्णु ॥३२॥ नमो देवेश्वरसूक्ता। महा-मोहामहाहर्ता। मंदमंदनियंता। नमो नारायणा ॥ ३३ ॥ स्थिरनिरनिर्झरा। नमो विद्वद अनुकारा। नमो विवेकसागरा। महानादा ॥ ३४ ॥ नमो मुखदंत सदना। नमो भक्षकभुवना। शुक्लांबर शुक्लवर्णा। दयाघना गुणनिधीं ॥ ३५ ॥ मृतामृता नमो नमो। नमो श्रुतिशास्त्रसमो। नमो हा गर्व नमो। पद्म-गर्भानंतानंदा ॥ ३६ ॥ नमो चिदाकाशव्याप्ता। चित्सत्ता

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चळणासत्ता । चित्स्वरूपादिरूपा । भुवनदीपा महामूर्ति ॥३७॥ नमो एकएकार्णव । नमो कल्पादि गुणवैभव । नमो सकळ हे दैव । हे भाव पै तुझे ॥ ३८ ॥ गोगोपाळ नमो नमो । गोविंद गुण विष्णुधर्मो । नमो चित्त चिंतनीं रमो । सर्वकाळ तुझ्या चरणीं ॥ ३९ ॥ ध्वजवज्रांकुशा । ध्वजनीळविकाशा । ध्वजांबरा अष्टादिशा । निळिमा भासती श्यामांकिता ॥ ४० ॥ सुषुप्तीचें जें सत्य । तें नमो तुज कृत्य । असो जसें अमित्य । तें तें क्षमा करीं स्वामी ॥४१॥ नमो निर्धारनियंता । नमो सुस्वरूपदाता । नमो आलिया पदार्था । क्षमा करीं स्वामी ॥ ४२ ॥ नमो चित्तविभ्रमा । नमो धार्य धैर्य नमा । नमो पुराणपुरुषोत्तमा । पाहें कांसपदृष्टीं ॥ ४३ ॥ पैसायदाना नमो । परमपरेशा नमो । ध्यानांतर नमो । तुझ्या चरणीं केशवा ॥ ४४ ॥ आग्रहनिहंत्या नमो । सुग्रह परी नमो । अनंत नित्यधर्मो । वैकुंठ गुणग्राम नमोनमस्ते ॥ ४५ ॥ आत्मादृश्य दृश्यमाना । द्रष्टादृश्य नित्यघना । सुस्वरूपा जगज्जीवना । तुज नमो स्वामी ॥४६॥ दीप्ता दृश्य अदृश्य । जीवन दिसशी सादृश्य । जीवमय हें भाष्य । तुज नमो ॥ ४७ ॥ परमपरब्रह्मा । आदिब्रह्मा तूं रामा । भक्तालागीं तूं साउमा । तुज नमो ॥ ४८ ॥ नमो नमो एकतत्त्वा । बाह्यमुद्रा शुद्धसत्वा । योगारूढ परतत्त्वा । सबाह्य पावसी तुज नमो ॥ ४९ ॥ वेदादिपरमवक्ता । वेदादि तूंचि कर्ता । तुजवांचोनी सर्व सत्ता । नमो भोक्ता न देखो ॥ ५० ॥ ज्योतिर्मय

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

रूप तुझें । सर्वतत्त्वा तूंच बीज । नमो तूंचि सहज । पुढती पुढती नमो नमो ॥५१॥ परब्रह्मपरात्पर । परमतत्त्व परमसार । परमगुह्य परमविचार । तुज नमो नारायणा ॥ ५२ ॥ घिघड विघड सुघड । जाडाजाड अवघड । द्वैताद्वैत जोडाजोड । कर्ता कार्यंता तुज नमो ॥ ५३ ॥ संख्यारहित जीवना । असंख्य जीवपाळणा । नमो तुज संजीवना । पुंडलिकधना पांडुरंगा ॥ ५४ ॥ निर्गुण सगुणरूपा । देवादेव तूं सोपा । तुझी झालिया कृपा । नमन बापा तुझिया चरणीं ॥५५॥ नमो नमो तारका । तूं ब्रह्मनामविशेखा । नमो तुजवांचोनी सखा । योगियांसी पै नाहीं ॥ ५६ ॥ युगादि युगत्रय । युग योग योगमय । हे तुज पासाव होय । ऐशिया तुज नमो ॥ ५७ ॥ नमो नमो नम । नाहीं नाहीं तुजसी सम । ऐसा परापश्यंति नेम । वदलिया चारी ॥ ५८ ॥ चहूंमुक्तिपरतत्त्वा । पंचभु जो बद्धसत्वा । षड्‌मार्ग गुणसत्वा । ग्रास न करिसी तुज नमो ॥ ५९ ॥ चिद्रूद चिंद्विलासा । भानुबिंबा प्रतिप्रकाशा । नमो तेजतेजसा । आदि-सूर्या ॥६०॥ ऐसा चहुं ग्रंथींचा क्लेशु । वाउगाची वाहे सोसु । तिमिर त्रिगुण असोसु । तो तूं सत्यांशु तोडी माझा ॥ ६१ ॥ साही नाडी चक्रभ्रमें । वाहतां इंद्रियांचीं ग्रामें । आडखळांनीं साउमे । नये ऐसें करी नमो ॥ ६२ ॥ बाध्य बाधा कर्मांची । सर्वसत्ता या भ्रमाची । नमन करूनिया तुमची । तुम्हांसी अर्पिली स्वामी ॥ ६३ ॥ यमधर्माचिया सत्ता । कर्मधर्माचिया पंथा । कर्मधर्म तो विधाता । ऐशिया नेमिता तुज अर्पिला

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

॥ ६४ ॥ दमशमसमान । इडापिंगळासुषुम्न । साही चक्रें दरुपण । तुझीं तुज अर्पिलीं ॥६५॥ मनश्रवनयोगधारण । तूं याशीं पै कारण। समतुके अवघे गुण। तुझ्या चरणीं निक्षेपिले ॥६६॥ हे भूतभौतिक प्रचंड । जन्मउत्पत्तीचे अंड । जन्मजुगादि ब्रह्मांड । खंडाविखंड तूं जाणता ॥ ६७ ॥ प्रचुरचर्या चित्ताची । धावन वळण आंकोचनाची । सूचना जे चमत्काराची । तेही अर्पण तुज सदा ॥ ६८ ॥ निर्वासना वासनायुक्त । गुंतलें राहिलें जेथें चित्त । तेथें तूं धांवोनी अनंत । सोडविसी वासना मम ॥ ६९ ॥ सूक्ष्म अविचार बोला । बोलिं नातुडे व्यर्थ गेला । तो म्यां बुझावोनि संबोखिला । मग लाविला तुझ्या पंथीं ॥ ७० ॥ नित्यधर्माचिया वोळी । चळल्या चुकल्या कोण चाळी । त्यासी वेद तुझा प्रतिपाळी । त्या तूं सांभाळी परब्रह्म ॥ ७१ ॥ श्रुतिस्मृतींचीं वचनें । त्याची आंगरींगमार्गस्थानें । कीर्तनीं गुणवर्णनें । हेही नारायणें अंगिकारावीं ॥ ७२ ॥ उदंडविदंडवितंड । देहद्वारा अभंड । जे जे दिसे भ्रंश अंडांड । ते शुभ्रचंड सांभाळी ॥ ७३ ॥ देहभरणाची ममता । देह पोखिती जे सत्ता । त्याहीवरील सूक्ष्मता । तें कृपावंता सांभाळी ॥ ७४ ॥ तिमिर त्रिगुण अवघें । जें जें आलें असेल वोघें । तें तें मी नेघे । तूं सकळ वेगें सांभाळीं ॥ ७५ ॥ योनीचियां कष्टा । वरी वासना होती भ्रष्टा । संसार हा कटकटा । रतलों तुझ्या चरणीं ॥ ७६ ॥ विद्यावयसाकुल । ब्रह्मकर्म आचार्यशीळ । गेले आले विन्हळ । ते तूं दयाळ सांभाळीं ॥ ७७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाना जन्म अवतार। नाना शास्त्रांचे निर्धार। नाना गोत्र उच्चार। तुझा विचार तूं जाणसी ॥ ७८ ॥ पाठ वेदादि वचनें। शास्त्रदृष्टि अवलोकनें। कीर्तनीं गुण वानणें। हींहि नारायणें अंगिकारावीं ॥७९॥ सर्वमय सर्व सपाट। त्यावरीं करूनि चालिलों वाट। चंद्रसूर्यनक्षत्रें घनदाट। करूनि एकवटांपायरी ॥८०॥ सर्व अंडांचें ब्रह्मांड। मी न म्हणे अंडाअंड। खंडे करूनियां निखंड। प्रचंड मी तुजसी बोले ॥८१॥ रोमरंध्रीं ब्रह्मांडें। सकल विराट-मय खंडे। ऐसीं महत्भूतें प्रचंडें। तुझ्या अंगीं दातारा ॥८२॥ तूं विश्वरूपपटाची घडी। तारकब्रह्माचि उघडी। मी या निज-दृष्टीनें चोखडी। तुझी मूर्ति न्याहाळिन ॥ ८३ ॥ तें न सुटे निजकळे। येऱ्हवीं हें नाकळे। तुझियें कृपागुणें आकळे। तुझिया दासा निजभक्ता ॥ ८४ ॥ अनंत त्या नामाचा संकेत। मन मुरालें जेथें निर्धुत। तूंपणें परमाद्भुत। परमानंदा ॥८५॥ गुणाग्र गोसावी राम। गुणसमुद्र तूं गुणग्राम। सकळभूतांचा विश्राम। तुज नमो ॥ ८६ ॥ नमन केलिया विभूती। चित्त रमलें झाली विश्रांति। तुज देखिलिया श्रीपती। न राहे चित्तीं तळमळ ॥ ८७ ॥ नमन हेंचि थोर दिसे। एऱ्हवीं तरंगाकार भासे। देखिलें तितुकें नासे। नैश्वर्य ऐसी श्रुति बोले ॥ ८८ ॥ नमन हेंचि परम। नमन हें सुवर्म। नमन हेंचि आत्माराम। करूं निघाले ॥ ८९ ॥ नमन हाचि अनुभव। नमन हाचि मुख्य भाव। नमन हाचि पैं देव। देवाधिदेव तूं पावसी ॥९०॥ नमन हेंचि श्रेष्ठपीठा। नेतसे तुझिया वाटा। तुज ऐसा श्रेष्ठा।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मग या वाटा करावित्र ॥ ९१ ॥ नमन हेंचि तारक । नमन हाचि विवेक । नमनेवीण त्रैलोक्य । आडमार्गीं रिघताती ॥९२॥ नमन लटिकें नव्हे नव्हे । नमन भलतियांसीं न साहे । जें साह्य सखा होय । श्रीनिवृत्ति ॥ ९३ ॥ नमनाएवढा मंत्र । नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र । विचारलक्षणपात्र । तोचि जाणें येथींचे ॥ ९४ ॥ नमन करी ब्रह्मा श्रेष्ठ । नाभिककमळीं धरी वैकुंठ । नमन करी नीलकंठ । तीथें मस्तकीं वंदिती ॥ ९५ ॥ इंद्रचंद्रमहेंद्र थोर । नमनेवीण नैश्वर । अंडामध्यें चराचर । नमनेवीण न तरती ॥ ९६ ॥ श्रीगुरुकृपा जैं होय । तैं नमनाची ऐसी सोय । पाऊनि सुगम उपाय । नमो नमस्ते तुज ॥ ९७ ॥ नमस्ते नमस्ते नमस्ते । पुढती पुढती नमस्ते । समाधिसुख अस्ते । नमोनमः करितां ॥९८॥ नमो नमो आदिपीठा । शिवादिगुणवरिष्ठा । येथें येऊनि वैकुंठा । समाधिशेज घातली॥९९॥ महाविष्णु तूं योगरूपा । महारूपाचिया स्वरूपा। महादित्या अरूपा । कोटिसूर्यतेजसा ॥१००॥ शंखचक्रानें मंडित । करकमळ तुझें मिरवत । पदक हृदयावरी शोभत । आणि श्रीवत्सलांछन ॥१॥ अनंतबाहूचा मेळ । तो तूं चतुर्भुज गोपाळ । मुकुट विराजित तेजाळ । कोटिसूर्याहूनि प्रभा ॥२॥ पीतांबर माळ कंठीं । सर्वांगीं चंदनाची उटी । हिरे माणिकें कटितटीं । अनंतकळा फांकती ॥३॥ क्षुद्रघंटिकांच्या वोळी । घणघणाट तयां तळीं । देहुडा पाउली निश्चळीं । वेणु वाजविसी सुस्वरें ॥४॥ रुणझुण रुणझुण । ऐसा नाजविसी वेणु ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सुंदर तूं श्यामतनू । अलंकापुरीं उभा असती ।।५।। सभोंवतें गोपाळ तुझे । ते अंतरंग सखे माझे । पुंडरिक तरी सहजें । प्राणसखा पैं माझा ।।६।। ऐसा ज्ञान उद्बोध बोलें । ज्ञानाज्ञान निरसलें । विज्ञानहि हारविलें । दृश्यदृष्टेपणेंसी ।।७।। बापरखुमादेवीवरु । समाधि देऊनिया स्थिरु । वरी ठेऊनियां अभयकरु । वर देऊनि राहिला ।।१०८।।

इति श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत नमनस्तोत्र समाप्त

श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ

१ सुंदर तें ध्यान उभे विटेवरी । कर कटेवरी ठेऊनिया ।।१।। तुळसीहार गळां कासे पीतांबर ।। आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।२।। मकर कुंडलें तळपतीं श्रवणीं ।। कंठीं कौस्तुभमणी विराजीत ।।३।। तुका म्हणे माझें हेंचि सर्वसुख ।। पाहीन श्रीमुख आवडीनें ।।४।।

२ देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं ।। तेणें मुक्ति चारी साधियेल्या ।।१।। हरिमुखें म्हणा हरिमुखें म्हणा ।। पुण्याची गणना कोण करी ।। २ ।। असोनि संसारीं जिव्हे वेगु करी ।। वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।। ३ ।। ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें ।। द्वारकेचे राणे पांडवां घरीं ।। ४ ।।

३ चहूं वेदीं जाण साहि शास्त्रीं कारण ।। अठराहि पुराणें हरिसी गाती ।। १ ।। मंथुनी नवनीता तैसें घे अनंता ।। वाया व्यर्थ कथा सांडी मार्गु ।।२।। एक हरी आत्मा जीवशिवसमा ।।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

वायां तूं दुर्गमा न घालीं मन ॥ ३ ॥ ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ ॥ भरला घनदाट हारि दिसे ॥ ४ ॥

४ त्रिगुण असार निर्गुण हें सार ॥ सारासारविचार हरिपाठ ॥ १ ॥ सगुण निर्गुण गुणाचे अगुण ॥ हरीवीण मन व्यर्थ जाय ॥२॥ अव्यक्त निराकार नाहीं त्या आकार ॥ जेथोनी चराचर हरिसी भजे ॥ ३ ॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ॥ अनंत जन्मोनी पुण्य होय ॥ ४ ॥

५ भावेंवीण भक्ति भक्तीवीण मुक्ति ॥ बळेंवीण शक्ति बोलूं नये ॥ १ ॥ कैसेनि दैवत प्रसन्न त्वरीत ॥ उगा राहे निवांत शिणसी वायां ॥२॥ सायास करिसी प्रपंच दिनानिशीं ॥ हरीसी न भजसी कोण्या गुणें ॥ ३ ॥ ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें ॥ तुटेल धरणें प्रपंचाचें ॥ ४ ॥

६ योगयागविधी येणें नव्हे सिद्धी ॥ वायांचि उपाधी दंभधर्म ॥ १ ॥ भावेंवीण देव नकळे निःसंदेह ॥ गुरुविण अनुभव कैसा कळे? ॥२॥ तपेंविण दैवत दिधल्यावीण प्राप्त ॥ गुजेंवीण हित कोण सांगे ॥३॥ ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ॥ साधूंचे संगतीं तरणोपाय ॥ ४ ॥

७ साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला ॥ ठायींच मुराला अनुभव ॥ १ ॥ कापुराची वाती उजळली ज्योती ॥ ठायींच समाप्ती झाली जैशी ॥ २ ॥ मोक्ष रेखें आला भाग्यें विनटला ॥ साधूंचा अंकिला हरिभक्त ॥ ३ ॥ ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनीं ॥ हारि दिसे जनींवनीं आत्मतत्त्वीं ॥ ४ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

८ पर्वताप्रमाणें पातक करणें ॥ वज्रलेप होणें अभक्तांसी ॥१॥ नाहीं ज्यासी भक्ति तो पतित अभक्त ॥ हरिसी न भजत दैवहत ॥२॥ अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैसेनि गोपाळ पावे हरि? ॥ ३ ॥ ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ॥ सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥ ४ ॥

९ संताचे संगती मनोमार्गे गती ॥ आकळावा श्रीपती येणें पंथें ॥१॥ रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ॥ आत्मा जो शिवाचा राम जप ॥ २ ॥ एकतत्त्वनाम साधिती साधन ॥ द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥ नामामृत गोडी वैष्णवां लाधली॥ योगियां साधली जीवनकळा ॥४॥ सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला ॥ उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥ ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ ॥ सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥ ६ ॥

१० विष्णूवीण जप व्यर्थ त्याचें ज्ञान ॥ रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥ उपजोनि करंटा नेणें अद्वैतवाटा ॥ रामकृष्णीं पैठा कैसेनि होय? ॥२॥ द्वैताची झाडणी गुरुवीण ज्ञान ॥ तया कैचें कीर्तन घडेल नामीं? ॥३॥ ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान ॥ नामपाठ मौन प्रपंचाचें ॥४॥

११ त्रिवेणी संगमीं नानातीर्थें भ्रमी ॥ चित्त नाहीं नामीं तरि तें व्यर्थ ॥१॥ नामासी विन्मुख तो नर पापिया ॥ हरिवीण धांवया नपवे कोणी ॥ २ ॥ पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक ॥ नामें तिन्ही लोक उद्धरती ॥३॥ ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें ॥ परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥ ४ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१२ हरि उच्चारणीं अनंत पापराशी ।। जातील लयासी क्षणमात्रें ।।१।। तृण अग्निमेळें समरस झालें ।। तैसें नामें केलें जपतां हरी ।।२।। हरि उच्चारण मंत्र हा अगाध ।। पळे भूत-बाधा भेणें तेथें ।।३।। ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ ।। न करवे अर्थ उपनिषदां ।।४।।

१३ तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धी ।। वायांचि उपाधि करिसी जना ।।१।। भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे ।। करतळीं आवळे तैसा हरी ।।२।। पारियाचा रवा घेता भूमीवरी ।। यत्न परोपरी साधन तैसें ।।३।। ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण ।। दिधलें संपूर्ण माझ्या हातीं ।।४।।

१४ समाधी हरीची समसुखेंवीण ।। न साधेल जाण द्वैतबुद्धी ।। १ ।। बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें ।। एक्या केशीराजें सकळ सिद्धी ।। २ ।। ऋद्धिसिद्धि निधी अवघीच उपाधी ।। जंव त्या परमानंदीं मन नाहीं ।।३।। ज्ञानदेवीं रम्य रमलें समाधान ।। हरीचें चिंतन सर्वकाळ ।।४।।

१५ नित्य सत्यामित हरिपाठ ज्यासी ।। कळिकाळ त्यासी न पाहे दृष्टी ।।१।। रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप ।। पापाचे कळप पळती पुढें ।।२।। हरिहरिहरि हा मंत्र शिवाचा ।। म्हणती जे वाचा तयां मोक्ष ।।३।। ज्ञानदेवा पाठ नारायण नाम ।। पाविजे उत्तम निजस्थान ।।४।।

१६ एक नाम हरी द्वैतनाम दुरी ।। अद्वैतकुसरी विरळा जाणे ।।१।। समबुद्धि घेतां समान श्रीहरी ।। शमदमावैरी हरी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

झाला ॥२॥ सर्वांघटीं राम देहादेहीं एक ॥ सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मीं ॥३॥ ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा ॥ मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

१७ हरी बुद्धी जपे तो नर दुर्लभ ॥ वाचेसि सुलभ रामकृष्ण ॥१॥ रामकृष्ण नामीं उन्मनी साधिली ॥ तयासी लाधली सकळसिद्धि ॥ २ ॥ सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले ॥ प्रपंचीं निवाले साधुसंगें ॥३॥ ज्ञानदेवीं नाम रामकृष्ण ठसा ॥ येणें दशदिशा आत्माराम ॥४॥

१८ हरिपाठ कीर्तिमुखें जरी गाय ॥ पवित्राचि होय देह त्याचा ॥१॥ तपाचे सामर्थ्यें तपिन्नला अमूप ॥ चिरंजीव कल्प वैकुंठीं नांदे ॥२॥ मातृ पितृ भ्राता सगोत्र अपार ॥ चतुर्भुज नर होऊन ठेले ॥३॥ ज्ञानगूढगम्य ज्ञानदेवा लाधलें ॥ निवृत्तीनें दिलें माझ्या हातीं ॥४॥

१९ हरिवंशपुराण हरिनामसंकीर्तन ॥ हरिवीण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥ तया नरा लाधलें वैकुंठ जोडलें ॥ सकळही घडलें तीर्थाटन ॥२॥ मनोमार्गें गेला तो येथें मुकला ॥ हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥ ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी ॥ रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥४॥

२० वेदशास्त्रप्रमाण श्रुतीचें वचन ॥ एक नारायण सार जपा ॥१॥ जपतपकर्म हरीविण धर्म ॥ वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥ हरिपाठें गेले ते निवांतचि ठेले ॥ भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥ ज्ञानदेवीं मंत्र हरिनामाचें शस्त्र ॥ यमें कुळगोत्र वर्जियेलें ॥४॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२१ नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ॥ पापें अनंत कोडी गेलीं त्यांचीं ॥१॥ अनंत जन्मांचें तप एक नाम ॥ सर्वमार्ग सुगम हरिपाठ ॥२॥ योगयागक्रिया धर्माधर्ममाया ॥ गेले ते विलया हरिपाठें ॥३॥ ज्ञानदेवीं यज्ञयागक्रियाधर्म ॥ हरी-विण नेम नाहीं दुजा ॥४॥

२२ काळवेळ नाम उच्चारितां नाहीं ॥ दोन्ही पक्ष पाही उध्दरती ॥१॥ रामकृष्ण नाम सर्वदोषां हरण ॥ जडजीवां तारण हरि एक ॥२॥ हरिनाम सार जिव्हा या नामाची ॥ उपमा त्या दैवाची कोण वानी ॥३॥ ज्ञानदेवा सांग झाला नामपाठ ॥ पूर्वजां वैकुंठ मार्ग सोपा ॥४॥

२३ नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ ॥ लक्ष्मीवल्लभ तया-जवळी ॥१॥ नारायण हरि नारायण हरि ॥ भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥ २ ॥ हरिवीण जन्म तो नर्कचि पै जाणा ॥ यमाचा पाहुणा प्राणी होय ॥३॥ ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड ॥ गगनाहूनि वाड नाम आहे ॥४॥

२४ सात पांच तीन दशकांचा मेळा ॥ एकतत्त्वीं कळा दावी हरी ॥१॥ तैसें नव्हे नाम सर्वमार्गां वरिष्ठ ॥ येथें कांहीं कष्ट न लगती ॥२॥ अजपा जपणें उलट प्राणाचा ॥ तेथेंही मनाचा निर्धारु असे ॥३॥ ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ ॥ रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

२५ जप तप कर्म क्रिया नेम धर्म ॥ सर्वांघटीं राम भाव-शुद्ध ॥१॥ न सोडी रे भावो टाकी रे संदेहो ॥ रामकृष्णीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

टाहो नित्य फोडी ॥ २ ॥ जातवित्तगोत कुळशीळमात ॥ भजे कां त्वरित भावनायुक्त ॥३॥ ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ॥ तेणें वैकुंठभुवनीं घर केलें ॥ ४ ॥

२६ जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं ॥ उच्चारणीं पाहीं मोक्ष सदां ॥ १ ॥ नारायण हरी उच्चार नामाचा ॥ तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥ तेथील प्रमाण नेणवे वेदांसी ॥ तें जीवजंतूंसी केंवि कळे ॥३॥ ज्ञानदेवा फळ नारायणपाठ ॥ सर्वत्र वैकुंठ केलें असें ॥४॥

२७ एकतत्त्वनाम दृढ धरी मना ॥ हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥ तें नाम सोपारें रामकृष्ण गोविंद ॥ वाचेशीं सद्गद जपे आधीं ॥२॥ नामापरतें तत्त्व नाहींरे अन्यथा ॥ वायां आणिका पंथा जाशी झणीं ॥३॥ ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरीं ॥ धरोनी श्रीहरि जपे सदां ॥४॥

२८ सर्वसुख गोडी सर्वशास्त्र निवडी ॥ रिकामा अर्धघडी राहूं नको ॥ १ ॥ लटिका व्यवहार सर्व हा संसार ॥ वायां येरझार हरीविण ॥ २ ॥ नाममंत्र जप कोटि जाईल पाप ॥ कृष्णनामीं संकल्प धरूनि राहे ॥ ३ ॥ निजवृत्ति काढी सर्व माया तोडी ॥ इंद्रियां सवडी लपों नको ॥ ४ ॥ तीर्थव्रतीं भाव धरीरे करुणा ॥ शांतिदयापाहुणा हरि करी ॥ ५ ॥ ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान ॥ समाधिसंजीवन हरिपाठ ॥ ६ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२९ नामसंकीर्तन साधन पैं सोपें ॥ जळतील पापें जन्मांतरींचीं ॥१॥ न लगती सायास जावें वनांतरा ॥ सुखें येतो घरा नारायण ॥२॥ ठायींच बैसोनी करा एकचित्त ॥ आवडी अनंत आळवावा ॥३॥ रामकृष्णहरि विठ्ठल केशवा ॥ मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥ यावीण असतां आणिक साधन ॥ वाहातसें आण विठोबाची ॥५॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी ॥ शाहाणा तो धणी घेतो येथें ॥६॥

३० देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं ॥ तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण करी ॥२॥ असोनि संसारीं जिव्हे वेगु करी ॥ वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥ ज्ञानदेव म्हणे व्यासाचिये खुणें ॥ द्वारकेचे राणे पांडवां घरीं ॥४॥

३१ सत्य गुरुरायें कृपा मज केली ॥ परि नाहीं घडली सेवा कांहीं ॥१॥ सांपडविलें वाटे जातां गंगास्नाना ॥ मस्तकीं तो जाणा ठेविला कर ॥ २ ॥ भोजना मागती तूप पावशेर ॥ पडिला विसर स्वप्नामाजीं ॥३॥ काय कळे उपजला अंतराय ॥ म्हणोनियां काय त्वरा झाली ॥४॥ राघवचैतन्य केशवचैतन्य ॥ सांगितली खूण माळिकेची ॥ ५ ॥ बाबाजी आपुलें सांगितलें नाम ॥ मंत्र दिला रामकृष्णहरि ॥६॥ माघो शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार ॥ केला अंगीकार तुका म्हणे ॥ ७ ॥

३२ माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुरावो ॥१॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नोहे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गुंफा कांहीं कोठें ॥२॥ जातीपुढें एक उतरले पार । हा भवसागर साधुसंत ॥३॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटे ॥४॥ तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरू पांडुरंग ॥५॥

३३ घालूनियां भार राहिलों निश्चिंती । निरविलें संतीं विठोबासी ॥१॥ लावूनियां हात कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥२॥ कटीं कर समचरण साजिरे । राहिला भीवरे तीरीं उभा ॥३॥ खुंटले सायास आणीक या जीवा । [illegible] केशवा पाय तुझे ॥४॥ तुज वाटे आतां तें करीं अनंता ।

२४ वा अभंग चुकून पडला आहे त्याचे जागीं हा अभंग म्हणावा—

२४ माझ्या विठोबाचा कैसा प्रेमभाव । आपणचि देव होय गुरु ॥ १ ॥ पढिये देहभाव पुरवी वासना । अंतीं तें आपणापाशीं न्यावे ॥ २ ॥ मागें पुढें उभा राहे सांभाळित । आलिया आघात निवारावे ॥ ३ ॥ योगक्षेम त्याचे जाणे जडभारी । वाट दावी करीं धरूनियां ॥ ४ ॥ तुका म्हणे नाहीं विश्वास ज्या मनीं । पहावें पुराणीं विचारूनी ॥ ५ ॥

सहजा[illegible] कृपा केली गयनीनाथा ॥२॥ वैराग्य तापला स[illegible] ठेला जो लाधला शांतीसुख ॥३॥ निर्द्वंद्व निःशंक विचरतां महीं । सुखानंद हृदयीं स्थिरावला ॥४॥ विरक्तीचें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२९ नामसंकीर्तन साधन पैं सोपें ॥ जळतील पापें जन्मांतरींचीं ॥१॥ न लगती सायास जावें वनांतरा ॥ सुखें येतो घरा नारायण ॥२॥ ठायींच बैसोनी करा एकचित्त ॥ आवडी अनंत आळवावा ॥३॥ रामकृष्णहरि विठ्ठल केशवा ॥ मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥ यावीण असतां आणिक साधन ॥ वाहातसें आण विठोबाची ॥५॥ तुका म्हणे सोपें आहे सर्वांहूनी ॥ शाहाणा तो धणी घेतो येथें ॥६॥

३० देवाचिये द्वारीं उभा क्षणभरीं ॥ तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥ हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा । पुण्याची गणना कोण

वेदशास्त्र उभा

खुणें ॥ द्वारके

३१ सत्य

सेवा कांहीं ॥

तो जाणा ठी

पडिला विसर

म्हणोनियां क

सांगितली खू

नाम ॥ मंत्र दिला रामकृष्णहरि ॥६॥ माघ शुद्ध दशमी पाहुनी गुरुवार ॥ केला अंगीकार तुका म्हणे ॥ ७ ॥

३२ माझिये मनींचा जाणोनियां भाव । तो करी उपाव गुरुरावो ॥१॥ आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणें नोहे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गुंफा कांहीं कोठें ॥२॥ जातीपुढें एक उतरले पार । हा भव-सागर साधुसंत ॥३॥ जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटे ॥४॥ तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपेचा सागरू पांडुरंग ॥५॥

३३ घालूनियां भार राहिलों निश्चिंती । निरविलें संतीं विठोबासी ॥१॥ लावूनियां हात कुरवाळिला माथा । सांगितलें चिंता न करावी ॥२॥ कटीं कर समचरण साजिरे । राहिला भीवरे तीरीं उभा ॥३॥ खुंटले सायास आणीक या जीवा । [illegible] केशवा पाय तुझे ॥४॥ तुज वाटे आतां तें करीं अनंता । [illegible]हणे संतां लाज माझी ॥५॥

[illegible] माझिये मनींचा जाणा हा निर्धार । जिवासी उदार [illegible] आतां ॥१॥ तुजविण दुजें न धरी आणिका । भय [illegible]क्का टाकियेली ॥२॥ ठायींचा संबंध तुज मज होता । [illegible]नंता केला संतीं ॥ ३ ॥ जिवभाव तुझ्या ठेवियेला [illegible] हेंचि आतां नाहीं लाज तुम्हां ॥ ४ ॥ तुका म्हणे घातला हवाला । न सोडीं विठ्ठला पाय तुझे ॥ ५ ॥

३५ आदिनाथ उमा बीज प्रगटिलें । मच्छिंद्रा लाधलें [illegible]जस्थिती ॥ १ ॥ तेचि प्रेममुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गयनीनाथा ॥२॥ वैराग्यें तापला सप्रेमें निवाला । ठेला जो लाधला शांतीसुख ॥३॥ निर्द्वंद्व निःशंक विच-रतां महीं । सुखानंद हृदयीं स्थिरावला ॥४॥ विरक्तीचें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पात्र अन्वयाचें सुख ।। येऊनि सम्यक अनन्यता ।।५।। निवृत्ती गयनी कृपा केली पूर्ण । कूळ हें पावन कृष्णनामें ।।६।।

३६ आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा ।। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य ।।१।। मच्छिंद्रानें बोध गोरक्षासी केला ।। गोरक्ष बोळला गयनीप्रती ।।२।। गयनीप्रसादें निवृत्ती दातार ।। ज्ञानदेवा सार चोजविलें ।।३।।

३७ अवघाचि संसार सुखाचा करीन ।। आनंदें भरीन तिन्ही लोक ।।१।। जाईन गे माये तया पंढरपुरा ।। भेटेन माहेरा आपुलिया ।।२।। सर्व सुकृताचें फळ मी लाहीन ।। क्षेम मी देईन पांडुरंगा ।।३।। बापरखुमादेविवरु विठ्ठलाची भेटी ।। आपुलिये संवसाटी करूनि ठेला ।।४।।

।। इति श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत हरिपाठ समाप्त ।।

श्रीएकनाथमहाराजकृत हरिपाठ

१ हरीचिया दासां हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक ।। १ ।। हरि मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ।। २ ।। जन्म घेणें लागे वासनेच्या संगें । तेचि झाली अंगें हरिरूप ।।३।। हरिरूप झालें जाणणें हरपलें । नेणणें तें गेलें हरीचे ठायीं ।। ४ ।। हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एकाजनार्दनीं हरि बोला ।। ५ ।।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२ हरि बोला हरि बोला नाहीं तरी अबोला। व्यर्थ गलबला करूं नका ॥ १ ॥ नको नको मान नको अभिमान। सोडी मीतूंपण तोचि सुखी ॥२॥ सुखी जेणें व्हावें जग निववावें। अज्ञानी लावावे सन्मार्गासी ॥ ३ ॥ मार्ग जया कळे भाव भक्तिबळें। जगाचिये मळें न दिसती ॥ ४ ॥ दिसती जनीं वनीं प्रत्यक्ष लोचनीं। एकाजनार्दनीं ओळखिलें ॥ ५ ॥

३ ओळखिला हरि धन्य तो संसारीं। मोक्ष त्याचे घरीं सिद्धीसहित ॥१॥ सिद्धि लावी पिसे कोण तया पुसे। नेणों राजहंसें पाणी कायी ॥२॥ काय तें करावें संदेही निर्गुण। ज्ञानानें सगुण ओस केलें ॥३॥ केलें कर्म झालें तेंचि भोगा आलें। उपजले मेले ऐसे किती ॥४॥ एकाजनार्दनीं नाहीं यातायाती। सुखाची विश्रांती हरिसंगें ॥५॥

४ जें जें दृष्टीं दिसे तें तें हरिरूप। पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ॥१॥ वैकुंठ कैलासीं तीर्थक्षेत्रीं देव। तयाविण ठाव रिता कोठें ॥२॥ वैष्णवांचें गुह्य मोक्षाचा एकांत। अनंताचा अंत पाहतां नाहीं ॥३॥ आदि मध्य अंतीं अवघा हरि एक। एकचि अनेक एक हरी ॥४॥ एकाकार झाले जीव तेचि दोन्ही। एकाजनार्दनीं ऐसें केलें ॥५॥

५ नामाविण मुख सर्पाचें तें बीळ। जिव्हा नव्हे काळसर्प आहे ॥१॥ वाचा नव्हे लांब जळो त्याचें जिणें। यातना भोगणें यमपुरी ॥२॥ हरीविण कोणी नाहीं सोडविता। पुत्र बंधु कांता संपत्तीचे ॥३॥ अंतकाळीं कोणी नाहीं या सांगाती।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

साधूचे संगती हरि जोडे ॥४॥ कोटिकुळें तारी हरि अक्षरें दोनी । एकाजनार्दनीं पाठ केली ॥५॥

६ धन्य माय व्याली सुकृताचें फळ । फळ तें निर्फळ हरीविण ॥१॥ वेदाचेंहि बीज हरि हरि अक्षरें । पवित्र सोपारें हेंचि एक ॥२॥ योगयागव्रत नेम धर्म दान । न लगे साधन जपतां हरी ॥३॥ साधनाचें सार नाम मुखीं गातां । हरि हरि म्हणतां कार्यसिद्धी ॥४॥ नित्यमुक्त तोची एक ब्रह्मज्ञानी । एकाजनार्दनी हरि बोला ॥५॥

७ बहुतां सुकृतीं नरदेह लाधला । भक्तीविण गेला अधो-गती ॥१॥ बाप भाग्य कैसें न सरेंचि कर्म । न कळेचि वर्म अरे मूढा ॥२॥ अनेका जन्मांचें सुकृत पदरीं । त्याचे मुखा हरि पैठा होय ॥३॥ राव रंक हो कां उंच नीच याती । भक्तीविण माती मुखीं त्याच्या ॥४॥ एकाजनार्दनीं हरि हरि म्हणतां । मुक्ति सायुज्यता पाठी लागे ॥५॥

८ हरिनामामृत सेवी सावकाश । मोक्ष त्याचे भूस दृष्टी-पुढें ॥१॥ नित्य नामघोष जयाचे मंदिरीं । तेचि काशीपुरी तीर्थक्षेत्र ॥२॥ वाराणशी तीर्थ क्षेत्रा नाश आहे । अविनाशासी पाहे नाश कैंचा ॥३॥ एका तासामाजीं कोटि वेळां सृष्टी । होती जाती दृष्टी पाहे तोची ॥४॥ एकाजनार्दनी ऐसे किती झाले । हरिनाम सेविलें तोचि एक ॥५॥

९ भक्तीविण पशू कशासी वाढला । सटवीनें नेला कैसा नाहीं ॥ १ ॥ काय माय गेली होती भूतापाशीं । हारि नये

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मुखासी अरे मूढा ॥ २ ॥ पातकें कारितां पुढें आहे पुसता । काय उत्तर देतां होशील तूं ॥ ३ ॥ अनेक यातना यम करवील । कोण सोडवील तेथें तुजला ॥४॥ एकाजनार्दनीं सांगताहे तोंडें । आहा वाचा रडे बोलतांची ॥ ५ ॥

१० स्वहिताकारणें संगती साधूची । भावें भक्ति हरीची भेटी तेणें ॥ १ ॥ हरि तेथें संत संत तेथें हरी । ऐसे वेद चारी बोलताती ॥ २ ॥ ब्रह्मा डोळसा तें वेदार्थ नाकळे । तेथें हे आंधळे व्यर्थ होती ॥ ३ ॥ वेदार्थाचा गोवा कन्या अभिलाष । वेदें नाहीं ऐसें सांगितलें ॥ ४ ॥ वेदाचीं हीं बीजाक्षरें हरि दोनी । एकाजनार्दनी हरि बोला ॥ ५ ॥

११ सत्पद तें ब्रह्म चित्पद तें माया । आनंदपदीं जया म्हणती हरी ॥१॥ सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुण निर्गुण हरिपायीं ॥ २ ॥ तत्सदिति ऐसें पैल वस्तुवरी । गीतेमाजीं हरि बोलियेले ॥ ३ ॥ हरिपदप्राप्ति भोळ्या भाविकांसी । अभिमानियांसी गर्भवास ॥ ४ ॥ अस्ति भाति प्रिय ऐशीं पदें तिन्हीं । एकाजनार्दनीं तेंचि झालें ॥ ५ ॥

१२ नाकळे तें कळे कळे तें नाकळे । वळे तें नावळे गुरूविण ॥१॥ निर्गुणीं पावलें सगुणीं भजतां । विकल्प धरितां जिव्हा झडे ॥२॥ बहुरूपी धरी संन्याशाचा वेश । पाहोन तयास धन देती ॥३॥ संन्याशाला नाहीं बहुरूपी याला । सगुणी भजला तेथें पावे ॥४॥ अद्वैताचा खेळ दिसे गुणागुणी । एकाजनार्दनीं बोलियेलें ॥५॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

१३ ओळखिला हरि सांठविला पोटीं । होतां त्याची भेटी दुःख कैंचें ॥१॥ नर अथवा नारी हो कां दुराचारी । मुखीं गातां हरि पवित्र तो ॥२॥ पवित्र तें कुळ धन्य त्याची माय । हरि मुखें गाय नित्य नेमें ॥३॥ काम क्रोध लोभ जयाचे अंतरीं । नाहीं अधिकारी ऐसा येथें ॥ ४ ॥ वैष्णवांचें गुह्य काढिलें निवडुनी । एकाजनार्दनीं हरि बोला ॥५॥

१४ हरि बोला देतां हरि बोला घेतां । हांसता खेळतां हरि बोला ॥१॥ हरि बोला गातां हरि बोला खातां । सर्व कार्य करितां हरि बोला ॥२॥ हरि बोला एकांतीं हरि बोला लोकांतीं । देहत्यागा अंतीं हरि बोला ॥३॥ हरि बोला भांडतां हरि बोला कांडतां । उठतां बैसतां हरि बोला ॥४॥ हरि बोला जनीं हरि बोला विजनीं । एकाजनार्दनीं हरि बोला ॥५॥

१५ एक तीन पांच मेळा पंचविसाचा । छत्तीस तत्त्वांचा मूळ हरी ॥१॥ कल्पना अविद्या तेणें झाला जीव । मायोपाधि शिव बोलिजे रवी ॥ २ ॥ जीव शिव दोनी हरिरूपीं तरंग । सिंधु तो अभंग नेणों हरी ॥ ३ ॥ शुक्तीवरी रजत पाहतां डोळां दिसे । रज्जूवरी भासे मिथ्या सर्प ॥ ४ ॥ क्षेत्रक्षेत्रज्ञाते जाणताती ज्ञानी । एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

१६ कल्पनेपासुनी कल्पिला जो ठेवा । तेणें पडे गोंवा नेणों हरी ॥ १ ॥ दिधल्यावांचूनि फळप्राप्ति कैंची । इच्छा कल्पनेची व्यर्थ बापा ॥ २ ॥ इच्छावें तें जवळी हरीचे चरण । सर्व नारायण देतो तुज ॥ ३ ॥ न सुटे कल्पना अभिमानाची

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

गांठी । घेता जन्म कोटी हरि कैंचा ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं सांपडली खूण । कल्पना अभिमान हरि झाला ॥ ५ ॥

१७ काय नपूंसका पद्मिणीचे सोहळे । वांझेसी डोहळे कैंचे होती ॥ १ ॥ अंधापुढें दीप खरासी चंदन । सर्पा दूधपान करूं नये ॥ २ ॥ क्रोधी अविश्वासी त्यांसी बोध कैंचा । व्यर्थ आपुली वाचा शिणवूं नये ॥ ३ ॥ खळाची संगती उपयोगासी नये । आपणा अपाय त्याचे संगें ॥४॥ वैष्णवीं कुपथ्य टाकिलें वाळूनी । एकाजनार्दनीं तेचि भले ॥ ५ ॥

१८ न जायेचि ताठा नित्य खटाटोप । मंडुकीं वटवट तैसें ते गा ॥ १ ॥ प्रेमावीण भजन नाकाविण मोती । अर्थाविण पोथी वाचुनी काय ॥२॥ कुंकुंवा नाहीं ठाव म्हणे मी आहेव । भावाविण देव कैसा पावे ॥ ३ ॥ अनुतापाविण भाव कैसा राहे । अनुभवें पाहे शोधूनियां ॥ ४ ॥ पाहतां पाहणें गेलें ते शोधुनी । एकाजनार्दनी अनुभविलें ॥ ५ ॥

१९ परिमळ गेलिया वोस फूल देठीं । आयुष्या शेवटीं देह तैसा ॥ १ ॥ घडिघडि काळ वाट याची पाहे । अझूनि किती आहे अवकाश ॥ २ ॥ हाचि अनुताप घेऊनि सावध । कांहीं तरी बोध करीं मना ॥ ३ ॥ एक तास उरला खट्वांग-रायासी । भाग्यदशा कैसी प्राप्त झाली ॥ ४ ॥ सांपडला हरि तयाला साधनीं । एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

२० करा रे बापांनो साधन हरींचें । झणीं करणीचें करूं नका ॥ १ ॥ जेणें नये जन्म यमाची यातना । ऐसिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

साधना करा कांहीं ॥ २ ॥ साधनांचें सार मंत्रबीज हरी। आत्मतत्त्व धरी तोचि एक ॥ ३ ॥ कोटि कोटि यज्ञ नित्य ज्याचा नेम। एक हरिनाम जपतां घडे ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं न घ्यावा संशय। निश्चयेंसी होय हरिरूप ॥ ५ ॥

२१ बारा सोळा जणी हरीसी नेणती। म्हणोनि फिरती रात्रंदिवस ॥१॥ सहस्र मुखांचा वर्णितां भागला। हरि जया झाला तेणें सुखें ॥२॥ वेद जाणूं गेला पुढें मौनावला। तें गुह्य तुजला प्राप्त कैचें ॥३॥ पूर्वसुकृताचा पूर्ण अभ्यासाचा। दास सद्गुरूचा तोचि जाणें ॥४॥ जाणते नेणते हरीचे ठिकाणीं। एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

२२ पिंडीं देहस्थिति ब्रह्मांडीं पसारा। हरीविण सारा व्यर्थ भ्रम ॥ १ ॥ शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी। हरीसी जाणोनी हरिच झाले ॥ २ ॥ यारे यारे धरूं हरिनाम तारूं। भवाचा सागरू भय नाहीं ॥ ३ ॥ साधुसंत गेले आनंदी राहिले। हरिनामें झाले कृतकृत्य ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं मांडिलें दुकान। देतो मोलाविण सर्व वस्तु ॥ ५ ॥

२३ आवडीनें भावें हरिनाम घेसी। तुझी चिंता त्यासी सर्व आहे ॥ १ ॥ नको खेद करूं कोणत्या गोष्टीचा। पति तो लक्ष्मीचा जाणतसे ॥ २ ॥ सकळ जीवांचा करितो सांभाळ। तुज मोकलील ऐसें नाहीं ॥ ३ ॥ जैशी स्थिति आहे तैशापरी राहे। कौतुक तूं पाहे संचिताचें ॥ ४ ॥ एकाजनार्दनीं भोग प्रारब्धाचा। तुझा हरिकृपें त्याचा नाश झाला ॥ ५ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

२४ दुर्बळाची कन्या समर्थांनें केली । अवदशा निमाली दरिद्राची ॥१॥ हरिकृपा होतां भक्तां निघतीं दोंदें । नाचती स्वानंदें हरिरंगीं ॥ २ ॥ देव भक्त दोन्ही एकरूप झाले । मुळींचें संचलें जैसें तैसें ॥ ३ ॥ पाजळली ज्योति: कापुराची वाती । ओवाळितां आरती भेद नुरे ॥ ४ ॥ एकाजनार्दन कल्पाचि मुराला । तोचि हरि झाला ब्रह्मरूप ॥ ५ ॥

२५ मुद्रा ती पांचवी लाऊनियां लक्ष । तो आत्मा प्रत्यक्ष हरि दिसे ॥ १ ॥ कानीं जें पेरिलें डोळां तें उगवलें । व्यापकें भरिलें तोचि हरी ॥ २ ॥ कर्म उपासना ज्ञानमार्गीं झाले । हरिपाठीं आले सर्व मार्ग ॥३॥ नित्य प्रेमभावें हरिपाठ गाय । हरिकृपा होय तयावरी ॥ ४ ॥ झाला हरिपाठ बोलणें येथुनी । एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

२६ अवघेंचि त्रैलोक्य आनंदाचें आतां । चरणीं जगन्नाथा चित्त ठेलें ॥ १ ॥ माय जगन्नाथ बाप जगन्नाथ । अनाथाचा नाथ जनार्दन ॥ २ ॥ एकाजनार्दनीं एकपणे उभा । चैतन्याची शोभा शोभतसे ॥ ३ ॥

२७ हरीचिया दासां हरि दाही दिशा । भावें जैसा तैसा हरि एक ॥ १ ॥ हरि मुखीं गातां हरपली चिंता । त्या नाहीं मागुता जन्म घेणें ॥ २ ॥ जन्म घेणें लागे वासनेच्या संगें । तेचि झाली अंगें हरिरूप ॥३॥ हरिरूप झालें जाणणें हरपलें । नेणणें तें गेलें हरीचे ठायीं ॥ ४ ॥ हरिरूप ध्यानीं हरिरूप मनीं । एकाजनार्दनीं हरि बोला ॥ ५ ॥

॥ इति श्रीएकनाथमहाराजकृत हरिपाठ समाप्त ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

श्रीएकनाथमहाराजकृत चिरंजीवपद.

चिरंजीवपद पावावयासी । आन उपाय नाहीं साधकासी ॥ किंचित् बोलों निश्चयेंशीं । कळावयासी साधकां ॥ १ ॥ येथें मुख्य पाहिजे अनुताप । त्या अनुतापाचें कैसें रुप ॥ नित्य मृत्यु लागला समीप । न मनीं अल्प देहसुख ॥२॥ म्हणे नरदेह किमर्थ निर्मिला । तो मीं विषयस्वार्थी लाविला ॥ थिता परमार्थ हातिंचा गेला । करी वहिला विचार हा ॥ ३ ॥ ऐसा अनुताप वाहतां । तंव वैराग्य ये तयाच्या हातां ॥ त्या वैराग्याची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ४ ॥ तें वैराग्य बहुतांपरी। आहे गा हें अवधारी ॥ सात्विक राजस तामस त्रिप्रकारीं । योगीश्वरीं बोलिजे ॥ ५ ॥ नाहीं वेदविधी आचार । नेणें सत्कर्म साचार ॥ कर्म धर्मी भ्रष्टाकार । तो अपवित्र तामस ॥ ६ ॥ त्याग केला पूज्यतेकारणें । सत्संग सोडूनि पूजा घेणें ॥ शिष्यममता धरोनि राहाणें । तें जाणणें राजस ॥ ७ ॥ वैराग्य राजस तामस । तें न मानेच संतास ॥ तेणें न भेटे कृष्णपरेश । अनर्थास मूळ तें ॥८॥ आतां वैराग्य शुद्ध सात्विक । जें मी जगद्वंद्य मानीं यदुनायक ॥ तें तूं सविस्तर ऐक ॥ मनीं निष्टंक बैसावया ॥९॥ भोगेच्छा विषयक । ते तों सांडी सकळिक ॥ प्रारब्धें प्राप्त होतां देख । तेथोनी निष्टंक अंग काढी ॥१०॥ कां जे विषय पांच आहेती । ते अवश्य साधका नाडिती ॥ म्हणोनी लागों नेदी प्रीति । कवणे रीतीं ऐक पां ॥११॥ जेणें धरिला शुद्ध परमार्थ । त्यासी जनमान

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

हा करी अनर्थ । तेणें वाढे विषयस्वार्थ । ऐक नेमस्त विचार हा ॥१२॥ वैराग्य पुरुष देखोनी । त्याची स्तुति करिती जनीं ॥ एक सन्मानें करुनी । पूजे लागोनी पैं नेती ॥१३॥ त्याचें वैराग्य कोमळ कंटक । नेट न धरीच निष्टंक ॥ देखोनि मान स्तुति अलोलिक । भुलला देख पैं तेथें ॥१४॥ जनस्तुति लागे मधुर । म्हणती उद्धरावया हा हरीचा अवतार ॥ आम्हा-लागीं जाहला स्थिर । तेणें धरी फार शब्दगोडी ॥१५॥ हा पांच विषयांमाजीं प्रथम । शब्दविषय संभ्रम ॥ स्पर्शविषय सुगम । उपक्रम तो ऐसा ॥१६॥ नाना मृदु आसनें घालिती । विचित्र पर्यंक निद्रेप्रती ॥ नरनारी शुश्रूषा करिती । तेणें धरी प्रीति स्पर्शगोडी ॥१७॥ रुपविषय कैसा गोवी । वस्त्रेंभूषणें देती बरवीं ॥ तेणें सौंदर्य करी जीवीं । देहभावीं श्लाघ्यता ॥ १८ ॥ रुपविषय ऐसा जडला । रसविषय कैसा झोंबला ॥ जें जें आवडे याला । गोडगोड अर्पिती ॥ १९ ॥ ते रसगोडी करितां । घडी न विसंबे धरी ममता । मग गंधविषय ओढितां । होय तत्वतां त्यां कैसा ॥२०॥ आवडे सुमन चंदन । बुक्का केशर विलेपन ॥ ऐसे पांचही विषय जाण । जडले संपूर्ण सन्मानें ॥२१॥ मग जे जे जन वंदिती । तेचि त्याची निंदा करिती ॥ परि अनुताप नुपजे चित्तीं । ममता निश्चितीं पूजकांची ॥ २२ ॥ म्हणाल विवेकी जो आहे । त्यासी जनमान करील काय ॥ हें बोलणें मूर्खाचें पाहे । जया चाड आहे मानाची ॥२३॥ ज्ञात्यासी प्रारब्धगती । मान झाला तरी नेघों म्हणती ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

परी येथेंचि गुंतोनि न राहती । उदास होती तत्काळ ॥२४॥ या परी साधकाच्या चित्ता । मानगोडी न संडे सर्वथा ॥ जरी कृपा उपजेल भगवंता । तरी होय मागुता विरक्त ॥२५॥ तो विरक्त कैसा म्हणाल । जो मानलें सांडी स्थळ ॥ सत्संगीं राहे निश्चळ । न करी तळमळ मानाची ॥ २६ ॥ मांडीना स्वतंत्र फड । आंगा येईल अहंता वाड ॥ न धरी जीविकेची चाड । न बोले गोड मनधरणी ॥ २७ ॥ नावडे प्रपंचीं वैसणें । नावडे कोणाशीं बोलणें ॥ नावडे योग्यता मिरवणें । बरवें खाणें नावडे ॥ २८ ॥ नावडे लौकिक परवडी । नावडती लेणीं लुगडीं ॥ नावडे परान्न गोडी । द्रव्यजोडी नावडे ॥२९॥ नावडे स्त्रियांत वैसणें । नावडे स्त्रियांचें पाहणें ॥ नावडे स्त्रियांचें रगडणें । त्यांचें बोलणें नावडे ॥ ३० ॥ नको नको स्त्रियांचा सांगात । नको नको स्त्रियांचा एकांत ॥ नको नको स्त्रियांचा परमार्थ । करिती आघात पुरुषासी ॥ ३१ ॥ म्हणाल गृहस्थ साधकें । स्त्रिया सांडोनि जावें कें ॥ येच अर्थी उत्तर निकें । ऐका आतां सांगेन ॥ ३२ ॥ तरी स्वस्त्रियेवांचोनी । नातळावी अन्य कामिनी ॥ कोणे स्त्रियासन्निध वाणी । आश्रयो क्षणीं न द्यावा ॥ ३३ ॥ स्वस्त्रीसही कार्यी पुरतें । पाचारावें स्पर्शावें निरुतें ॥ परी आसक्त होउनियां तेथें । सर्वथा चित्तें नसावें ॥ ३४ ॥ नरनारी शुश्रुषा करिती । भक्ती ममता उपजविती ॥ परी शुद्ध जो परमार्थी । तो स्त्रियांचें संगती न वैसे ॥ ३५ ॥ अखंड एकांतीं वैसणें । प्रमदासंगें न राहणें ॥ जो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

निःसंग निरभिमानें । त्यानें वैसणें सर्वदा ॥ ३६ ॥ कुटुंब आहाराकारणें । अकल्पित नमिळे तरी कोरान्न करणें ॥ ऐसे स्थिती जें वर्तणें । तें जाणणें शुद्ध वैराग्य ॥ ३७ ॥ ऐशी स्थिति नाहीं ज्यासी । तंव कृष्णप्राप्ती कैंची त्यासी ॥ यालागीं कृष्णभक्तासी । ऐशी स्थिती असावी ॥ ३८ ॥ यास्थिती-वेगळा जाण । कृष्णीं मिळे तो अज्ञान ॥ तो सकळ मूर्खांचें अधिष्ठान । लटिकें तरी आण देवाची ॥ ३९ ॥ हे बोल माझिये मतीचे । नव्हति गा साचे ॥ कृष्णें सांगितलें उद्धव-हिताचे । ते मी साच बोलिलों ॥ ४० ॥ साच न मानी ज्याचें मन । तो विकल्पी न पवे कृष्णचरण ॥ माझें काय जाईल जाण । मी बोलोन उतराई ॥ ४१ ॥ साधावयास वैराग्यज्ञान । मनुष्यदेहीं करावा प्रयत्न ॥ सांगे एका जनार्दन । आणीक प्रयत्न असेना ॥ ४२ ॥

॥ इति श्रीचिरंजीवपद समाप्त ॥

श्रीचांगदेवपासष्टि.

स्वस्ति श्री वटेशु । जो लपोनि जगदाभासु । दावी मग ग्रासु । प्रगटला करी ॥ १ ॥ प्रगटे तंव तंव न दिसे । लपे तंव तंव आभासे । प्रगट ना लपाला असे । न खोमता जो ॥ २ ॥ बहु जंव जंव होये । तंव तंव कांहींच न होये । कांहीं नहोनि आहे । अवघाचि जो ॥ ३ ॥ सोनें सोनेपणा उणें । न येतांचि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

झालें लेणें । तेंवि न वेंचितां जग होणें । अंगें जया ॥ ४ ॥ कल्लोळकंचुक । न फेडितां उघडें उदक । तेंवीं जगेंसी सम्यक् । स्वरूप जो ॥ ५ ॥ परमाणूंचिया मांदिया । पृथ्वीपणें न वचेनि वायां । तेवि विश्वस्फूर्ति इयां । झांकवेना जो ॥ ६ ॥ कळांचेनि पांघुरणें । चंद्रमा हरपों नेणें । कां वन्ही दीपपणें । आन नोहे ॥ ७ ॥ म्हणोनि अविद्यानिमित्तें । दृश्य द्रष्टृत्व वर्ते । तें मी नेणें आइतें । ऐसेंचि असे ॥ ८ ॥ जेंवि नाममात्र लुगडें । येऱ्हवीं सूतचि तें उघडें । कां माती मृद्भांडें । जयापरी ॥ ९ ॥ तेंवि द्रष्टादृश्यदशे- । अतीत दृङ्मात्र जें असे । तेंचि द्रष्टादृश्य-मिसें । केवळ होय ॥ १० ॥ अलंकार येणें नामें । असिजे निखिल हेमें । नाना अवयवसंभ्रमें । अवयाविया जेंवि ॥ ११ ॥ तेंवि शिवोनि पृथ्वीवरी । भासती पदार्थाचिया परी । प्रकाशे तें एकसरी । संवित्ति हे ॥ १२ ॥ नाहीं तें चित्र दाविती । परि असे केवळ भिंती । प्रकाशे ते संवित्ति । जगदाकारें ॥ १३ ॥ बांधियाचिया मोडी । बांधा नहोनि गुळाची गोडी । तयापरि जगपरवडी । संवित्ति जाण ॥ १४ ॥ घडियेचेनि आकारें । प्रकाशिजे जेंवि अंबरें । तेंवि विश्वस्फूर्ति स्फुरे । स्फूर्तिचि हे ॥ १५ ॥ न लिंपतां सुखदुःख । येणें आकारें क्षोभोनि नावेक । होय आपणिया सन्मुख । आपणाचि जो ॥ १६ ॥ तया नांव दृश्याचें होणें । संवित्ति द्रष्टृत्वा आणिजे तेणें । बिंबा बिंबत्व जालेपणें । प्रतिबिंबाचेनि ॥ १७ ॥ तेंवि आपणाचि आपुला पोटीं । आपणया दृश्य दावित उठी । द्रष्टादृश्यदर्शनत्रिपुटी ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मांडे तें हे ॥ १८ ॥ सुताचिये गुंजे । आंतबाहेर नाहीं दुजें । तेंवि तिनपणेंविण जाणिजे । त्रिपुटि हे ॥ १९ ॥ नुसधें मुख जैसें । देखिजतसे दर्पणमिसें । वायांचि देखणें ऐसें । गमों लागे ॥२०॥ तैसें न वचतां भेदा । संविति गमे त्रिधा । हेंचि जाणे प्रसिद्धा । उपपत्ति इया ॥२१॥ दृश्याचा जो उभारा । तेंचि दृष्टृत्व होय संसारा । या दोहींमाजिला अंतरा । दृष्टि पंगु होय ॥२२॥ दृश्य जेथवां नाहीं । तेथवां दृष्टि घेऊनि असे काई । आणि दृश्येंविण कांहीं । द्रष्टृत्व असे ? ॥ २३ ॥ म्हणोनि दृश्याचें जालेपणें । दृष्टि द्रष्टृत्व होणें । पुढती तें गेलिया जाणें । तैसेचि दोन्ही ॥ २४ ॥ एवं एकचि झाली ती होती । तिन्ही गेलिया एकचि व्यक्ति । तरी तिन्ही भ्रांति । एकपण साच ॥ २५ ॥ दर्पणाच्या आधीं शेखीं । मुख असताचि असे मुखीं । माजी दर्पणअवलोकीं । आन कांहीं होये ? ॥ २६ ॥ पुढें देखिजे तेणें बगें । देखतें ऐसें गमों लागे । परी दृष्टीतें वाउगें । झकवित असे ॥ २७ ॥ ह्मणोनि दृश्याचिये वेळे । दृश्यद्रष्टृत्वावेगळें । वस्तुमात्र निहाळे । आपणाशीं ॥ २८ ॥ वाद्यजातेंविण ध्वनी । काष्ठजातेंविण वन्ही । तैसें विशेष ग्रासुनी । स्वयेंचि असे ॥ २९ ॥ जें ह्मणतां नये कांहीं । जाणों नये कैसेंही । असतचि असे पाही । असणें जया ॥ ३० ॥ आपुलिया बुबुळा । दृष्टि असोनि अखम डोळा । तैसा आत्मज्ञानीं दुबळा । ज्ञानरूप जो ॥ ३१ ॥ जें जाणणेंचि कीं ठाईं । नेणणें कीर नाहीं । परि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाणणें म्हणोनियांही। जाणणें कैचें ? ॥ ३२ ॥ यालागीं मौनेंचि बोलिजे। कांहीं नहोनि सर्व होईजे। नव्हतां लाहिजे। कांहींच नाहीं ॥ ३३ ॥ नाना बोधाचिये सोयरिके। साचपण जेवीं एकें। नाना कल्लोळमाळिके। पाणी जेंवि ॥ ३४ ॥ जे देखिजतेविण। एकलें देखतेपण। हें असो आपणिया आपण। आपणाचि जे ॥३५॥ जें कोणाचे नव्हतेनि असणें। जें कोणाचें नव्हतां दिसणें। कोणाचें नव्हतां भोगणें। केवळ जो ॥३६॥ तया पुत्र तूं वटेश्वराचा। रवा जैसा कापुराचा। चांगया मज तुज आपणयाचा। बोल ऐके ॥ ३७ ॥ ज्ञानदेव म्हणे। तुज माझा बोल ऐकणें। तें तळहाता तळीं मिठी देणें। जयापरी ॥ ३८ ॥ बोलेंचि बोल ऐकिजे। स्वादेंचि स्वाद चाखिजे। कां उजिवडें देखिजे। उजिडा जेंवि ॥ ३९ ॥ सोनिया वरकल सोनें जैसा। कां मुख मुखा हो आरिसा। मज तुज संवाद तैसा। चक्रपाणि ॥ ४० ॥ गोडिये आपुली गोडी। घेतां काय न माये तोंडीं ?। आम्हां परस्परें आवडी। तो पाडु असे ॥ ४१ ॥ सखया तुझेनि उद्देशें। भेटावया जीव उल्हासे। कीं सिद्धभेटी निसकुसे। ऐशिया विहे ॥ ४२ ॥ घेवों पाहे तुझें दर्शन। तंव रूपा येवों पाहे मन। येथें दर्शना होय अवजतन। ऐसें गमों लागे ॥ ४३ ॥ कांहीं करी बोले कल्पी। कां न करी न बोले न कल्पी। ये दोन्ही तुझ्या स्वरूपीं। न घेति उमस ॥ ४४ ॥ चांगया तुझेनि नांवें। करणें न करणें न व्हावें। हें काय म्हणों परि न धरवे।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मीपण हें ॥४५॥ लवण पाणियाचा थावो। माजि रिघोनि गेलें पाहो। तंव तेंचि नाहीं मा काय घेवो। माप जळा ॥४६॥ तैसें तुज आत्मयातें पाही। देखों गेलिया मीचि नाहीं। तेथें तूं कैचा काई। कल्पावया जोगा! ॥ ४७ ॥ जो जागोनि नीद देखे। तो देखणेपणा जेंवि मुके। तेंवि तूंतें देखोनि मी ठाकें। कांहीं नहोनि ॥ ४८ ॥ आंधाराचे ठाईं। सूर्यप्रकाश तंव नाहीं। परी मी आहें हें कांहीं। नवचेचि जेंवि ॥ ४९ ॥ तेंवि तूंतें मीं गिवसी। तेथें तूंपण मीपणेंसी। उखतें पडे ग्रासीं। भेटीचि उरे ॥ ५० ॥ डोळ्याचे भूमिके। डोळा चित्र होय कौतुकें। आणि तेणेंचि तो देखे। न डंडळितां ॥ ५१ ॥ तैसी उपजतां गोष्टी। न फुटतां दृष्टि। मी तूंवीण भेटी। माझी तुझी ॥ ५२ ॥ आतां मी तूं या उपाधी। ग्रासूनि भेटी नुसधी। ते भोगिली अनुवादीं। घोळघोळं ॥५३॥ रुचातियाचेनि मिसें। रुचितें जेविजें जैसें। कां दर्पणव्याजें दिसे। देखतें जेंवि ॥ ५४ ॥ तैसीं अप्रमेयें प्रमेयें भरलीं। मौनाचीं अक्षरें मलीं। रचोनि गोष्टी केली। मेळियेचि ॥५५॥ इयेचें करूनि व्याज। तूं आपणयातें बूझ। दीप दीपपणें पाहे निज। आपुलें जैसें ॥ ५६ ॥ तैसी केलिया गोठी। तया उघडिजे दृष्टी। आपणिया आपण भेटी। आपणामाजी ॥ ५७ ॥ जालिया प्रळयीं एकार्णव। अपार पाणियाची धांव। गिळी आपुला उगव। तैसें करीं ॥ ५८ ॥ ज्ञानदेव म्हणे नामरूपें-। विण तुझें साच आहे आपणपें। तें स्वानंदजीवनपें। सुखिया

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

होईं ॥ ५९ ॥ चांगया पुढतपुढती । घरा आलिया ज्ञानसंपत्ति । वेद्यवेदकत्वही अतीतीं । पदीं बैसें ॥ ६० ॥ चांगदेवा तुझेनि व्याजें । माउलिया श्रीनिवृत्तिराजें । स्वानुभव रसाळ खाजें । दिधलें लोभें ॥ ६१ ॥ एवं ज्ञानदेव चक्रपाणी ऐसे । दोन्ही डोळस आरिसे । परस्पर पाहतां कैसें । मुकले भेदा ॥ ६२ ॥ तियेपरि जो इया । दर्पण करील ओविया । तो आत्माएवढिया । मिळेल सुखा ॥ ६३ ॥ नाहीं तेंचि काय नेणों असे । दिसे तेंचि कैसें नेणों दिसे । असे तेंचि नेणों आपैसें । तें कीं होइजे ॥ ६४ ॥ निदेपरौतें निदैजणें । जागृति गिळोनि जागणें । केलें तैसें गुंफणें । ज्ञानदेवो म्हणे ॥ ६५ ॥

॥ इति श्रीचांगदेवपासष्टि समाप्त ॥

श्री.

अमृतानुभव.

प्रकरण पहिलें.

यदक्षरमनाख्येयमानंदमजकेवलं ॥ श्रीमन्निवृत्तिनाथेति ख्यातं दैवतमाश्रये ॥१॥ गुरुरित्याख्यया लोके साक्षाद्विद्या हि शांकरी ॥ जयत्याज्ञा नमस्तस्यै दयार्द्रायै निरंतरम् ॥ २ ॥ सार्धं केन च कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः ॥ ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः ॥ ३ ॥ अद्वैतमात्मनस्तत्त्वं दर्शयंतौ मिथस्तराम् ॥ तौ वंदे जगतामाद्यौ तयोस्तत्त्वाभिपत्तये ॥ ४ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मूलाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये ॥ क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥ ५ ॥

ऐशीं हीं निरुपाधिकें । जगाचीं जियें जनकें ॥ तियें वंदिलीं मियां मूळिकें । देवोदेवी ॥ १ ॥ जो प्रीयुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचिये सरोभरी ॥ चारुस्थळीं एकाहारी । एकाआंगाची ॥ २ ॥ आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिती आंगें ॥ कीं द्वैताचेनि पांगें । उगाळिते आहाति ॥ ३ ॥ जी एकाचि नव्हे एकसरे । दोघा दोपण नाहीं पुरे ॥ काय नेणो साकारें । स्वरूपें जिये ॥ ४ ॥ कैशी स्वसुखाची अळुकी । जे दोनीपण मिळूनि एकी ॥ नेदेतीच कवतुकी । एकपण फुटो ॥ ५ ॥ हा ठावोवरी वियोगभेडे । जे बाळ जगायेवढे ॥ वियाली परी न मोडे । दोघुलेपण ॥ ६ ॥ आपुलिये आंगीं संसारा । देखिलिया चराचरा ॥ परी नेदितीच तिसरा । झोंक लागों ॥ ७ ॥ जया एके सत्तेचें बैसणें । दोघां एका प्रकाशाचें लेणें ॥ जे अनादी एकपणें । नांदती दोघें ॥ ८ ॥ भेदु लाजोनि आवडी । एकरसीं देत बुडी ॥ जो भोगपाया थाव काढी । द्वैताचा जेथें ॥ ९ ॥ जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहींना तो गोसावी ॥ किंबहुना एकोपजीवी । एकएकाची ॥१०॥ कैसा मेळ आला गोडिये । दोघे न माती जगीं इये ॥ कीं परमाणूहि माजी उवाये । मांडिली आहाती ॥११॥ जिहीं एकएकावीण । न कीजे तृणाचेंही निर्माण ॥ जिये दोघे जीवप्राण । जिया दोघा ॥ १२ ॥ घरवाते मोटकी दोघे । जैं गोसावी सुजे रिघे ॥ तैं दंपत्यपणें जागे । स्वामिणी जे ॥१३॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जया दोघांमाजी एकादें । विपायें उमजलें होय निदें ॥ तरी घरवात गिळुनी नुसधें । कांहींना करी ॥ १४ ॥ दोहीं आंगांची आटणी । गिवासित आहाती एकपणीं ॥ जाली भेदाचिया वाहणी । आधाधीं जियें ॥ १५ ॥ विषो एकमेकांची जियें । जियें एकमेकांची विषयीं इयें ॥ जिहीं दोघीं सुखियें । जियें दोघें ॥ १६ ॥ स्त्रीपुरुषनामभेदें । शिवपण एकलें नांदे ॥ जग सगळें अधाधें-। पणें जिहीं ॥ १७ ॥ दो दांडीं एक श्रुती । दोहीं फुलीं एक वृति ॥ दोहीं दिवीं दीप्ती । एकीची जेवीं ॥ १८ ॥ दो ओंठीं एकी गोष्टी । दो डोळां एकी दृष्टी ॥ तेवीं दोघीं जिहीं सृष्टी । एकीचि जे ॥ १९ ॥ दाऊनि दोनीपण । एकरसाचें आरोगण ॥ करीत आहे मेहूण । अनादि जे ॥ २० ॥ जे स्वामीचिया सत्ता-। वीण असो नेणें पतिव्रता ॥ जियेविण सर्वकर्ता । कांहीं ना जो ॥ २१ ॥ जे कीं भाताराचें दिसणें । भाताराचि जियेचें असणें ॥ नेणि-जती दोघेजणें । निवडूं जियें ॥ २२ ॥ गोडी आणि गुळु । कापूर आणि परिमळु ॥ निवडुं जातां पांगुळु । निवाडु होय ॥ २३ ॥ समग्र दीप्ती घेतां । जेवीं दीपाचि ये हाता ॥ तेवीं जियेचिया तत्वता । शिवूचि लाभे ॥ २४ ॥ जैशी सूर्यें मिरवे प्रभा । प्रभे सूर्यत्वचि गाभा ॥ तैशी भेद गिळित शोभा । एकाचि जे ॥२५॥ कां बिंब प्रतिबिंबा द्योतक । प्रतिबिंब बिंबा अनुमापक ॥ तैसें द्वैतमिसें एक । बरवत असे ॥ २६ ॥ सर्व शून्याचा निष्कर्षु । जियां बाइला केला पुरुषु ॥ जेणें दादुलेन

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सत्ता विशेषु । शक्ति जाली ॥ २७ ॥ जिये प्राणेश्वरीवीण । शीवींहि शीवपण ॥ थारो न शके ते आपण । शीवे घडली ॥२८॥ ऐश्वर्येंशी ईश्वरा । जियेचे अंग संसारा ॥ आपण होउनी उभारा । आपणाचे जे ॥ २९ ॥ पतीचेनि अरूपपणें । लाजोनि अंगाचें मिरवणें ॥ केलें जगायेवढे लेणें । नामरूपाचें ॥ ३० ॥ ऐक्धाचाही दुकाळा । बहुपणाचा सोहळा ॥ जिये सदैवेचिया लीळा । दाखविला ॥ ३१ ॥ आंगाचिया आटाणिया । कांतु उवाया आणिला जिया ॥ स्वसंकोचें प्रिया । रुढाविली जेणें ॥ ३२ ॥ जियेतें पहावयाचिया लोभा । चढे दृष्टत्वाचिया क्षोभा ॥ जयेतें न देखतुचि उभा । आंगाचि सांडी ॥ ३३ ॥ कांतचिया भिडा । अवला होये जगायेवढा ॥ अंगाविला उघडा । जियेवीण ॥ ३४ ॥ जो हा ठाव मंदरूपें । उवाइले-पणें हारपे ॥ तो जाला जियेचेनि पडपे । विश्वरूप ॥ ३५ ॥ जिया चेवविला शीवु । वेद्याचे वोगे वहु ॥ वाढीतपेशी जेउ । घाला जो ॥ ३६ ॥ निदेलेनि भातारे । जे विये चराचरे ॥ जियेचा विसावला नुरे । आंबुलेपणही ॥ ३७ ॥ जंव कांत लपो वैसे । तंव नेणिजे जियोद्देशे ॥ जिये दोघे आरिसे । जिया दोघा ॥ ३८ ॥ जियेचेनि अंगलगें । आनंद आपणा आरोगू लागे ॥ सर्वभोक्तृत्वही नेघे । जियेवीण कांहीं ॥३९॥ जया प्रियेचें जें अंग । जो प्रियु जियेचें चांग ॥ कालवूनि दोन्ही भाग । जेविते आहाति ॥४०॥ जैशी कां समीरेसकट गति । कां सोमेसकट कांती ॥ तैसी शिवेंसी शक्ति । अघवीच

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जे ॥४१॥ कां कस्तूरीसकट परिमळु । कां उष्मेसकट अनळु ॥ तैसा शक्तीशी केवळु । श्रीशीवूचि जो ॥ ४२ ॥ राती आणि दीवो । पातली सूर्याचा ठावो ॥ तैसे आपुलिया साची वावो । दोघे जिये ॥ ४३ ॥ किंबहुना तिये । प्रणवाक्षरी विरुढातिये ॥ दशेचीही वैरीये । शीवशक्ति ॥ ४४ ॥ हे असो नामरूपाचा भेदशिरा । गिळित एकार्थाचा उजिरा ॥ नमो तया शीवबोहरा । ज्ञानदेवो म्हणें ॥ ४५ ॥ जयाच्या रूपनिर्धारी । गेली परेसी वैखरी ॥ सिंधूसीं प्रलयनीरी । गंगा जैसी ॥ ४६ ॥ जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनी गेलीं दोनी ॥ अघवीयाचि रजनी । दिठीच जे ॥ ४७ ॥ वायू चळवळेशी । जिराला व्योमाचिये कुशी ॥ अटला प्रळयप्रकाशी । सप्रभभानु ॥ ४८ ॥ तेवी निहाळिता थयाते । गेले पाहणेनशी पाहते ॥ पुढती घरौते वरौते ॥ वंदिली तिये ॥ ४९ ॥ जयाच्या वाहणी । वेदक्रु वेद्याचें पाणी ॥ न पिये पण सांडपी । आंगाचीही करी ॥ ५० ॥ तेथ मी नमस्कारा । लागी हो दुसरा ॥ तरी लिंग-भेद पऱ्हा । जोडू जावो ॥ ५१ ॥ परी सोनेनसी दुजे । नव्हतु लेणे सोना भजे ॥ हें नमन करणें माझें । तैसें आहे ॥ ५२ ॥ सांगता वाचेते वाचा । ठावो वाच्य वाचकाचा ॥ पडता काय भेदाचा । विटाळु होये ॥ ५३ ॥ सिंधु आणि गंगेची मिळणी । स्त्रीपुरुष नामाची भिरवणी ॥ दिसतसे तरी काय पाणी । द्वैत होईल ॥ ५४ ॥ पाहेपा भास्य भासकता । आपुला ठाईं दाविता ॥ एकपण काय सविता ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मोडीतसे ॥ ५५ ॥ चांदाचिया दोंदावरी । होता चांदणियाची विखुरी ॥ काय उणे दीसीवरी । गिंवसोपा दीपु ॥ ५६ ॥ मोतियाची कीळ । होय मोतियावरी पांगुळ ॥ अगळे निर्मळ । रूपा ये की ॥ ५७ ॥ मात्राचिया त्रिपुटिया । प्रणवू काय केला चिरटिया ॥ कीं णकार ती रेघटीया । भेदवला काई ॥ ५८ ॥ अहो ऐश्वर्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभ मिळे ॥ तरी स्वतरंगाची मुकुळें । तुरंबु कां पाणी ॥५९॥ म्हणोनि भूतेशुभवानी । वंदिलीं न करोनी सिनानी ॥ मी निघालों नमनी । तें हे ऐसें ॥ ६० ॥ दर्पणाचेनि त्यागें । प्रतिबिंब बिंबीं रिगे ॥ कां बुडी दीजे तरंगे । वायूचा ठेला ॥ ६१ ॥ नातरी नींद जातखेवो । पावे आपुला ठावो ॥ तैशी बुद्धित्यागे देवीदेवो । वंदिलीं मिया ॥ ६२ ॥ सांडूनि मीठपणाचा लोभु । मिठें सिंधुत्वाचा घेतला लाभु ॥ तेवी अहं देउनि मी शंभु । शांभवी जालो ॥ ६३ ॥ शिवशक्ति समावेशें । नमन केलें म्या ऐसें ॥ रंभागर्भ आकाशे । रिघाला जैसा ॥ ६४ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते शिवशक्तिसमावेशनमनंनाम प्रथमं प्रकरणं संपूर्णं ।

प्रकरण दुसरें

आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेवतंतु । अमूर्ताचि परी मूर्तु ॥ कारुण्याचा ॥ १ ॥ मोडोनी मायाकुंजरु ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मुक्तमोतियाचा वोगरु ॥ जेवविता सद्गुरु । निवृत्ति वंदु ॥२॥ अविद्येचे आडवे । भुंजीत जीवपणाचे भवे ॥ तया चैतन्याचे धांवे । कारुण्ये जो की ॥ ३ ॥ जयाचेनि आपांगपातें । बद्ध मोक्षपणीं आते ॥ भेटे जाणतया जाणते । जयापाशीं ॥ ४ ॥ कैवल्यकनकाचिया दाना । जो न कडसी थोरसाना ॥ द्रष्ट्याचिया दर्शना । पाढाउ जो ॥ ५ ॥ सामर्थ्याचेनि बिकें । जो शिवाचेंही गुरुत्व जिंकें ॥ आत्मा आत्मसुख देखे । आरसा जिये ॥६॥ बोधचंद्राचिया कळा । विखुरल्या एकवळा ॥ कृपापुनीव लीळा । करी जयाची ॥ ७ ॥ जो भेटलियाचि सवे । पुरति उपायाचे धांवे ॥ प्रवृत्तिगंगा स्थिरावे । सागरीं जिये ॥ ८ ॥ जयाचेनि अनवसरे । द्रष्टा ले दृश्याचे मोहिरे ॥ जो भेटतखेव सरे । बहुरुपाचि हे ॥ ९ ॥ अविद्येचे काळवखे । कीं स्वबोधसुदिनीं फांके ॥ सीतले प्रसादार्के । जयाचेनि ॥ १० ॥ जयाचेनि कृपासलिलें । जीवू हा ठाववरी पाखाळे ॥ जें शीवपणही वोविळें । अंगीं न लवी ॥ ११ ॥ राखो जाता शिष्याते । गुरुपणही धाडिले थिते ॥ तरी गुरुगौरव जयाते । सांडिचिना ॥ १२ ॥ एकपण नव्हे सुसास । ह्मणूनि गुरुशिष्याचे करुनि मिस ॥ पाहणेचि आपली वास । पाहतचि असे ॥ १३ ॥ जयाचेनि कृपातुषारे । परतले अविद्येचे मोहिरे ॥ परिणमे आपारे । बोधामृते ॥ १४ ॥ वेद्या देता मिठी । वेदकूही सुये पोटी ॥ तऱ्ही नव्हेचि उशिटी । दिठी जयाची ॥ १५ ॥ जयाचेनि सावाये । जीवू ब्रह्मउपर लाहे ॥ ब्रह्म

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तृणातळी जाये । उदासे जेणे ।। १६ ।। उपास्तीवरीराबतिया । उपायफळी येती मोडूनिया ।। वारिवांडिले जयाचिया । अनुज्ञा का ।। १७ ।। जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमव-नाआतु ।। तंव आपुलिये फळी हातु । न घेपती ही ।। १८ ।। पुढे दृष्टीचेनि अलगे । खोची की निवटे मागें ।। येवढे या जैता नेघे । आपणपे जो ।। १९ ।। लघुत्वाचेनि मुदले । बैसला गुरुत्वाचे सेले ।। नासूनि नाथिले । सदैव जो ।। २० ।। नाहीं ते जळी बुडिजे । तै घनवटे जेणे तरिजे ।। जेणें तरिलि-याहि नुरिजे । कवणी ठायी ।। २१ ।। आकाश हें सावेव । न बंधे आकाशाची हाव ।। ऐसे कोणीएक भरीव । आकाश जो ।। २२ ।। चंद्रादि सुशीतळे । घडली जयाचेनि मेळे ।। सूर्य जयाचेनि उजाळे । कडवसेनी ।। २३ ।। जीवपणाचेनि त्रासे । यावया आपुलीये दशे ।। शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें ।।२४।। चांदिणे स्वप्रकाशाचें । लेइला द्वैतदुणीचें ।। तऱ्ही उघडेपण नवचे । चांदाचें जया ।। २५ ।। जो उघड कीं न दिसे । प्रकाश कीं न प्रकाशे ।। असतेपणेंचि नसे । कव्ह-णीकडे ।। २६ ।। आतां जो तो इहीं शब्दीं । के मिळवू अनु-मानाची मांदी ।। हा प्रमाणाही वो नेदी । कोणाही मा ।।२७।। जेथें शब्दाची लिही पुसे । तेणेशीं चावळो बैसे ।। दुजयाच्या रागी रुसे । एकपणा जो ।। २८ ।। प्रमाणाची परी सरे । तै प्रमेयेची अविष्करे ।। नवल मेचु ये धुरे । नाहींपणाची ।।२९।। कांहींबाही अळुमाळु । देखे येखादे वेळु ।। तरी देखे तेही

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विटाळ । जया गांवीं ॥ ३० ॥ तेथें नमने का बोले । केउती सुये पाउले ॥ आंगीं लावूनि नाडिले । नावचि येणें ॥ ३१ ॥ नव्हे आत्मया आत्मप्रवृत्ति । वाढवितां के निवृत्ति ॥ या नामाची वाय बुंथी । सांडीचिना ॥ ३२ ॥ निवर्त्य तंव नाहीं । मा निवर्तवी हा कांई ॥ तरी कैसा बैसे ठाई । निवृत्ति-नामाच्या ॥ ३३ ॥ परी सूर्यासी अंधकारु । कै जाहला होता गोचरु ॥ तरी तमारी हा डगरु । आलाचि कीं ॥ ३४ ॥ तैसें लटिके येणें रूढे । जड येणें उजिवडे ॥ न घडे तेही घडे । याचिया मावा ॥ ३५ ॥ हां गा मायावशे दाविशी । ते माइक म्हणूनी वाळिशी ॥ अमाइक तव नव्हशी । कवणाही विषयो ॥ ३६ ॥ शिव शिवा सद्गुरु । तुजला गूढा काय करु ॥ एकाही निर्धार धरु । देतासी कां ॥ ३७ ॥ नामें रुपें बहुवसे । उभारुनि पाडिली वोसे ॥ सत्तेचेनि अवेशें । तोषलासी ना ॥ ३८ ॥ जीवू घेतलिया उणें । चालो नेदिसी साजणें ॥ भृत्यु उरे स्वामीपणें । तेही नव्हे ॥ ३९ ॥ विशेषाचेनि नांवें । आत्मत्वही न साहवे ॥ किंबहुना नव्हे । कोण्हीचि यया ॥४०॥ राती नुरेचि सूर्या । ना तरी लवण पाणिया ॥ नुरे जेवि चेइलिया । नीद जैशी ॥ ४१ ॥ कापुराचे थळीव । नुरेचि आगीची बरव ॥ नुरेचि रूप नांव । तैसे यया ॥ ४२ ॥ याच्या हाता पाया पडे । तव वंद्यत्वें पुढे न मंडे ॥ न पडेचि हा भिडे । भेदाचिये ॥ ४३ ॥ आपणाप्रति रवि । उदो न

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

करी जेवी ॥ हा वंद्य नव्हे तेवी । वंदनासी ॥ ४४ ॥ कां समोरपण आपुलें । न लाहिजे कांहीं केलें ॥ तैसें वंद्यत्व घातलें । हिरोनी येणें ॥ ४५ ॥ आकाशाचा अरिसा । नुठी प्रतिबिंबाचा ठसा ॥ हा वंद्य नव्हे तैसा । नमस्कारासि ॥४६॥ परी नव्हे तरी न हो । हे देखासी कां भेवो ॥ परी वंदीतयाही ठावो । उरो नेदी ॥ ४७ ॥ आंगौनि एकुणा झोलु । फेडि-ताचि तरि तो बाहिरिलु ॥ कडु फिटे आतुलु । न फेडीताचि ॥ ४८ ॥ नाना बिंबपणासरिसे । घेउनि प्रतिबिंब नासे ॥ नेलें वंद्यत्व येणें तैसे । वंदतेनसी ॥ ४९ ॥ नाहीं रूपाची जेथें सोये । तेथें दृष्टीचें कांहींच नव्हे ॥ आम्हा फळले हे पाये । ऐशिया दशा ॥ ५० ॥ गुणातेलाचिया सोइरिका । निर्वाहिली दीपकळिका ॥ ते कां होईल पुळिका । कापुराचिया ॥ ५१ ॥ तया दोहो परस्परे । होय ना जव मेल्हेरे ॥ तंव दोहीचेहीं सरे । सरिसेचि ॥ ५२ ॥ तेविं देखेना मी ययाते । तंव गेले वंद्य वंदिते ॥ चेइलिया कांते । स्वप्नींचि जेवी ॥ ५३ ॥ बिंब-हुना इया भाषा । द्वैताचा जेथें उपखा ॥ फेडुनियां स्वसखा । श्रीगुरु वंदिला ॥ ५४ ॥ याच्या सख्याची नवाई । आंगीं एकपणा रुप नाहीं ॥ आणि गुरुशिष्य दुवाळीही । पवाडु केला ॥ ५५ ॥ कैसा आपणा आपण । दोंवीण सोयरेपण ॥ हा वाहूनि विलक्षण । नाहीं ना नोहे ॥ ५६ ॥ जग अवघें पोटीं साये । गगनाएवढे होऊनि ठाये ॥ कीं तेचि निसी साहे । नाहींपणाची ॥ ५७ ॥ कां पूर्णते तरी आधारू । सिंधू

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जैसा दुर्भरू ।। तैसा विरुद्धा पाहुणेरू । याच्या घरीं ।। ५८ ।।
तेजा तमातें कांहीं । परस्परे निके नाहीं ।। परी सूर्याच्या ठाईं।
सूर्यचि असे ।। ५९ ।। एक ह्मणता भेदें । ते कीं नानात्वें
नांदे ।। विरुद्धे आपणया विरुद्धे । होतील काई ।। ६० ।।
ह्मणोनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोही शब्दाचा अर्थु ।।
श्रीगुरुचि परि होतु । दोहीं ठाईं ।। ६१ ।। कां सुवर्ण आणि
लेणें । वसतें एके सुवर्णें ।। वसते चंद्र चांदिणे । चंद्रीचि जेवी
।। ६२ ।। नाना कापूर आणि परिमळु । कापूराचि केवळु ।।
गोडी आणि गुळु । गूळाचि जेवि ।। ६३ ।। तैसा गुरु शिष्य
मिसे । हाचि एकु उल्हासे ।। जरी कांहीं दिसे । दोनीपणें ।।६४।।
आरसा आणि मुखी । मी दिसे हे उखी ।। हे आपुलिये ओळखी।
जाणे मुख ।। ६५ ।। पहा पा निरंजनी निदेला । तो निर्विवाद
एकला ।। परी चेता चेववीता जाला । दोनी तोचि ।। ६६ ।।
जे तोचि चेता तोचि चेववी । तेवी हाचि बुझे हा बुझावी ।।
गुरुशिष्यत्व नांदवी । ऐसेन हा ।। ६७ ।। दर्पणेवीण डोळा।
आपुले भेटीचा सोहळा ।। भोगिता तरी लीळा । सांगतो हे
।। ६८ ।। एवं द्वैतासी उमसो । नेदी ऐक्याशी विसकुसो ।।
सोइरिकीचा अतिसो । पोखीतसे ।। ६९ ।। निवृत्ति जया नांव।
निवृत्ति जया बरव ।। जया निवृत्तिची राणीव । निवृत्तीची
।। ७० ।। वांचोनि प्रवृत्तिविरोधें । कां निवृत्तीचेनि बोधे ।।
आणिजे तैसा वादे । निवृत्ति नव्हे ।। ७१ ।। आपणा देऊनि
राती । दिवसा आणि उमाती ।। प्रवृत्ति वारी निवृत्ति । नव्हे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

तैसा ॥ ७२ ॥ ओपसरयाचें बळ । घेऊनि मिरवे कीळ ॥ तैसें रत्न नव्हे निखिळ । चक्रवर्ती हा ॥७३॥ गगनही सूनी पोटी । जैं चंद्राची पवळे पुष्टी ॥ तैं चांदिणें तेणेंसी उठी । आंग जयाचे ॥ ७४ ॥ तैसे निवृत्तिपणासी कारण । हाचि आपणया आपण ॥ घेयावया फूलाचि झाले घ्राण । आपुली दृति ॥७५॥ दिठी मुखाचिये बरवे । पाठीकडूनि जैं पावें॥ तैं आरसे घांडोळावे । लागती काई ॥ ७६ ॥ कीं रातीं हन गेलिया । दिवस हन पातलिया ॥ काय सूर्यपण सूर्या । होआवे लागे ॥ ७७ ॥ हाणोनी बोध्य बोधोनी । घेपे प्रमाणे साधूनि ॥ ऐसा नव्हे भरवसेनी । गोसावी हा ॥७८॥ ऐसें करणयावीण । स्वयंभचि जे निवृत्तिपण ॥ तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥७९॥ आतां ज्ञानदेवो ह्मणे । श्रीगुरुप्रणामे येणें ॥ फेडिली वाचाऋणें । चौही वाचांची ॥ ८० ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते श्रीगुरुस्तवनकथनंनाम द्वितीयप्रकरणं संपूर्ण.

प्रकरण तिसरें

पश्यंचेनि वोभाटे । आत्मयाची झोप लोटे ॥ पूर्ण तऱ्ही ऋण न फिटे । जे चेणेंचि नीदकीं ॥१॥ येऱ्हवी परादिका चौघी । जीव मोक्षाच्या उपेगी ॥ अविद्येसवे आंगीं । वेंचती कीर ॥२॥ देहासवे हात पाये । जाती मनासवे इंद्रियें ॥ कां सूर्यासवे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाये । किरणजाळ ॥ ३ ॥ नातरी निद्रेच्चिये अवधी । स्वप्नें मरती आधीं ॥ तेवि अविद्येचे संबंधीं । अटती इया ॥ ४ ॥ सूतें लोहें होती । ते रसरूपें जिती ॥ जळोनि इंधनें येती । वन्हीदशे ॥ ५ ॥ लवण आंगें विरे । परि स्वादें जळीं उरे ॥ नीद मरोनि जागरें । जीइये निदें ॥ ६ ॥ तेवि अविद्येसवे । चौथी वेचिती जीवे ॥ तत्वज्ञानाचेनि नांवें । उठतीच इया ॥७॥ हा तत्वज्ञानदिवा । मरोनी इहीं लावावा ॥ तरी हाही शीण-लेवा । बोधरूपेचि ॥८॥ येऊनि स्वप्न मेळवी । गेलिया आप-णपा दावी ॥ दोन्ही दिठी नांदवी । नीद जैशी ॥ ९ ॥ जिति अविद्या ऐशी । अन्यथा बोधाते गिवशी ॥ तेचि यथाबोधेशी । निमाली उठी ॥ १० ॥ परी जिती ना मेली । अविद्या हे जाकळी ॥ बंधमोक्षी घाली । बांधोनियां ॥ ११ ॥ मोक्षाचि बंधु होये । तरी मोक्ष शब्द कां साहे ॥ अज्ञाना घरी त्राये । बाउगी यांची ॥ १२ ॥ बागुलाचेनि मरणें । तोषावे कीं बाल-पणें ॥ येरा तो नाहीं ना कोणे । मृत्यु मानावा ॥ १३ ॥ घटाचे नाहींपण । फुटलेयाची नागवण ॥ मानितसे ते जाण । ह्मणो ये कीं ॥ १४ ॥ ह्मणोनी बंधचि तंव वावो । ना मोक्षा के प्रसवो ॥ परी मरोनी केला ठावो । अविद्या तया ॥ १५ ॥ आणि ज्ञान बंधु ऐसें । शिवसूत्राचेनि मिसे ॥ ह्मणितले असे । सदाशिवे ॥ १६ ॥ आणि वैकुंठीचेनिही सुजाणें । ज्ञानपाशीं सत्वगुणें ॥ बांधिजे हे निरोपण । बहु केलें ॥ १७ ॥ परी शीवें कां श्रीवल्लभें । बोलिले यणेंचि लाभें ॥ मानू ते हे लाभे ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

न बोलतांही ॥ १८ ॥ जें आत्मज्ञान निखिळ । तेही घे ज्ञानाचें वळ ॥ तैं सूर्ये चिंती सबळ । तैसें नोहे ॥ १९ ॥ ज्ञानें श्लाघत् आहे । तैं ज्ञानपण धाडिले वाये ॥ दीप वांचोनि दिवा लाहे । तैं आंग भूललाचि कीं ॥ २० ॥ आपणपे आपणापाशी । नेणतां देशोदेशी ॥ आपणापे गिवसी । हें कीरू होये ॥ २१ ॥ परि बहुतां कां दिया । आपणापे आठवलिया ॥ ह्मणे मी यया । कैसा रिझो ॥ २२ ॥ तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा ॥ करितसे सोहमा । ऐसा बंधु ॥ २३ ॥ जें ज्ञान स्वयें बुडे । म्हणोनी भारी नावडे ॥ ज्ञानें मोक्षु घडे । ते निमालेनि ॥ २४ ॥ ह्मणोनी परादिका वाचा । तो शृंगारु चौ आंगाचा ॥ एवं अविद्याजी-वाचा । जीवत्वत्यागी ॥ २५ ॥ आंगाचेनि इंधनें उदासु । उठोनि ज्ञानाग्नी प्रवेशु ॥ करी तेथें भस्मलेशू । बोधाचा उरे ॥ २६ ॥ आंगीं लाविलिया विभूति । ते परीमाणूही झडती ॥ परी पांडुरत्वें कांती । राहे जैशी ॥ २७ ॥ जळीं जळा वेगळु । कापूर न दिसे अवडळु ॥ परी होऊनि परिमळु । उरे जेवी ॥ २८ ॥ ना वोहळलाआंगीं जैसे । पाणी पाणीपणें नसे ॥ तऱ्ही वोल्हासाचेनि मिसे । आथीच ते ॥ २९ ॥ नातरी माध्यान्हकाळी । छाया न दिसे वेगळी ॥ असे पायातळी । रिगोनिया ॥ ३० ॥ तैसें ग्रासूनि दुसरे । स्वरूपीं स्वरूपाकारे ॥ आपुलेपणे उरे । बोध जो का ॥ ३१ ॥ तें ऋणशेष वाचा इया । न फेडवे मरोनिया ॥ तें पाया पडोनि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मियां । सोडविले ॥ ३२ ॥ ह्मणोनि परा पश्यंति । मध्यमा हन भारती ॥ या निस्तरिलिया लागती । ज्ञानी अज्ञानीची ॥ ३३ ॥

इति श्रीसिद्धानुवाद श्रीमदनुभवामृते वाचाऋणमोचनं नाम तृतीयप्रकरणं संपूर्णं ॥ शुभं भवतु ॥

प्रकरण चवथें.

आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरे ॥ नीद साधूनि जागरें । नांदिजे जेवि ॥ १ ॥ कां दर्पणाचा निवाला । ऐक्यबोधू पाहिला ॥ मुख भोगी आपुला । आपणाचि ॥ २ ॥ ज्ञान जियातिया परी । जगीं आत्म्यैक्य करी ॥ तैं सुरिया खोचे सुरी । तैसें जाहलें ॥ ३ ॥ लावी आत ठाउनि कोपट । तो साधी आपणया सकट ॥ कां बांधलेया चोरट । मोटेमाजी ॥ ४ ॥ आगी पोतासाचेनि मिसे । आपणपे जाळिले जैसे ॥ ज्ञानाज्ञाननाशे । तैसें जाहलें ॥ ५ ॥ अज्ञानाचा टेका । नसताही ज्ञान अधिका ॥ फाके जव उफका । आपुला पडे ॥ ६ ॥ वात दशाही ते निमालियां । येणे जे ये उवाया ॥ ते केवळ नाशावया । दीपाचे परी ॥ ७ ॥ उठणें कीं पडणें । कुंभाराचे कोण जाणे ॥ कां फाकणें कीं सुकणें । जाउळाचे ॥ ८ ॥ तरंगाचे रुपा येणें । तयाचि नांव निमणें ॥ कां विजूचे उदैजणें । तोचि अस्तु ॥ ९ ॥ तैसें पिऊनि अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जंव आपुले निधन । निःशेष साधे ॥ १० ॥ जैसें कल्पांतींचे भरिते । स्थळां जळां दोहींते ॥ बुडविल्या अरौते । राहोचि नेणे ॥ ११ ॥ कीं विश्वाही वेगळ । वाढे जैं सूर्यमंडळ ॥ तैं तेजतम निखिळ । तेंचि होये ॥ १२ ॥ नाना नीद मारोनी । आपणपें हिरोनी ॥ जागणे ठाके होउनी । जागणेंचि ॥ १३ ॥ तैसें अज्ञान अटोनिया । ज्ञान येते उवाया ॥ ज्ञानाज्ञान गिळोनिया । ज्ञानचि होये ॥ १४ ॥ ते वेळीं पुनिवा भरे । ना आवसा सरे ॥ तें चंद्रचि उरे । सतरावी जैशी ॥ १५ ॥ कां तेजांतरे नाटोपे । कोणे तमे न शिंपे ॥ ते उपमेचे जाउपे । सूर्यचि होय ॥ १६ ॥ ह्मणोनी ज्ञानें उजळे । कां अज्ञाने रुळे ॥ तैसें नव्हे निर्वाळे । ज्ञानमात्र जे ॥ १७ ॥ परि ज्ञानमात्रे निखळे । तेंचि कीं तया कळे ॥ काई देखिजे बुबुळें । बुबुळा जेवी ॥१८॥ आकाश आपणपया रिघे । काइ आगी आपणया लागे ॥ आपुला माथा वळघे । आपण कोण्ही ॥ १९ ॥ दिठी आपणया देखे । स्वाद आपणया चाखे ॥ नादु आपुलें आइके । नादपण ॥ २० ॥ सूर्य सूर्यासी विवळे । कां फळ आपणया फळे ॥ परिमळु परिमळे । घेपत असे ॥ २१ ॥ तैसें आपणया आपण । जाणते नव्हे जाण ॥ ह्मणोनी ज्ञानपणेंवीण । ज्ञानमात्र जे ॥ २२ ॥ आणि ज्ञान ऐशी सोये । ज्ञानपणेंचि जरी साहे ॥ तरी अज्ञान हें नोहे । ज्ञानपणेंचि ॥ २३ ॥ जैसें तेज जें आहे । तें अंधारें कीर नव्हे ॥ मा तेज तरी होये । तेजासी काई ॥ २४ ॥ तैसें असणें आणि नसणें । हें नाहीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जया होणें ॥ आतां मिथ्या ऐसें येणें । बोले गमे ॥ २५ ॥
तरी कांहीं नाहीं सर्वथा । ऐशी जरी व्यवस्था ॥ तरी नाहीं हे
प्रथा । कवणासी पा ॥ २६ ॥ शून्यासिद्धांतबोधु । कोणी
सत्ता होय सिध्दू ॥ नसता हा अपवादु । वस्तूसी जो ॥२७॥
माल्हविता दिवे । माल्हविते जरी मालवे ॥ तरी दीपु नाहीं
हे फावे । कवणासी पा ॥ २८ ॥ कीं निदेचेनि आलेपणें ।
निदेले ते जाय प्राणे ॥ तरी नीद भली हे कोणे । कोणासी
पा ॥ २९ ॥ घट्ट घट्टपणें भासे । तद्भंगें भंगु आभासे ॥
सर्वथा नाहीं तैं नसे । कोण्हे म्हणावें ॥ ३० ॥ म्हणोनी
कांहींनाहीं पण । देखता नाहीं आपण ॥ नोहोनी असणें-
नवीण । असणें जे ॥ ३१ ॥ परि आणिका कां आपणया ।
न पुरे विखो होआवया ॥ म्हणोनी न असावया । कारण कीं
॥ ३२ ॥ जो निरंजनीं निदेला । तो आणिकी नाहीं देखिला॥
आपुलाही निमाला । आठवूं तया ॥ ३३ ॥ परी जीवें नाहीं
नोहे । तैसें शुद्ध असणें आहे ॥ हें बोलणें न साहे । असे-
नाहींचे ॥ ३४ ॥ दिठी आपणया मुरडे । तैं दिठीपणही
मोडे ॥ परी नाहीं नोहे हें फुडे । जाणेंचि ते ॥ ३५ ॥ कां
काळा राहे काळवखा । तो आपणा ना आणिकां ॥ न चोजवे
तऱ्ही आसिका । हा मी बाणे ॥ ३६ ॥ तैसें असणें कां
नसणें । हें कांहींच मानूसवाणें ॥ नसोनि असणें । ठायें ठावो
॥ ३७ ॥ निर्मळपणीं आपुला । आकाशाचा संचु विराला ॥
तो स्वयें असे पुढिला । कांहीं ना की ॥ ३८ ॥ कां आंगीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

LIBRARY
Jangamawadi Math, Varanasi
Acc. No. 3745

कीं निर्मळपणीं । हारतलिया पोखरणीं ॥ हें आणिका वांचूनि पाणी । सगळेंच आहे ॥ ३९ ॥ आपणया भागू तैसें । असणेंचि जें असे ॥ असेनाहीं ऐसें । सांडूनियां ॥ ४० ॥ निद्रेचें नाहींपण । निशालियाही जागेपण ॥ असिजे कां नेण । कोणी होऊनि जैसें ॥ ४१ ॥ कां भूमि कुंभ ठेविजे । तै सकुंभता आपजे ॥ तो नेलिया म्हाणिजे । तेणेंविणें ॥ ४२ ॥ परी दोन्ही हे भाग । न शिवती भूमीचें आंग ॥ ते वेळीं भूमि तैसें चांग । चोख जें असणें ॥ ४३ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते ज्ञानअभेदकथनं नाम चतुर्थप्रकरणं संपूर्ण ॥

प्रकरण पांचवें.

सत्ता प्रकाश सुख । या तिहीं तिहींउणे लेख ॥ जैसें विष-पणेंचि विख । विखा नाहीं ॥१॥ कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक ॥ द्राव गोडी पियूख । पियूखचि जेंवि ॥२॥ उजाळ द्रुति मार्दव । या तिहीं तिहींउणीव ॥ हे देखिजे सावेव । कापुरीं येके ॥ ३ ॥ आंगें कीर उजाळ । कीं उजाळताचि मवाळ ॥ कीं दोन्ही ना परिमळ । मात्र जे ॥ ४ ॥ ऐसे ये कापूरपणीं । तिन्हीं इये तिहींउणी ॥ इयापरी आटणी । सत्ता-दिकांची ॥५॥ येऱ्हवी सच्चिदानंद भेदें । चालिली तिन्ही पदें ॥ परी तिन्ही उणी आनंदें । केलीं येणें ॥ ६ ॥ सत्ताचि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कीं सुखप्रकाशु । प्रकाशूचि सत्ताउल्हासु ॥ हें न निवडे मिठांशु । अमृतीं जेवीं ॥ ७ ॥ शुक्लपक्षीच्या सोळा । दिवसा वाढती कळा ॥ परी चंद्र मात्र सगळा । चंद्रीं जेवी ॥ ८ ॥ थेंबीं पडतां उदक । थेंबां धरु ये लेख ॥ परी पाडिलाठायीं उदक । वांचूनि आहे ॥ ९ ॥ तैसें असताचिया व्यावृत्ति । सत ह्मणूं आले श्रुति॥ जडाचिया समाप्ती । चिद्रूप ऐसें ॥ १० ॥ दुःखाचेनि सर्व नाशें । उरलें तें सुख ऐसे ॥ निगादिले निश्वासें । प्रभूचेनी ॥ ११ ॥ ऐशी सदादि प्रतियोगिये । असदादि तिन्ही ये ॥ लोटिता जाली त्राये । सत्तादिकां ॥ १२ ॥ एवं सच्चिदानंदु । आत्मा हा ऐसा शब्दु ॥ अनव्यावृत्तिसिध्दु । वाचक नव्हे ॥ १३ ॥ सूर्याचेनि प्रकाशे । जें कांहीं जड आभासे ॥ तया तो गिवसे । सूर्य काई ॥ १४ ॥ तेवि जेणें तेजें । वाचेसी वाच्य सुजे ॥ ते वाच्या प्रकाशिजे । हें कें आहे ॥ १५ ॥ विषो नाहीं कोणाही । जया प्रमेयत्वचि नाहीं ॥ तया स्वप्रकाशा काई । प्रमाण होये ॥ १६ ॥ प्रमेय परिच्छेदें । प्रमाणत्व नांदे ॥ तीं काई स्वतःसिद्धे । वस्तुच्या ठाईं ॥ १७ ॥ एवं वस्तूशीं जाणों जातां । जाणणेंचि वस्तु तत्वता ॥ मग जाणणें आणि जाणता । कैचा उरे ॥ १८ ॥ म्हणोनी सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक ॥ नव्हती हे शेष । विचाराचे ॥ १९ ॥ ऐसेन इये प्रसिद्धे । चालली सच्चिदानंदपदें ॥ मग द्रष्ट्या स्वसंवादे । भेटती जेव्हां ॥ २० ॥ तेवेळीं वरषोनी मेघु । समुद्र होऊनि वोघु ॥ सरे दाऊनी मागू । राहे जैसा ॥ २१ ॥ फळ

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

विउनी फूल सुके । फळ नाशे रसपाकें ॥ तोही रस उपखे । तृप्तीदानीं ॥ २२ ॥ कां आहूति अग्नीआत । घालूनि वोसरे हात ॥ सुख चेवऊनि गीत । उगा राहे ॥ २३ ॥ नाना मुखा मुख दाऊनि । अरिसा जाय निघौनि ॥ कां निदेले चेवउनी । चेविते जैसे ॥ २४ ॥ तैसें सच्चिदानंदा चोखटा । दाऊनि द्रष्टया द्रष्टा ॥ तिन्हीं पदें लागती वाटा । मौनाचिया ॥ २५ ॥ जें जें बोलिजे तें तें नव्हे । होय तें तंव न बोलवे ॥ साउलिवरी न मवे । मावते जैसें ॥ २६ ॥ मग आपुलियाकडे । मावितया से पडे ॥ तै लाजलाजो आखुडे । माविती जैसी ॥ २७ ॥ तैशी सत्ताचि स्वभावें । असत्ता तंव नव्हे ॥ मा सत्तात्व संभवे । सत्तेसी काई ॥ २८ ॥ आणि अचिदाचेनि नाशे । आले जे चिन्मात्रदशे ॥ आतां चिन्मात्रचि मा कैसे । चिन्मात्रीं ये ॥२९॥ नीद प्रबोधाच्या ठाईं । नसे तैसे जागणेंही ॥ तेवि चिन्मात्रचि मा काई । चिन्मात्री ये ॥ ३० ॥ ऐसें यया सुखपणें । नाहीं कीरु दुःख होणें ॥ मा सुख हें गणणें । सुखाशी काई ॥३१॥ ह्मणोनी सदसदत्वें गेलें । चिदचिदत्वें मावळलें ॥ सुखासुख जालें । कांहीं ना कीं ॥ ३२ ॥ आतां द्वंद्वाचे लवंचक । सांडुनि दुणीचें कंचुक ॥ सुखमात्राचि येक । स्वये आथी ॥ ३३ ॥ वरी येकपणें गणिजे । तें गणतेनसी दुजे ॥ ह्मणोनि हें न गणिजे । ऐसें एक ॥ ३४ ॥ सुखा आतोनी निघणें । ते सुखिये सुखी तेणें ॥ हें सुखमात्राचि मा कोणे । अनुभवावें ॥ ३५ ॥ जैं प्रकृति डंकु अनुकारे । तैं प्रकृति डंके अवतरे ॥ मा डंकुचि तैं भरे ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोणकोणा ॥ ३६ ॥ तैसें आपुलेनि सुखपणें । जया नाहीं सुखावणें ॥ आणि नाहीं हेंही जेणें । नेणिजे सुखें ॥ ३७ ॥ आरिसा न पाहतां मुख । स्वयें सन्मुख ना विन्मुख ॥ तेवीं नसोनी सुखासुख । सुखाचि जें ॥ ३८ ॥ सर्वसिद्धांताच्या उजरिया । सांडूनिया निदसुरिया ॥ आपुलिया हाता चोरिया । आपणाचि जे ॥ ३९ ॥ न लविता ऊंस । ते जैसेनि असे रस ॥ तेथिचा मिठांश । तोचि जाणे ॥ ४० ॥ कां न सज्जीता विणा । तो नादु जो अबोलणा ॥ तया तेणेंचि जाणा । होआवे लागे ॥ ४१ ॥ नाना पुष्पाचिया उदरा । न येतां पुष्पसारा ॥ आपणाचि भवरा । होआवे पडे ॥ ४२ ॥ नाना न रांधिता रससोयें । ते गोडी कैशी पा आहे ॥ हें पाहणें तैसें नोहे । आणिकाजोगी ॥ ४३ ॥ तैसें सुखपणा येवो । लाजे आपुले सुख पावो ॥ ते आणिका चाखोसुवो । येइल काई ॥ ४४ ॥ दिहाच्या दुपारी । चांदू जैसा अंबरीं ॥ ते असणे चांदावरी । जाणावें कीं ॥ ४५ ॥ रूप नाहीं तैं लावण्य । अंग नुठी तैं तारुण्य ॥ क्रिया न फुटे तैं पुण्य । कैसें असे ॥ ४६ ॥ जैं मनाचा अंकुर नुपजे । तेथलेन मकरध्वजे ॥ तोचि हन माजे । तरीच घडे ॥ ४७ ॥ कां वाद्यविशेषाची सृष्टी । जैं जन्म नेघे दृष्टी ॥ तैं नाद ऐशी गोष्टी । नादाचि जोगी ॥ ४८ ॥ नाना काष्ठाचिया विटाळा । वोसरलियाही अनळा ॥ लागणें केवळा । आंगासीचि ॥ ४९ ॥ दर्पणाचेनि नेमें । विणाचि मुख प्रमे ॥ आणिती तेंचि वर्में । वर्मती येणें ॥ ५० ॥ न येरितां पिकू जोडे । ते मुडाचि

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आहे रोकडे ॥ ऐशिया सोई उघडे । बोलणें हें ॥ ५१ ॥ एवं विशेष सामान्य । दोहीं नातळे चैतन्य ॥ तें भोगिजे अनन्य । तेणेंसी सदां ॥ ५२ ॥ आतां यावरी जें बोलणें । तें येणेंचि बोले शहाणे ॥ जें मौनाचेही निपटणें । पिऊनि गेले ॥ ५३ ॥ एवं प्रमाणें अप्रमाण । पण केलें प्रमाण ॥ दृष्टांती वाइली आण । दिसावयाची ॥ ५४ ॥ आंगाचिया अनुपपत्ती । आटलिया उपपत्ती ॥ येथें उठली पांती । लक्षणांची ॥ ५५ ॥ उपाय मागिला पाये । घेऊनि जाले वाये ॥ प्रतीति सांडिली सोये । प्रत्ययाची ॥ ५६ ॥ येथें निर्धारेंसी विचार । निमोनि जाला साचार ॥ स्वामीच्या संकटीं शूर । सुभट जैसा ॥ ५७ ॥ नाना नाश साधुनी आपुला । बोध बोधें लाजिन्नला ॥ नुसधेपणें थोटावला । अनुभवू जेथ ॥५८॥ भिंगाचिया चडळा । पदराचा पुंज वेगळा ॥ करितां जैसा निफळा । आंगाचा होये ॥ ५९ ॥ कां गजबजिला उबा । पांघुरणें केळीचा गाभा ॥ सांडी तेव्हेळी उभा । कैचा कीजे ॥ ६० ॥ तैसें अनुभाव्य अनुभाविक । इहीं दोहीं अनुभूतिक ॥ ते गेलिया कैचे एक । एकासीचि ॥६१॥ अनुभवा हा ठावोवरी । आपुलीच अनवसरी ॥ तेथें अक्षराची हारी । वाइल काई ॥ ६२ ॥ कां परेसी पडे मिठी । तेथें नादा सळ तुटी ॥ मा वावरीजेल वोठीं । हें कें आहे॥६३॥ चेइलिया पाठीं । चेवणयाच्या गोठी ॥ कीं धाला वैसे पाठीं । रंधनाच्या ॥ ६४ ॥ उदेलिया दिवसपति । तै कीं दिवे सेजे येती ॥ वांचूनि पिकला शेती । सुइजताती नांगर काई ॥ ६५ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ह्मणोनि बंधमोक्षाचें व्याज । नाहीं निमाले काज ॥ आतां निरुपण भोज । बोळगे जरी ॥६६॥ आणि पुढिला कां आपणापे । वस्तु विसराचेनि हाते हारपे ॥ मग शद्बेंचि येपे । आठवूनिया ॥ ६७ ॥ येतुलियाही परौते । चांगावें नाहीं शद्बातें ॥ जरी सारकपणें कीर्तीतें । मिरवी हा जगीं ॥ ६८ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते सच्चिदानंद-
पदत्रयविवरणं नाम पंचमप्रकरणं संपूर्णम् ॥

प्रकरण सहावें

बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ॥ अमूर्ताचा विशदु । अरिसा नव्हे ॥ १ ॥ पाहते अरिसा पाहे । येथें कांहींचि नवल नव्हे ॥ परि दर्पणें येणें होये । नपाहते पाहते ॥२॥ वडिला अव्यक्ताचिया वंशा । उद्योतकार सूर्य जैसा ॥ येणें एके गुणें आकाशा । अंबरत्व ॥३॥ आपण तंव खपुष्प । परी फळ दे जगद्रूप ॥ शब्द सवि तैं अमुप । कोण आहे ॥४॥ विधिनिषेधाचिया वाटा । दाविता हाचि दिवटा ॥ बंधमोक्ष कळिकटा । शिष्ट हाचि ॥ ५ ॥ हाचि अविद्येच्या आंगीं पडे । तै नाथिले ऐसें रूढे ॥ न लाहिजे तीन कवडे । साचा वस्तु ॥ ६ ॥ शुद्धा शिवाच्या शरीरीं । कुमारु हा जीउ भरी ॥ जेवि आंगे पंचाक्षरी । तेविचि बोलु ॥ ७ ॥ जीव देहें बांधिला । तो बोलें एकें सुटला ॥ आत्मा बोलें भेटला ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आपणपया ॥८॥ दिवसातें उगो गेला । तंव रात्रीचा द्रोहो आला ॥ ह्मणोनी सूर्यो या बोला । उपमा नव्हेचि ॥ ९ ॥ जे प्रवृत्ति आणि निवृत्ति । विरुद्धा इया हातु धरिती ॥ मग शब्देंचि चालती । एकलेनि ॥ १० ॥ सहाय आत्मविद्येचे । करावया आपण वेंचे ॥ गोमटे काय शब्दाचे । एकैक वानू ॥ ११ ॥ किंबहुना शब्दु । स्मरणदानीं प्रसिध्दु ॥ परी ययाही समंधू । नाहीं येथें ॥ १२ ॥ आत्मया बोलाचे । कांहींचि उपयोगा न वंचे ॥ स्वसंवेद्या कोण्हाचे । ओझें आथी ॥ १३ ॥ आठवे कां विसरे । विषो होऊनि अवतरे ॥ तरी वस्तूशीं वस्तु दुसरे । असेना कीं ॥ १४ ॥ आपण आपणयाते । आठवी विसरे केउतें ॥ काय जिभ जिभेतें । चाखे न चाखे ॥ १५ ॥ जागणेंया नीद नाहीं । मा जागणे घडे काई ॥ स्मरणास्मरण दोन्हीही । स्वरूपी तैशी ॥ १६ ॥ सूर्यो रात्री पा नेणें । मा दीवो काय जाणे ॥ तेवी स्मरणास्मरणें । आपण वस्तु ॥१७॥ एवं स्मरणास्मरण नाहीं । तरी स्मारके काज काई ॥ म्हणोनी इये ठाई । बोलू न सरे ॥ १८ ॥ आणिक एक शब्दें । काज कीरू भले सिद्धे ॥ परी धिवसा न वंधे । विचारु येथ ॥१९ ॥ कां जे बोले अविद्या नाशे । मग आत्मेन आत्मा भासे ॥ ह्मणतखेव पिसें । आलेंच कीं ॥ २० ॥ सूर्यो रात्री मारील । मा आपणया उदो करील ॥ हे कुडे सरती बोल । साचाच्या गांवीं ॥ २१ ॥ निदेले निदे रुसे । ऐसें कीं नीद असे ॥ कीं चेइले चेऊ वैसे । ऐसे चेयों आहे ॥ २२ ॥ ह्मणोनी नाशा पुरती ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अविद्या नाहीं निरुती ॥ नाहीं आत्मा आत्मस्थिति । रिगे ऐसा ॥ २३ ॥ अविद्या तंव स्वरुपे । वांझेचे कीर जाउपे ॥ मा तर्काचें खुरपें । खांडणें कोणा ॥ २४ ॥ इंद्रधनुष्या सिते । कवण थन-वई न घालिजेते ॥ ते दिसे तैसें होतें । साच जरी ॥ २५ ॥ अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगतृष्णिका ॥ तरी मार देतो तर्का । अविद्येशीं ॥ २६ ॥ साहे बोलाची वळघी । ऐशी अविद्या असे जगीं ॥ तरी जाळूना कां आगीं । गंधर्वनगरे ॥ २७ ॥ नातरी दीपाचिये सोये । अंधारे कीर न साहे ॥ तेथें कांहीं आहे । जावयाजोगें ॥ २८ ॥ नातरी पाहावया दिवसु । वातीचा कीजे सोसु ॥ तेव्हडाही उद्वसु । उद्यम्रु पडे ॥ २९ ॥ जेथें साउली न पडे । तेथें नाहीं जेणें पाडे ॥ मा पडे तेथें तेव्हडे । नाहींच कीं ॥३०॥ दिसताचि स्वप्न लटिकें । हें जागरी होय ठाउकें ॥ तेंवि अविद्याकाळीं सतुके । अविद्या नाहीं ॥ ३१ ॥ वोडंबरीच्या लेणिया । घरभरी आतुडलिया ॥ नागवे नागविलिया । विशेषु काई ॥ ३२ ॥ मनोरथाचे परि-यळ । अरोगिजतु कां लक्षवेळ ॥ परी उपवासा वेगळ । आतु आथी ॥ ३३ ॥ मृगजळ जेथ तुमंडे । तेथ असे पा कोरडे ॥ मा उमंडे तेथ जोडे । वोल्हांसु काई ॥ ३४ ॥ हें दिसे तैसें असे । तरी चित्रींचेनि पाउसे ॥ वोल्हावतु कां माणुसें । आगरा तळी ॥३५॥ कालवूनि अंधारें । लिहों येती अक्षरें ॥ तरी मशी-चिये वोरवारे । कां शिणावें ॥ ३६ ॥ आकाश काय निळें । न देखतु हे डोळे ॥ तेवी आविद्या टवाळे । जाणोनी घेई ॥ ३७ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अविद्या येणें नांवें । मी विद्यमानचि नव्हें ।। हे अविद्याचि स्वभावें । सांगतसे ।। ३८ ।। आणि इये अनिर्वाच्यपण । ते दुजेही देवांगण ।। आपुला अभावी आपण । साधितसे ।। ३९ ।। कांहींच जरी आहे । तरी निर्धारु कां न साहे ।। वरी घटाभावीं भोये । अंकित दिसे ।। ४० ।। अविद्या नाशी आत्मा । ऐशी नव्हे भ्रमा ।। सूर्या आंगीं तमा । जयापरी ।। ४१ ।। हे अविद्या तरी मायावी । परी मायावीपणाचि लपवी ।। हे साचा आली अभावी । आपुलाहे ।। ४२ ।। बहुतापरी ऐशी । अविद्या नाहीं आपैशी ।। आतां बोलू हात वसी । कवणावरी ।। ४३ ।। साउलि येते साबळे । हालया भोय आडळे ।। कीं हालेन अंतराळे । थोटावे हातु ।। ४४ ।। कां मृगजळाच्या पानीं । गगनाच्या आलिंगनी ।। नातरी चुंबनी । प्रतिबिंबाच्या ।। ४५ ।। उठावला वोथरे तवका । तो सुनाथा पडे असिका ।। अविद्यानाशी तर्का । तैसें होये ।। ४६ ।। ऐशी अविद्या नासावी । हे वाहेल जो जीवी ।। त्यानें साली काढावी । आकाशाची ।।४७।। तेणें शेळी गळा दोहावी । गुडगाडोळा वास पहावी ।। वाळवूनि काचरी करावी । सांजवेळेची ।।४८।। जांभई वाटूनि रसु । तेणें काढावा बहुवसु ।। कालवूनि अळसु । मोदला पाजावा ।।४९।। तो पाटा पाणी परतु । पडली साउली उलथु ।। वारयाचे ताथू । वळू सुखे ।। ५० ।। तो बागुलाते मारु । प्रतिबिंब खोळे भरु ।। तळहातीचे विंचरु । केश सुखे ।।५१।। घटाचे नाहींपण फोडु । गगनाचीं फुलें तोडु ।। सशियाचे मोडु । शिंग सुखें ।।५२।। तो

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कापुराची मशी करु । रत्नदीपीं काजळ धरु ।। वांझेचें लेंकरुं । परणू सुखें ।। ५३ ।। तो अवसेचिनि सुधाकरे । पोखू पाताळींची चकोरें ।। मृगजळींची जळचरें । गाळू सुखे ।। ५४ ।। अहो हे किती बोलावें । अविद्या रचिली अभावें ।। आतां काय नासावें । शब्दे येणें ।। ५५ ।। नाहीं तयाचेनि नासे । शब्द नये प्रमाणदशे ।। आंधारीं अंधारा जैसे । नव्हे रूप ।। ५६ ।। अविद्येची नाहीं जाती । तेथें नाहीं म्हणतया युक्ति ।। जेंवी दुपारी कां वाती । अंगणीचिया ।। ५७ ।। न पेरितां शेतीं । जे कीं संवगणिया जाती ।। तया लाजापरौती । जोडी आहे ।। ५८ ।। खवणियाच्या आंगा । जेणे केला वळघा ।। तो नकारिताचि उगा । घरीं होता ।।५९।। पाणियावरी वरखु । होतां कें असे विशेखू ।। अविद्यानाशी उन्मेखू । फाकावा तैसा ।। ६० ।। माप मापपण श्लाघे । जंव आकाश मऊ नरिघे ।। तम पाहतां वाउगे । दीपाचे जन्म ।। ६१ ।। गगनाची रससोये । जीभ जैं अरोगु जाये ।। मग रसना हे होये । आडनांव कीं ।। ६२ ।। नव्हतेन वल्लभे । आहेवपण कां शोभे ।। खाता केळीचे गाभे । न खाता गेले ।। ६३ ।। स्थूल सूक्ष्म कवणयेकू । पदार्थ न प्रकाशी अर्कू ।। परी रात्रीविषयीं अप्रयोजिकु । जालाचि कीं ।। ६४ ।। दिठी पाहतां काय न फवे । परी निदेते तंव न देखवे ।। चेतातें न संभवे । ह्मणूनिया ।। ६५ ।। चकोराचिया उद्यमा । लटिकेपणाची सीमा ।। जरी दिहाची चंद्रमा । गिंवसूं बैसे ।। ६६ ।। तुसधीयेचि साच्या । मुका होय वाचरुकाचा ।। अंतराळी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पायाचा । पैंथा होये ॥ ६७ ॥ तैशीं अविद्येसीं सन्मुखे । सिद्धचि अतिसेदकें ॥ उठलीचि निरर्थकें । जल्पें होती ॥ ६८ ॥ अवसे आला सुधाकरु । न करीचि काई अंधःकारु ॥ अविद्यानाशी विचारु । तैसा होये ॥ ६९ ॥ नाना न निफजतेन अन्नें । जेवणें तेंचि लंघनें ॥ निमालेन नयनें । पाहणाचि अंधू ॥ ७० ॥ कैसेन ही वस्तु नसे । तेथें जैं शब्दाचा अर्थ हो बैसे ॥ तैं निरर्थकपणें नाशे । शब्दही थिता ॥ ७१ ॥ आतां अविद्याचि नाहीं । हें कीर म्हणो काई ॥ परी नाशितां कांहीं । नुरेचि शब्दाचें ॥७२॥ यालागी अविद्येचिया मोहरा । उठिलियाही विचारा ॥ आंगाचाचि संसारा । होऊनि ठेला ॥ ७३ ॥ म्हणोनी अविद्येचेनि मरणें । प्रमाणा येइल बोलणें ॥ हे अविद्याचि नाहींपणें । नेदी घडो ॥ ७४ ॥ आणि आत्मा हन आत्मया । दाऊनि बोलू महिमया ॥ येईल हे सविया । विरुद्धचि ॥ ७५ ॥ आपणया आपणपेशी । लागले लग्न कवणे दिवशीं ॥ कीं सूर्य आंग ग्रासी । ऐसें ग्रहण आहे ॥ ७६ ॥ गगन आपणया निघे । सिंधू आपणपा रिघे ॥ कीं तळहात काय वळंघे । आपणपया ॥ ७७ ॥ सूर्य सूर्यासी विवळे । फळ आपणया फळे ॥ कीं परिमळु परिमळे । घेपतसे ॥ ७८ ॥ चराचरा पाणीपाजणी । करूं येईल एके क्षणी ॥ परी पाणीयासी पाणी । पाजो ये काई ॥ ७९ ॥ साठीतिसा दिवसा । माजी एकादा होय ऐसा ॥ जे सूर्यासी सूर्य जैसा । डोळा दावी ॥ ८० ॥ कृतांत

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जरी कोपेल । तरी त्रैलोक्य हे जाळील ॥ वांचूनि आगी लावील । आगीसी काई ॥ ८१ ॥ आपणपे आपणया दर्पणेवीण धात्रया ॥ समोर होआवया । ठाकी आहे ॥ ८२॥ दिठी दिठीते रिघो पाहे । रुचि रुचीते चाखू सूये ॥ चेतया चेवऊ ये । हें नाहींच कीं ॥ ८३ ॥ चंदन चंदनपण लावी । रंगु रंगपणा रावी ॥ मोतीपण मोती लेववी । ऐसे कैसे ॥ ८४ ॥ सोनेपण सोने कसी । दीपपण दीप प्रकाशी । रसपण बुडी दे रसीं । तें के जोंडे ॥ ८५ ॥ आपुले मुकुटीं समर्था । चंद्र बैसाविला सर्वथा ॥ परी चंद्र चंद्राचिये माथां वाउ ये काई ॥ ८६ ॥ तैसा आतमराज तंव । ज्ञानमात्रैं भरीव ॥ आतां ज्ञानें ज्ञानासी खेव । कैसें दीजे ॥ ८७ ॥ आपुलेनि जाणपणें । आपणयाते जाणो नेणे ॥ डोळां आपुले पाहणे । दुवाड जैसें ॥ ८८ ॥ आरसा आपुलिये आंगीं आपणा पाहे ॥ तैं जाणणे जाणो लाहे । आपणयाते ॥ ८९ ॥ दिगंता पैलीकडेचे । धांवोनी सूर्या खोंचे ॥ मा तिये तियेचें । आंग फुटे ॥ ९० ॥ रसवृत्तीसी उगाणे । घेऊ जिव्हाग्र शहाणे ॥ परी काई कीजे नेणे । आपणपे चा ॥ ९१ ॥ तरी जिभे काय आपुले । चाखणे हन ठेले ॥ नव्हे संचले । तेचि ते कीं ॥ ९२ ॥ तैसा आत्मा सच्चिदानंदु आपणया आपण सिध्दु ॥ आतां काय दे शब्दु । तयाचे ॥ ९३ ॥ कोणाही प्रमाणाचेन हाते । वस्तु घे ना नेघे आपणयाते ॥ जे स्वयें आइते । घेणे ना नघेणे ॥ ९४ ॥ प्रमाणें

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आत्मा आत्मलाभे । नांदवूनि शब्द शोभे ॥ येईल ऐसा न लभे । उमसू घेवो ॥ ९५ ॥ एवं माध्यान्हीची दिवी । तम धाडी ना दिवो दावी ॥ तैशी उभयता पदवी । शद्बा जाली ॥ ९६ ॥ आतां अविद्या नाहींपणें । नाहीं तये नासणें ॥ आत्मा सिध्दूचि मा कोणें । काय साधावे ॥ ९७ ॥ ऐसा उभय पक्षीं । बोला न लाहोनी नखी ॥ हारपला प्रळयोदकीं । वोघू जैसा ॥ ९८ ॥ आतां बोला भागू कांहीं । असणे जयाच्या ठाईं ॥ अर्थता तरी नाहीं । निपटूनिया ॥ ९९ ॥ वागूल आला ह्मणते । बोलणें जैसे रिते ॥ कां आकाश वोळंबते । तळहातीं ॥ १०० ॥ तैसें निरर्थके जल्पे । होऊनिया सपडपे ॥ शोभती जैशी लेपे । रंगावरी ॥ १०१ ॥ एवं शद्बैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ॥ साचपणे वनें । चित्रीची जैशी ॥ १०२ ॥ या शब्दाचा निमाला । महाप्रळयो हो सरला ॥ अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥ १०३ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते शब्दखंडनं
नाम षष्ठप्रकरणं संपूर्णम् ॥

प्रकरण सातवें

येऱ्हवी तऱ्ही अज्ञाना । जै ज्ञानाची नसे क्षोभना ॥ तैं तरी काना । खालींच दडे ॥ १ ॥ आडस्नूनि अंधारी । खद्योत दीप्ती सिरी । तैसें लटिकेवरी । अनादी होये ॥२॥ जैशी स्वप्ना स्वप्नीं

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

महिमा । तमीं मानू असे तमा ॥ तेवी अज्ञानगरिमा । अज्ञा
नीची ॥३॥ कोल्हेरीचे असिवारु । न येती धारकी धरु ॥ न
लेणा श्रृंगारु । वोडंबरीचे ॥४॥ हे जाणणयाच्या घरी । खोचि
लेही आन न करी ॥ काई चांदिणा उठे लहरी । मृगजळाचं
॥५॥ आणि ज्ञान हें जें ह्मणिजे । तें अज्ञानाचि पा दुजे ॥ ए
लपवूनि दाविजे । एक नव्हे ॥ ६ ॥ असो आतां हा प्रस्तावो
आधीं अज्ञानाचा घांडोळा घेवो ॥ मग तयाच्या साची लाहो
ज्ञानही लटिकें ॥ ७ ॥ या अज्ञान ज्ञानातें । आंगेंचि आ
जिते ॥ तरी जेथें असे तयातें । नेण कां न करी ॥ ८ ॥ अज्ञानें
जेथें असावें । तेणें सर्व नेण होआवें ॥ ऐशी जाती स्वभावें
अज्ञानाची ॥ ९ ॥ तरी शास्त्रमत ऐसें । जे आत्माच अज्ञान
असे ॥ आणि तेणें तो गिवसे । आश्रो जरी ॥ १० ॥ तर
त्रुठिता दुजे । जैं अज्ञान असे बीजे ॥ तै तेंचि आथी हे बुझे
कोण येथें ॥ ११ ॥ अज्ञान तंव आपणयाते । जडपणें नेण
निरुते ॥ आणि प्रमाण प्रमाणातें । होत आहे ॥ १२ ॥
यालागीं जरी अज्ञान । करील आपुलें ज्ञान ॥ हें ह्मणतखें
घेववी मौन । विरोधचि ॥ १३ ॥ आणि जाणती वस्तु येक
तें येणें अज्ञानें कीजे मूर्ख ॥ तैं अज्ञान हे लेख । कवण घर
॥ १४ ॥ अहो आपणयाही पुरता । नेणू न करवे जाणता ।
तयाते अज्ञान ह्मणता । लाजिजे कीं ॥ १५ ॥ आभाळें भा
ग्रासे । तैं आभाळ कोणें प्रकाशे ॥ सुषुप्ती सुषुप्तेया रुसे । त
तेंचि कोणा ॥ १६ ॥ तैसें अज्ञान असे जेथें । तेंच जर

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अज्ञान आते ॥ तरी अज्ञान अज्ञानातें । नेणतां गेलें ॥ १७ ॥
नातरी अज्ञान एक घडे । हें जयास्तव निवडे ॥ तें अज्ञान नव्हे
फुडे । कोण्हे काळीं ॥ १८ ॥ पडळही आथी डोळा । आणि
डोळा नव्हे आंधळा ॥ तरी आथी या पोकळा । बोलिया कीं
॥ १९ ॥ इंधनाच्या आंगीं । खवळलेन आगी ॥ ते न जळे
तरी वाउगी । शक्तीच ते ॥ २० ॥ आंधारु कोंडूनि घरी । घरा
पडसाइ न करी ॥ तैं अंधारु इही अक्षरीं । न ह्मणावा कीं
॥२१॥ वोजावो नेदी जागणें । तिये निदेते नीद कोण ह्मणे ॥
दिवसा नाणी उणे । तैं रात्र कैची ॥ २२ ॥ तैसें आत्मा अज्ञान
असिके । असता तो न मुके ॥ तैं अज्ञानशब्द लटिके । आलेंचि
कीं ॥ २३ ॥ येऱ्हवी तरी आत्मया । माजी अज्ञान असावया ॥
कारण म्हणतां न्याया । चुकी येईल कीं ॥२४॥ अज्ञान तम-
मेळणी । आत्मा प्रकाशाची खाणी ॥ आतां दोहीं मिळणी । एकी
कैशी ॥ २५ ॥ स्वप्न आणि जागरु । आठवू आणि विसरु ॥ हे
युग्मे एका हारु । चालती जरी ॥ २६ ॥ शीता तापा एकवट ।
वाहे वस्तीची वाट ॥ कां तमें बांधिजे मोट । सूर्यरश्मीची
॥ २७ ॥ नाना राती आणि दीवो । येती एकेठायी राहो ॥
तै आत्मा जीवे जीवो । अज्ञानाचेनि ॥ २८ ॥ हें असो मृत्यु
आणी जिणे । हे शोभती काय मेहुणे ॥ तरी आत्मेन असणें ।
अज्ञानेशी ॥ २९ ॥ अहो आत्मेन जे बाधे । तेंचि आत्मेनशीं
नांदे ॥ ऐशी कायशी विरुद्धे । बोलणी इये ॥ ३० ॥ अहो
अंधारपणीची सेज । सांडूनि अंधार तेज ॥ जालें तैं सहज ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

सूर्य निभ्रांतचि ॥ ३१ ॥ दुलांकुडपण सांडिले । आणि आगी-
पण मांडिले ॥ तै तेंचि आगी जालें । इंधन कीं ॥ ३२ ॥ कां
गंगा पावत खेवो । आनपणाचा ठावो ॥ सांडी तैं गंगा हो ।
लाहे पाणी ॥ ३३ ॥ तैसें अज्ञान हें अज्ञान नोहे । तरी आत्मा
असके असो लाहे ॥ येऱ्हवी अज्ञान होये । लागलेंचि ॥ ३४ ॥
आत्मेनशी विरोधी । ह्मणोनी नुरेचि इये संबंधीं ॥ वेगळे तरी
सिद्धि । जायेचिना ॥ ३५ ॥ लवणाची मासोळी । जऱ्ही होय
जिन्हाळी ॥ तरी जळीं ना वेगळी । न जिये जेवी ॥३६॥ जे
अज्ञान येथें नसे । तरीच आत्मा असे ॥ ह्मणोनी बोलणीं वायसे ।
नायकावी कीं ॥ ३७ ॥ दोरी सर्पाभास होये । तो तेणे दोरें
बांधो ये ॥ ना दवडणे न साहे । जयापरी ॥ ३८ ॥
नाना पुनिवेचेनि आंधारें । दिहाभेण राती महुरे ॥ कीं येताचि
सुधाकरें । गिळिजे जेवी ॥ ३९ ॥ तियापरी उभयता । अज्ञान
शब्द गेला वृथा ॥ हा तर्का वांचोन हाता । स्वरूपें नये ॥४०॥
तरी अज्ञानस्वरूप कैसे । काय कार्यानुमेय असे ॥ कीं प्रत्यक्षचि
दिसे । धांडोळू आतां ॥ ४१ ॥ अहो प्रत्यक्षादि प्रमाणीं ।
कीजे जयाची घेणी ॥ तें अज्ञानाची करणी । अज्ञान नव्हे
॥ ४२ ॥ जैशी अंकुरेसी सरळ । वेली दिसे वेल्हाळ ॥ तें बीज
नव्हे केवळ । बीजकार्य होये ॥ ४३ ॥ कां शुभाशुभरूपें ।
स्वप्नदृष्टि आरोपे ॥ तें नीद नव्हे जाउपे । निदेचें कीं ॥ ४४ ॥
नाना चांदू एकु असे । तो व्योमी दुणावला दिसे ॥ तें
तिमिरकार्य जैसें । तिमिर नव्हे पैं ॥ ४५ ॥ तैसें प्रमाता

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रमेय । प्रमाण जें त्रय ।। तें अज्ञानाचें कार्य । अज्ञान नव्हे ।। ४६ ।। ह्मणोनी प्रत्यक्षादिकीं । अज्ञानकार्याविशेखी ।। न घेपे येविषयीं । आनु नाहीं ।। ४७ ।। अज्ञान कार्यपणे । घेइजे तें अज्ञान ह्मणणे ।। तरी घेताही करणे । तयाचेचि ।। ४८ ।। स्वप्नीं दिसे तें स्वप्न । मा देखता काय आन ।। तैसें कार्यचि अज्ञान । केवळ जरी ।। ४९ ।। तरी चाखिला गूळ गूळे । माखिलें काजळ काजळे ।। कां घेपे देपे शूले । हालया शूळें ।। ५० ।। तैसें कारणअभिन्नपणें । कार्यही अज्ञान होणे ।। तें अज्ञानचि मा कोणें । काय घेपे ।। ५१ ।। आतां घेते घेइजे ते ऐसा । विचारु नये मानसा ।। तरी प्रमाण जाला मासा । मृगजळीचा ना ।।५२।। तंव प्रमाणाचिया मापा । न संपडेचि जे बापा ।। तया आणि खपुष्पा । विशेषु काई ।। ५३ ।। मा हे प्रमाणाचि तुरवी । आथी हे कोण प्रस्तावी ।। येणेंही बोले जाणावी । अज्ञान उखी ।। ५४ ।। एवं प्रत्यक्ष अनुमान । यया प्रमाणा भाजन ।। नहोनी जाले अज्ञान । अप्रमाण ।। ५५ ।। ना स्वकार्यातें विये । जें कारणपणा नये ।। मी अज्ञान ऐसें बिहे । मानू साचे ।। ५६ ।। आत्मया स्वप्न दाउ । न सके कीर बहु ।। परी ठाये ठाउ । निदेजो नेणे ।। ५७ ।। हें असो जिये वेळे । आत्मेपणेचि निखिळे ।। आत्मा अज्ञानमेळे । असे तेणें ।। ५८ ।। जैसें न करितां मंथन । काष्टी अवस्थान ।। जैसें कां हुताशन । सामर्थ्याचें ।। ५९ ।। तैसें आत्मा ऐसें नांव । न साहे आत्मयाची बरव ।। तै का अज्ञान हाव । बांधते

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

का ।। ६० ।। काय दीप न लाविजे । तैंचि काजळी फेडिजे ।।
कीं नुगवतीया वाळीजे । रुखाची छाया ।। ६१ ।। नाना
नुठिता देहदशा । कालवूनि लाविजे चिकसा ।। न घडिता
आरसा । उटिजे काई ।। ६२ ।। कां वोहाच्या दुधीं । सायचि
असावी आधीं ।। मग ते फेडु इये बुद्धि । पवाडु कीजे ।। ६३ ।।
तैसें आत्मयाच्या ठाई । जैं आत्मेपणा ठाऊ नाहीं ।। तैं अज्ञान
कांहीं । सारिखे कैसें ।। ६४ ।। म्हणोनी तेव्हांही अज्ञान नसे ।
हें जालेंचि असे आपैसे ।। आतां रिकामे कायसे । नाहीं म्हणो
।। ६५ ।। ऐसाही आत्मा जेव्हां । जैं नातळे भावाभावा ।।
अज्ञान असे तेव्हां । तरी ते ऐसे ।। ६६ ।। जैसें घटाचें नाहीं-
पण । फुटोनी होय शतचूर्ण ।। किंवा सर्वापरी मरण । मारवलें
।। ६७ ।। नाना निदें नीद आली । कीं मूर्छा मूर्छे गेली ।। कीं
अंधारीं पडली । आंधकूपी ।। ६८ ।। कां अभाव अवघडला ।
कां केळीचा गाभा मोडला ।। चोखळा असुडला । आकाशाचा
।। ६९ ।। कां निवटिया सूदले विख । मुकियाचे वांधिले मुख ।।
नाना नुठिता लेख । पुसिले जैसे ।। ७० ।। तैसें अज्ञान आपु-
लिये वेळ । भोगी हेचि टवाळ ।। आतां तरी केवळ । वस्तु
होऊनि असे ।। ७१ ।। देखा वांझ कैशी विये । विरुढती
भाजलीं बिये ।। कीं सूर्य कोणा लाहे । अंधाराते ।। ७२ ।।
तैसा चिन्मात्री चोखडा । भलतैसा अज्ञानाचा झाडा ।। घेतला
तऱ्ही पवाडा । येईल काई ।। ७३ ।। जे सायेचिया चाडे ।
डहुळे दुधाचें भांडें ।। तें दिसे कीं विघडे । तैसें हे पा ।। ७४ ।।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

नाना नीद धरावया हातीं । चेऊनि उठिला झडती ॥ ते लाभे कीं थिती । नासली होये ॥ ७५ ॥ तेवीं पहावया अज्ञान ऐसें । हें आंगीं पिसें कायसे ॥ न पाहतां आपैसे । न पाहणोचि की ॥ ७६ ॥ एवं कोण्हेही परी । अज्ञानभावाची उजरी ॥ न पडेचि नगरी । विचाराचिये ॥ ७७ ॥ अहो कोण्हेही वेळे । आत्मा अथवा वेगळे ॥ विचाराचे डोळे । देखते कां ॥ ७८ ॥ ना निर्धाराचें तोंड न माखे । प्रमाण स्वप्नींही नायके ॥ कीं निरुती हन मुके । अनसाईपणा ॥ ७९ ॥ इतुलियाही मागू । अज्ञानाचा तरी तो मागू ॥ निगे ऐसा वागू । पडतां कां देवा ॥ ८० ॥ अवसेचेनि चंद्रबिंबे । निर्वाळीलिये सभे ॥ कां मांडले जैसे खांबे । शशविषाणाचे ॥ ८१ ॥ नाना गगनौला चिया माळा । वांझेचिया झालिया गळा ॥ घापती तो सोहळा । पाविजेत असे ॥ ८२ ॥ आणूनि कासवीचें तूप । भरु आकाशाचें माप ॥ तरी साचा येती संकल्प । ऐसे ऐसे ॥ ८३ ॥ आह्मी येऊनि जाऊनि पुढती । अज्ञान आणावे निरुती ॥ ते नाहीं तरी किती । वतवतु पा ॥ ८४ ॥ ह्मणोनि अज्ञान अक्षरें । तुमस्न आतां निदसुरे ॥ परी आन एक स्फुरे । इयेविपयीं ॥ ८५ ॥ आपणया ना आणिकाते । देखोनी होय देखते ॥ वस्तु ऐशिया पुरते । नव्हेचि आंगे ॥ ८६ ॥ तरी ते आपणया पुढें । दृश्य पघळे येवढे ॥ आपण करी फुडें । द्रष्टपण ॥८७॥ जेथें आत्मत्वाचें सांकडें । तेथें उठे हे येवढें ॥ आणि उकिले तरी सोकडे । देखत असो ॥ ८८ ॥ न दिसे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जरी अज्ञान । तरी आहे हें नव्हे आन ।। यया दृश्या अनुमान। प्रमाण जाले ।।८९।। नातरी चंद्र एकु असे। तो व्योमीं दुणा- वला दिसे ।। तरी डोळा तिमिर ऐसें । मानू ये की ।। ९० ।। भूमीवेगळी झाडें। पाणी घेती कवणीकडे ।। न दिसती आणि अपाडे । साजीं असती ।। ९१ ।। तरी भरवसेनी सूळे । पाणी घेती हें न ढळे ।। तैसें अज्ञान कळे । दृश्यास्तव ।। ९२ ।। चेइलेया नीद जाय । निद्रिता तंव ठाउवी नव्हे ।। परी स्वप्न दाऊनी आहे । म्हणो ये कीं ।। ९३ ।। म्हणूनि वस्तुमात्रे चोखें । दृश्य जरी येवढें फाकें ।। तेव्हां अज्ञान आथी सुखें। म्हणो ये की ।। ९४ ।। अगा ऐशिया ज्ञानाते । अज्ञान म्हणणे केउते ।। काय दीवो करी तयाते । अंधारु म्हणिपे ।। ९५ ।। अगा चंद्रापासूनि उजळ । जेणें राविले वस्तु धवल।। तयातें काजळ । ह्मणिजेत असे ।। ९६ ।। आगीचें काज पाणी। निफजा जरी आणी ।। अज्ञान इया वाहणी । मानू तरी ते ।। ९७ ।। कळीपूर्ण चंद्रमा । आणवूनि मेळवी आमा ।। तरी ज्ञान हें अज्ञान नामा । पात्र होइजे ।। ९८ ।। वोरसोनी लोभे । विष कां अमृतें दुभे ।। ना दुभे तरी लाभे। विषचि म्हणणे ।। ९९ ।। तैसा जाणणेयाचा वेव्हारु । जेथें माखला समोरु ।। तेथें आणिजे पुरु । अज्ञानाचा ।। १०० ।। तया नांव अज्ञान ऐसें। तरी ज्ञान होआवें तें कैसें ।। येऱ्हवी कांहींच असे। आत्मा काई ।।१०१।। कांहींच जया न होणें । होय तें स्वतां नेणें ।। शून्याची देवांगणे । प्रमाणासी ।।१०२।। असे म्हणावया जोगे। नाचरे कीर आंगे ।। परी नाहीं हे नलगे। जोडावेचि १०३।।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कोण्हाचे असणेनवीण असे । कोण्ही न देखताचि दिसे ॥ हे आथी तरी कायसे । हारतलेपण ॥ १०४ ॥ मिथ्या वादाची कुटी आली । ते निवांताचि साहिली ॥ विशेषाही दिधली । पाठी जेणें ॥ १०५ ॥ जो निमालीही नीद देखे । तो सर्वज्ञ येव्हढा काय चुके ॥ परी दृश्याचिये न ठके । सोइ जो ॥१०६॥ वेदु काय काय न बोले । परी येथें नांवचि नाहीं घेतलें ॥ ऐसें कांहीं जोडलें । नाहीं जेणें ॥ १०७ ॥ सूर्य कोणा न पाहे । परी आत्मा दाविला आहे ॥ गगने व्यापिता ठाये । ऐशी वस्तू ॥ १०८ ॥ देह हाडाची मोळी । मी म्हणोनी पोटाळी ॥ तो अहंकारु गाळी । पदार्थू हा ॥ १०९ ॥ बुद्धि बोध्या सोके । ते येवढी वस्तु चुके ॥ मना संकल्प निके । याहीहूनी ॥ ११० ॥ विषयाचिया वरडी । अखंड घासती तोंडीं ॥ ते इंद्रियें गोडी । न घेपती हे ॥ १११ ॥ परी नाहींपणा सकट । खाऊनी भरलें पोट ॥ ते कोणाही सकट । कां फावेल ॥ ११२ ॥ जो आपणासी नव्हे विखो । तो कोण लाहे देखो ॥ जे वाणी न सके चाखो । आपणापे ॥ ११३ ॥ हें असो नांवें रूपें । पुढारूनि अरूपे ॥ जेथें आलीच वासिपे । अविद्या हे ॥ ११४ ॥ ह्मणोनी आपुलेंचि मुख । पहावयाची भूक ॥ न बाणे मा आणिक । के रिघेल ॥ ११५ ॥ नाडिले जे वादीकोडें । आतुचि बाहेरी खवडे ॥ तैसा निर्णो सुनाथा पडे । केला येथ ॥ ११६ ॥ कां मस्तकांत निर्धारिली । जो छाया उडों पाहे आपुली ॥ तयाची फाकावली । बुद्धि जैशी ॥ ११७ ॥ तैसें दाखवेनी सर्वथा । हे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ते ऐशी व्यवस्था ॥ करी तो चुके ज्ञाता । वस्तूचा जिये ॥ ११८ ॥ आतां सांगिजे ते केउते । शब्दा संसारा नाहीं जेथें ॥ दर्शना बीजे तेथें । जाणीव आणी ॥ ११९ ॥ जयाचेनि बळे । अचक्षुपण आंधळें ॥ फिटोनी वस्तु मिळे । देखणीदशा ॥१२०॥ आपुलेंचि दृश्यपण । उमसो न लाहे आपण ॥ दृष्टत्वा कीर आण । पडली असता ॥१२१॥ कोणा कोण भेटे । दिठी कैचि फुटे ॥ ऐक्यासकट पोटे । आटोनी गेली ॥१२२॥ येवढे- ही सांकडे । जेणें सारूनी येकीकडे ॥ उघडली कवाडे । प्रका- शाचीं ॥१२३॥ दृश्याचिया सृष्टी । दिठीवरी दिठी ॥ उठलिया तळवटी । चिन्मात्रचि ॥१२४॥ दर्शनरिद्धि बहुवसा । चित्तशेपु मातला ऐसा ॥ जे शिळा न पाहे अरिसा । वेघरत्नाचा ॥१२५॥ क्षणक्षणीं नीच नवी । दृश्याची चोख मदवी ॥ दिठीकरवी वेढवी । उदार जे ॥ १२६ ॥ मागिलीये क्षणीचीं आंगें । पारसी ह्मणोनिया वेगें ॥ सांडुनि दृष्टि रिघे । नवीया रुपा ॥ १२७ ॥ तैशीच प्रतिक्षणीं । जाणिवेची लेणी ॥ लेवोनी आणी । जाणतेपणा ॥ १२८ ॥ तया परमात्मपदीचें शेष । ना कांहीं तया सुसास ॥ आणी होय येवढी कास । घातली जेणें ॥ १२९ ॥ सर्वज्ञतेचे परी । चिन्मात्राचे तोंडवरी ॥ परी ते आन घरी । जाणिजेना ॥ १३० ॥ एवं ज्ञानाज्ञानमिठी । तेही फाकतसे दिठी ॥ दृश्यपणे ये भेटी । आपुलीया ॥१३१॥ तै दृश्य मोटकें देखें । आपण स्वयें दृष्टत्वें तोखे । तेचि दिठी- चेनि सुखे । माजी दाटे ॥ १३२ ॥ तव्हा येणें देणें घटे । परी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

ऐक्याचें सूत न तुटे ॥ जेवीं मुखीं मुख वाटे । दर्पणें केलें ॥ १३३ ॥ आंगें आंगावरी पहुडे । चेइला वेगळा न पडे ॥ तया वारुवाचेनि पाडें । घेणें देणें ॥ १३४ ॥ पाणी कल्लोळाचेनि मिसें । आपणापें वेल्हावे जैसें ॥ वस्तु वस्तुत्वें खेळों ये तैसे । सुखे लाहे ॥ १३५ ॥ गुंफी ज्वाळाचिया माळा । लेइलियाही अनळा ॥ भेदाचिया आहाळा । काय पडणें आहे ॥ १३६ ॥ कीं रश्मीचेनि परिवारें । वेढूनि घेतला थोरें ॥ तऱ्ही सूर्यासी दुसरे । बोलों येईल ॥ १३७ ॥ चांदणियाचा गिंवसु । चांदावरी पडलिया बहुवसु ॥ काय केवळपणी त्रासु । देखिजेल ॥ १३८ ॥ दळाचिया सहस्रवरी । फांको आपुलिया परी ॥ परी नाहीं दुसरी । भास कमळीं ॥ १३९ ॥ सहस्रवरी बाहिया । आहाति सहस्रार्जुनाराया ॥ तरी तो काय तिया । एकोत्तरावा ॥ १४० ॥ सौकडाचिया वोजा । पसरो कां बहु पुंजा ॥ परी तांथूवीण दुजा । भाव आहे ॥ १४१ ॥ कोडीवरी शब्दाचा । मेळावा घरीं वाचेचा ॥ मिनला तरी वाचा । मात्र कीं ते ॥ १४२ ॥ तैसे दृश्याचे डाखळे । नाना दृष्टीचे उमाळे ॥ उठती लेखावेगळे । दृष्टत्वींचि ॥ १४३ ॥ गुळाचा बांधा । फुटलिया मोडीचा धांदा ॥ जाला तरी नुसधा । गुळाचि कीं तो ॥ १४४ ॥ तैसें हें दृश्य देखो । कीं बहु होऊनि फांको ॥ परी भेदाचा नव्हे विखो । तेंचि क्षणवूनि ॥ १४५ ॥ तया आत्मयाच्या भाखा । न पडेचि दुसरी रेखा ॥ जरी विश्वा अशेखा । भरलें आहे ॥ १४६ ॥ दुधंधी क्षीरोदकीं । वाने परी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

अनेकी ॥ दिसती तरी तितुकी । सुतें आथी ॥ १४७ ॥ पात-
याची मिठी । नुकालिता दिठी ॥ अवघीयाची सृष्टी । पाविजे
जरी ॥ १४८ ॥ न फुटता बीजकणिका । माजी विस्तारे वटु
असिका ॥ तरी अद्वैतफाका । उपमा आथी ॥ १४९ ॥
मग माते म्या न देखावे । ऐसेही भरे हावे ॥ तरी आंगाचिये
विसवे । सेजेवरी ॥ १५० ॥ पातयाची मिठी । पडिलिया
कीजे दिठी ॥ आपुलियेची पोटी । रिगोनी असणे ॥ १५१ ॥
कां नुदोलिया सुधाकरु । आपणपे भरे सागरु ॥ ना कूर्मी
गिळी विस्तारु । आपेआप ॥ १५२ ॥ आवसेचिये दिवशीं ।
सतरावियें अंशीं ॥ स्वयें जैसें शशी । रिगणे होय ॥ १५३ ॥
तैसें दृश्य जिणतां द्रष्टे । पडिले जैताचिये कुटे ॥ तया नांव
वावटे । आपणपेया ॥ १५४ ॥ सहजे आवघेचि आहे । तरी
कोणा कोण पाहे ॥ ते देखणेचि आहे । स्वरूपनिद्रा ॥१५५॥
नाना न देखणे नको । ह्मणे मीचि माते देखो ॥ तरी आपेआप
विखो । आपैसे असे ॥ १५६ ॥ जे अनादीच दृश्यपणें । अना-
दीचि देखणें ॥ हें आतां काय कोणे । रचु जावे ॥ १५७ ॥
अवकाशेशी गगना । स्पर्शेशी पवना ॥ कीं दीप्तीशी तपना ।
समंधु कीजे ॥ १५८ ॥ विश्वपणे उजिवडे । तरी विश्व देखे
पुढें ॥ ना तें नाहीं तरी तेवढे । नाहींच देखे ॥ १५९ ॥
विश्वाचे असेंनाहीं । विपाये बुडालियाही ॥ तऱ्ही दशा ऐशीही ।
देखताचि असे ॥ १६० ॥ कापुराही आथी चांदिणे । कीं तोचि
न मखे तेणें ॥ तैसें केवळ देखणे । दाये दावों ॥ १६१ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

किंबहुना ऐसें । वस्तु भलतिये दशे ।। देखतचि असे । आपणपयाते ।। १६२ ।। मनोरथांची देशांतरे । मनीं प्रकाशूनि नरे ।। मग तेथें आदरे । हिंडे जैसें ।। १६३ ।। कां दाटला डोळा डोळया । डोळाचि तारा होऊनिया ।। स्फुरे चोख ह्मणौनिया । विस्मो नाहीं ।। १६४ ।। यालागी एके चिद्रूपें । आपणपया आपणपे ।। देखिजे का आरोपे । काय काज ।। १६५ ।। किळेचें पांघरुण । आपजवी रत्ना कोण ।। कीं सोनें ले सोनेपण । जोडजोडू ।। १६६ ।। चंदन सौरभ वेढी । कां सुधा आपणया वाढी ।। कीं गूळ चाखे गोडी । ऐसें आथी हे ।। १६७ ।। कीं उजाळाचे कीळे । कापुरा पुटीं दिधले ।। कीं ताऊनि ऊन केले । आगीतें काई ।। १६८ ।। नाना ते लता । आपुले वेली गुंडाळता ।। घर करी न करितां । जयापरी ।। १६९ ।। कां प्रभेचा उभळा । दीप प्रकाशे संचला ।। तैसा चैतन्ये गिवसिला । चिद्रूप स्फुरे ।। १७० ।। ऐसें आपणया आपण । आपुलें निरीक्षण ।। करावें येणेवीण । करीतूचि असे ।। १७१ ।। ऐसें हें देखणें न देखणें । हें आंधारें चांदिणें ।। मा चंद्रासी उणे । स्फुरते का ।। १७२ ।। म्हणूनि हें न व्हावें । ऐसेंही करूं पावे ।। तरी तैसाचि स्वभावे । आइता असे ।।१७३।। द्रष्टा दृश्य ऐसें । दोनी अळुमाळ दिसे ।। तेंही परस्परानुप्रवेशें । कांहींना कीं ।। १७४ ।। तेथें दृश्य द्रष्टा भरे । द्रष्टेपण दृश्यीं सरे ।। मा दोन्हीं न होऊनि उरे । दोहींचे साच ।। १७५ ।। मग भलतेथ भलतेव्हां । माझारिले दृश्य द्रष्ट भावा ।। आटणी करीत खेवा । येती दोन्ही ।। १७६ ।। कापुरी अग्निप्रवेशु ।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कीं आग्नीं घातला पोतासु ।। ऐसे नव्हे संसरिसु । वेचु झाला ।। १७७ ।। एका एकु वेचला । शून्यबिंदु शून्यें पूशिला ।। द्रष्टादृश्याचा निमाला । तैसें होय ।।१७८।। किंबहुना आपुलिया । प्रतिबिंबा झोंबिनलिया ।। झोंबी सकट आटोनियां । जाइजे जेवीं ।। १७९ ।। तैसें रुसता दृष्टी । द्रष्टा दृश्य भेटी ।। येती तेथें मिठी । दोहींची पडे ।। १८० ।। सिंधू पूर्वापर । न मिळती तंवचि सागर ।। मग एकवट नीर । जैसें होये ।।१८१।। बहु ये हे त्रिपुटी । सहजे हो तया राहटी ।। प्रतिक्षणीं काय ठी । करीतसे ।।१८२।। दोन्ही विशेष गिळी । ना निर्विशिष्टातें उगळी ।। उघडी झापी एकी डोळी । वस्तूची हे ।। १८३ ।। पातया पाते मिळे । कीं द्रष्टत्वें सैंघ पघळे ।। तिये उन्मळितां मावळे । नवलावो हा ।। १८४ ।। द्रष्टा दृश्याच्या ग्रासी । मध्यें लेख विकाशी ।। योग भूमिका ऐशी । आंगी वाजे ।। १८५ ।। उठिला तरंगु बैसे । पुढें अनुही नुमसे ।। ऐसा ठाई जैसें । पाणी होय ।।१८६।। कां नीद सरोनी गेली । जाग्रति नाहीं चेइली ।। तेन्हां होय आपुली । जैशी स्थिति ।। १८७ ।। नाना एका ठाऊनि उठी । अन्यत्र नव्हे पैठी ।। हे गमे तैसिया दृष्टि । दिठी सूता ।। १८८ ।। कां मावळो सरला दीवो । रात्रीचा न करी प्रस्तावो ।। तेणें गगनें हा भावो । चाखाणिला ।। १८९ ।। घेतला श्वासु बुडाला । घापता नाहीं उठिला ।। तैसा दोहीं शिवतला । नव्हे जो अर्थु ।। १९० ।। कीं आघानियाची करणी । [illegible]ची येणी ।। कीरताचि एके क्षणीं । जे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कीं आहे ॥ १९१ ॥ तया सारिखा ठावो । हा निकराचा आत्मभावो ॥ येणें कां पाहे । न पाहो लाभे ॥ १९२ ॥ काय आपुलिये भूमिके । आरसा आपुलिये निके ॥ पाहो न पाहो सके । हें कें आहे ॥ १९३ ॥ समोर पाठीमोरया । मुखे होऊं ये आरसिया ॥ वांचूनि तयाप्रति तया । होआवे कां ॥१९४॥ सर्वांगे देखणा रवी । परी ऐसें घडे केवी ॥ जे उदो अस्तूची चवी । स्वयें घेपे ॥ १९५ ॥ कीं रसु आपणया पिये । कीं तोंड लपवूनि ठाये ॥ हें रसपण नव्हे । तया जैसें ॥ १९६ ॥ तैसें पाहणें न पाहणें । पाहणेंपणेंचि हो नेणे ॥ आणि दोनी हे येणें । स्वयेंचि आसिजे ॥ १९७ ॥ जें पाहणेंचि म्हणूनिया । पाहणें नव्हे आपणया ॥ तें न पाहणें आपसया । हाचि आहे ॥ १९८ ॥ आणि न पाहणें मा कैसें । आपणपें पाहो बैसे ॥ तरी पाहणें हें ऐसें । हाचि पुढती ॥ १९९ ॥ हे दोन्ही परस्परें । नांदती एका हारें ॥ वांधोनी येरयेरे । नाहीं केलें ॥ २०० ॥ पाहणया पाहणें आहे । तरी न पाहणें होंचि नव्हे ॥ म्हणोनी याची सोये । नेणती दोन्ही ॥ २०१ ॥ एवं पाहणें न पाहणें । चोरोमियां असणें ॥ ना पाहे तरी कोणे । काय पाहिलें ॥ २०२ ॥ दिसत्यानें दृश्य भासे । म्हणावेना देखिलें ऐसें ॥ तरी दृश्यास्तव दिसे । ऐसें नाहीं ॥ २०३ ॥ दृश्य कीर दृष्टीसी दिसे । परी साच कीं द्रष्टा असे ॥ आतां माहीं तें कैसें । देखिलें होय ॥ २०४ ॥ मुख दिसो कां दर्पणीं । परी असणें कीं तये मुखपणीं ॥ तरी जाली ते वायाणी । प्रतीती कीं ॥ २०५ ॥ देखतांचि आपणयातें । आलिये निद्रे-

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

चेनि हाते ॥ तया स्वप्ना ऐसें येथें । निहाळिता ॥ २०६ ॥ निद्रिस्त सुखासनीं । वाहिजे अनुवाहणी ॥ तो साचे काय तेसणी । दशा पावे ॥ २०७ ॥ कीं सिसेवीण एकएके । दाविली राज्य करिति रंके ॥ तैशीं तियें सतुके । आथीं काई ॥ २०८ ॥ ते निद्रा जेव्हां नाहीं । तेव्हां जो जैसा जिये ठाईं ॥ तैसाचि स्वप्नीं कांहीं । न दाविजेचि कीं ॥ २०९ ॥ तान्हेलिया मृगतृष्णा । न भेटलिया सिणु जेसणा ॥ मा भेटलिया कोणा । काय भेटले ॥ २१० ॥ कीं साउलियेचेनि व्याजे । मेळविलें जेणें दुजें ॥ तयाचें करणें वांझे । जालें जैसें ॥ २११ ॥ तैसें दृश्य करूनिया । तें द्रष्टयातें द्रष्टया ॥ दाऊनि धाडिलें वाया । दाविलेपणही ॥ २१२ ॥ जें दृश्य द्रष्टाचि आहे । मा दावणें कां साहे ॥ न दाविजे तरी नोहे । तया तो कांहीं ॥ २१३ ॥ आरिसा पा न पाहे । तरी मुखाचि वाया जाये ॥ तेणेंवीण आहे । आपणपें कीं ॥ २१४ ॥ तैसें आत्मयाते आत्मया । न दावीचि पै माया ॥ तरी आत्मा वावो कीं वांया । तेंचि तें कीं ना ॥२१५॥ म्हणोनि आपणापे द्रष्टा । न करितां असे पैठा ॥ आतां जालाचि दिठा । कां करावा ॥ २१६ ॥ नाना मागुते दाविलें । तरी पुनरुक्त तेंचि झालें ॥ येणेंही बोले गेले । दावणें वृथा ॥ २१७ ॥ दोरा सर्पाभासा । साचपणें दोरु कां जैसा ॥ द्रष्टा दृश्या तैसा । द्रष्टा साचु ॥ २१८ ॥ दर्पणे आणि मुखे । मुख दिसें हें न चुके ॥ परी मुखी मुख सतुके । दर्पणीं नाहीं ॥ २१९ ॥ तैसें द्रष्टा दृश्या दोहीं । साच कीं देखता ठावो ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

म्हणोनी दृश्य तें वावो । देखिलें जरी ॥ २२० ॥ वावो कीर होये । तऱ्हीं दिसत तंव आहे ॥ येणे बोले होये । आथी ऐसे ॥ २२१ ॥ तरी आन आनातें । देखोनी होय देखतें ॥ तरी मानु येते । देखिलें ऐसें ॥ २२२ ॥ येथें देखोनी कां न देखोनी । ऐक्य का नाना होऊनि ॥ परी हा येणें वांचूनि । देखणें असे ॥ २२३ ॥ आरशानें हो कां दाविलें । तऱ्ही मुखचि मुखें देखिलें ॥ तो न दावी तऱ्ही संचलें । मुखचि मुखीं ॥ २२४ ॥ तैसें दाविते नाहीं । तरी हाचि ययाच्या ठाईं ॥ ना दावी तऱ्हीही । हाचि यया ॥ २२५ ॥ जाग्रति दाविला । कां निदा हारविला ॥ परी जैसा येकिला । पुरुष पुरुषी ॥ २२६ ॥ का रायातें तूं रावो । ऐसा दाविजे प्रत्ययो ॥ तऱ्ही ठायेंठावो । राजाचि असे ॥ २२७ ॥ नातरी रायपण राया । नाणिजे कीं प्रत्यया ॥ तऱ्ही कांहीं उणें तया । माजी असे ॥ २२८ ॥ तैसें दावितां न दावितां । हा यया परौता ॥ चढेना तुटे आइता । असतचि असे ॥ २२९ ॥ तरि कां निमित्य पिसे । हा यया दाऊं बैसे ॥ देखते नाहीं तैं आरिसे । देखावे कोणे ॥ २३० ॥ दीपु दावीतयाते रुची । कीं तेणेंचि सिद्धी दीपाची ॥ तैशी सत्ता निमित्ताची । येणें साच ॥ २३१ ॥ वन्हीते वन्ही शिखा । प्रकाशी कीर देखा ॥ परी वन्ही नहूनि लेखा । येईल कांई ॥ २३२ ॥ आणि निमित्त जें बोलावें । तें येणें दिसोनि दावावे ॥ देखिलें तऱ्हीं स्वभावें । दृश्यही हा ॥२३३॥ म्हणोनी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

स्वयंप्रकाशा यथा । आपणपें देखावया ॥ निमित्त हा वांचोनियां । नाहींच मा ॥ २३४ ॥ भलतेन विन्यासें । दिसत तेणोंचि दिसे ॥ हा वांचूनि नसे । येथें कांहीं ॥ २३५ ॥ लेणें आणि भांगारें । भांगारचि एक स्फुरे ॥ कां जेथें दुसरें । नाहींच म्हणौनी ॥ २३६ ॥ जळतरंगीं दोन्हीं । जळावांचूनि नाहीं ॥ म्हणौनी आन कांहीं । नाहीं ना नोहे ॥ २३७ ॥ हो कां घ्राणानुमेयो । येऊ कां हातीं घेवो ॥ लाहो कां दिठी पाहो । भलतैसें ॥ २३८ ॥ परी कापुराच्या ठाईं । कापुरावांचूनि नाहीं ॥ तैसा रीति भलतेययाही । हाचि यथा ॥ २३९ ॥ आतां दृश्यपणें दिसो । कां द्रष्टा होऊनि असो ॥ परी हा वांचूनि अतिसो । नाहीं येथें ॥ २४० ॥ गंगा गंगापणें वाहो । कीं सिंधु होऊनि राहो ॥ परी पाणीपण नवलावो । न देखो कीं ॥ २४१ ॥ थिजावें कीं विघरावें । हें अप्रयोजक आघवें ॥ घृतपण नव्हे । अनारिसें ॥ २४२ ॥ ज्वाळा आणि वन्ही । न लेखिजति दोनी ॥ वन्हीमात्र म्हणोनी । आन नव्हे कीं ॥२४३॥ तैसें दृश्य कां द्रष्टा । या दोन्ही दशा वांझटा ॥ पाहता एकीकाष्टा । स्फूर्तिमात्र तो ॥२४४॥ इये स्फूर्तीकडोनी । नाहीं स्फूर्तिमात्र वांचोनी ॥ तरी काय देखोनी । देखतु असे ॥ २४५ ॥ पुढें फरकेना दिसते । ना मागें डोकावी देखते ॥ पाहतां येणें यथाते । स्फुरद्रूपाचि ॥ २४६ ॥ कल्लोळी जळीं घातलें । सोनेंन सोनें पांघुरलें ॥ दिठीचे पाय गुंतले । दिठीसीचि ॥ २४७ ॥ श्रुतीसी मेळविली श्रुति । दृतीसी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मेळविली द्युती ॥ कां तृप्तीसी तृप्ती । वोगरिली ॥ २४८ ॥ गूळ गुळें परिवडिला । मेरु सुवर्णें मढिला ॥ कां ज्वाळा गुंडाळिला । अनळु जैसा ॥ २४९ ॥ हें वहु काय बोलिजे । कीं नभ नभाचिये रिगे सेजे ॥ मग कोणे निदिजे । जागे कोणे ॥ २५० ॥ हा येणे पाहिला ऐसा । कांहीं न पाहिला जैसा ॥ आणि न पाहताही आपैसा । पाहणेंचि हा ॥२५१॥ येथें बोलणें न साहे । जाणणें न समाये ॥ अनुभव न लाहे । आंगीं सिरौ ॥ २५२ ॥ म्हणोनी ययाते येणें । येपरीचें पाहणें ॥ पाहतां कांहीं कोणे । पाहिलें नाहीं ॥२५३॥ किंबहुना ऐसें । आत्मेन आत्मा प्रकाशे ॥ न चेतुचि चेऊ वैसे । तयासी तो ॥ २५४ ॥ स्वये दर्शनाचिया सवा । अवघीयाचि जातसे फावा ॥ परी निजात्मभावा । न मोडताही ॥२५५॥ न पाहतां आरिसा असो पाहे । तरी तोंचि पाहणे होये ॥ आणि पाहणेन तरी ते जाये । न पाहणे पाहणें ॥ २५६ ॥ भलतैसा फाके । परी येकपणा न मुके ॥ नाना संकोच तरी असिके । हाचि आथी ॥ २५७ ॥ सूर्याचिया हाता । अंधकारू नये सर्वथा ॥ मा प्रकाशाची कथा । आइकता का ॥ २५८ ॥ अंधारु कां उजिवडु । हा येकला येकवडु ॥ जैसा कां मार्तंडु । भलतेथें ॥ २५९ ॥ तैसा आवडतिये भूमिके । आरुढलीयाही कौतुकें ॥ परी ययाते हा न चुके । हाचि ऐसा ॥ २६० ॥ सिंधूची शीव न मोडे । पाणीपणा सळु न मोडे ॥ परी मोडतु कां गाडे । तरंगाची ॥ २६१ ॥ रश्मी सूर्याची आथी । परी बिंबा बाहेरी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

जाती ॥ म्हणोनी बोधसंपत्ति । उपमा नोहे ॥ २६२ ॥
आणि पल्हेचा दोडा । न पडता तढा ॥ जग तंव
कापडा । न भरेचि की ॥ २६३ ॥ सोनयाचा रवा ।
खेपणाचा ठेवा ॥ आवघेयाची अवयवा । लेणे नव्हे ॥२६४॥
न फेडिता आडवावो । दिगंतोनी दिगंता जावो ॥ नये
मा पावो । उपमा काई ॥ २६५ ॥ म्हणोनी इये आत्म-
लीळे । नाहीं आन कांटाळे ॥ आतां ययाचिये तुळे ।
हाचि यया ॥ २६६ ॥ स्वप्रकाशाच्या घासी । जेविता बहु
वेगेशीं ॥ वेचेना परी कुशी । वाखही न पडे ॥ २६७ ॥ ऐसा
निरुपमा परी । आपुलिये विलासवरी ॥ आत्मा राणीव करी ।
आपुले ठाई ॥ २६८ ॥ तयाते म्हाणिपे अज्ञान । तरी न्याया
भरलें रान ॥ आतां म्हणे तयाचें वचन । उपसावो हो आम्ही
॥ २६९ ॥ प्रकाशितें अज्ञान । ऐसें म्हणणें हन ॥ तरी निधि
दावितें अंजन । न म्हणिजे काई ॥ २७० ॥ सुवर्णगौर-
आंबिका । न म्हणिजे काय काळिका ॥ तैसा आत्मप्रकाशका ।
अज्ञानवादु ॥ २७१ ॥ येऱ्हवी शिवोनी पृथ्वीवरी । तत्वाच्या
वानेपरी ॥ जयाच्या रश्मीकरी । उजाळा येती ॥ २७२ ॥
जेणें ज्ञान सज्ञान होये । दङ्मात्र दृष्टीते विये ॥ प्रकाशाचा
दिवो पाहे । प्रकाशासी ॥ २७३ ॥ तें कोणे निकृष्टे । दाविलें
अज्ञानाचेनि वोटे ॥ ना तमे सूर्या मोटे । बांधितां निके
॥ २७४ ॥ अपूर्वे ज्ञानाक्षरीं । वसता अज्ञानाची थोरी ॥
शब्दार्थाची उजरी । अपूर्व नव्हे कीं ॥ २७५ ॥ लाखेचे

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

मांदुसे । आगीचें ठेवणें कायसें ॥ आतुबाहेरी सरिसे । करुनि घाली ॥ २७६ ॥ म्हणोनी जग ज्ञाने स्फिते । बोलता अज्ञान-वादाते ॥ विखुरली होती आते । वाचेचिये ॥ २७७ ॥ अखरी तव गोवधु । पुढारा अनृतबाधु ॥ मा कैसा अज्ञान-वादु । कीजे ज्ञानी ॥२७८॥ आणि अज्ञान ह्मणणे । स्फुरतसे अर्थपणें ॥ आतां हेंचि ज्ञान कोणे । मानिजेना ॥ २७९ ॥ असो हें आत्मराजे । आपणापे जेणें तेजें ॥ आपणाचि देखिजे । बहुयेपरी ॥ २८० ॥ निर्वचिता जे झावळे । तेंचि कीं लाहे डोळे ॥ डोळ्यापुढें मिळे । तेंचि तया ॥२८१॥ ऐसें जगज्ञान जें आहे । तें अज्ञान म्हणे भी विये ॥ येणें अनुमानें हो पाहे । आथी ऐसें ॥ २८२ ॥ तंव अज्ञान विशुद्धी नाहीं । हें जगोंचि ठेविलें ठाई ॥ जे धर्म धर्मित्व केही । ज्ञानाज्ञान असे ॥२८३॥ काजळा मोती विये । राखोंडिया दिपु जिये ॥ तरी ज्ञान धर्म होये । अज्ञानाचा ॥ २८४ ॥ चंद्रमा निगती ज्वाळा । आकाश आते शिळा ॥ तरी अज्ञान उजळा । ज्ञानाते वमी ॥ २८५ ॥ क्षीराब्धिकाळकूट । हें एके परीचें विकट ॥ काळकूटी चोखट । सुधा कैची ॥ २८६ ॥ ना ज्ञानीं अज्ञान जालें । तें होतांचि अज्ञान गेलें ॥ पुढती ज्ञान एकलें । अज्ञान नाहीं ॥ २८७ ॥ ह्मणोनी सूर्य सूर्याचियेवढा । चंद्र चंद्राचि सांगडा ॥ ना दीपा-चिया पडिपाडा । ऐसा दीपू ॥ २८८ ॥ प्रकाशू तो प्रकाशकी । यासी न वंचे घेई चुकी ॥ म्हणोनि जग असिकीं । वस्तुप्रभा ॥ २८९ ॥ विभाति यस्य भासा । सर्वमिदं हा ऐसा ॥ श्रुति

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

काय वायसा । ढेकर देती ॥ २९० ॥ यालागीं वस्तुप्रभा । वस्तूचि पावे शोभा ॥ जातसे लाभा । वस्तूसिचि ॥ २९१ ॥ वांचूनि वस्तु इया । आपणापे प्रकाशावया ॥ अज्ञान हेतु वाया । अवघेंची ॥ २९२ ॥ ह्मणोनी अज्ञान सद्भावो । कोणेपरी न लाहो ॥ अज्ञान कीर वावो । पाहो ठेलियाही ॥ २९३ ॥ परी तमाचा विसुरा । न जोडेचि दिनकरा ॥ रात्रीचिया घरा । गेलियाही ॥ २९४ ॥ कां नीद खोळे भरितां । जागणेंही नये हाता ॥ येकलिया टळटळिता । ठाकिजे जेवीं ॥ २९५ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते अज्ञानखंडनं नाम सप्तमप्रकरणं संपूर्णम्

प्रकरण आठवें

तैसें आम्हुचेनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे ॥ आह्मांलागीं गुरुदेवें । आह्मीच केलों ॥ १ ॥ परी आह्मा आह्मी आहों । तें कैसें पाहो जावों ॥ तंव काय कीजे ठावो । लाजिजे ऐसा ॥ २ ॥ हा ठावोवरी गुरुरायें । नांदविलों उवायें ॥ जे आह्मी न समायें । आह्मामाजी ॥ ३ ॥ अहो आत्मपणीं न संटों । स्वसंविती न घसवटो ॥ आंगीं लागलें न फुटो । कैवल्यही ॥ ४ ॥ आम्हुची करवे गोठी । ते जालीचि नाहीं वाक्सृष्टी ॥ आम्हुतें देखो दिठी । ते दिठीच नव्हे ॥ ५ ॥

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

आम्हुतें करूनि विखो । भोगूं शके पारखो ॥ तैं आम्हुतें न

देखो । आम्हीपणा ॥ ६ ॥ प्रकटो लपो न लाहो । यथें नाहीं नवलावो ॥ परी कैसेनीही विपावो । असणेयाचा ॥ ७ ॥ किंबहुना श्रीनिवृत्ति । ठेविलो असो जये स्थिती ॥ ते काय देऊं हातीं । वाचेचिया ॥ ८ ॥ तेथें समोर व्हावया । अज्ञानाचा पाडु कासया ॥ केउते मेलिया माया । होऊं पाहिजे ॥ ९ ॥ अज्ञानाचा प्रवर्तु । नाहीं जया गांवाआतु ॥ तेथें ज्ञानाची तऱ्ही मातु । कोण जाणे ॥ १० ॥ रात्री म्हणोनी दीवे । पडती कीं लावावें ॥ वांचूनि सूर्यासवे । सिणणे होये ॥ ११ ॥ ह्मणोनी अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही ॥ आतां निमिषोन्मेषा दोही । ठेली वाट ॥ १२ ॥ येऱ्हवी तऱ्ही ज्ञान अज्ञाने । दोहींचीं अभिधानें ॥ अर्थाचेनि आनाने । विप्लाविली ॥ १३ ॥ जैशीं दंपत्तें परस्परें । तोडूनि पालिटिलीं शीरें ॥ तेथें पालटु ना पण सरे । दोहींचें जिणें ॥ १४ ॥ कां पाठीं लाविला होये । तो दीपूचि वांया जाये ॥ दिठी आंधारें पाहे । तें तेंचि वृथा ॥ १५ ॥ तैसें निपटूनि जें नेणिजे । तें अज्ञान शब्दें बोलिजे ॥ आतां सर्वेही जेणे सुजे । तें अज्ञान कैसें ॥ १६ ॥ ऐसें ज्ञान अज्ञान आलें । अज्ञान ज्ञानें गेलें ॥ हे दोन्ही वांझौले । दोनी झाली ॥ १७ ॥ आणि जाणे तोचि नेणे । नेणे तोचि जाणे ॥ आतां के असणे जिणे । ज्ञाना अज्ञाना ॥ १८ ॥ एवं ज्ञानाज्ञान दोन्ही ॥ पोटीं सूनि अहनी क्ष उदेला चिद्गगनीं ॥ चिदादित्यु हा ॥ १९ ॥

इति श्रीसिद्धानुवादे श्रीमदनुभवामृते ज्ञानखंडनं नाम

अष्टमप्रकरणं संपूर्णम्

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

प्रकरण नववें

आतां अमोद सुनास जाले । श्रुतीस श्रवण रिघाले ॥ आरिसे उठिले । लोचनेसी ॥१॥ आपुलेनि समीरपणे । वेल्हावती विंजणें ॥ कीं माथेची चापेपणे । वहकताती ॥२॥ जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ॥ चकोरेचि जैसें । चंद्रमा जाली ॥३॥ फुलेंचि जालीं भ्रमर । तरुणीच जाले नर ॥ जालें आपुलें शेजार । निद्राळूचि ॥ ४ ॥ दिठीवियाचा रवा । नागरु इथ ठेवा ॥ घडिला कां कोरिवा । परी जैसा ॥ ५ ॥ तैसें भोग्य आणि भोक्ता । दिसे आणि देखता ॥ हें सरलें अद्वैता । अफुटामाजी ॥ ६ ॥ सेवतेपणा बाहेरी । न निगताचि परी ॥ पाती सहस्रवरी । उपलविजे ॥ ७ ॥ तैसें नवानवा अनुभवी । वाजतां वाधावी ॥ आक्रियेच्या गांवीं । नेणिजे ते ॥ ८ ॥ म्हणूनि विषयाचेनि नांवें । म्लानि इंद्रियांचे थवे ॥ सैंघ धेवें धावें । समोरही ॥ ९ ॥ परी आरिसा सिवेसिवे । तव दिठीसी दिठी फावे ॥ तैसें जाले धांवे । वृत्तिचिया ॥ १० ॥ नाग मुदी कंकण । त्रिलिंगीं भेदली खूण ॥ घेता तरी सुवर्ण । घेइजे कीं ॥ ११ ॥ वेंचूनि आणू कल्लोळ । म्हणोनी घापे करतळ ॥ तेथें तरी निखळ । पाणीच फावे ॥ १२ ॥ हातापाशीं स्पर्शु । डोळ्यापाशीं रूपसु ॥ जीभेपाशी मिठांशु । कोण्ही एकु ॥ १३ ॥ तऱ्ही परिमळापरौते । मिरवणें नाहीं कापुराते ॥ तैसें वहुतापरी स्फुरते । तेचि स्फुरे ॥ १४ ॥ म्हणोनी शब्दादी

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

पदार्थं । श्रोत्रादिकांचे हाते ॥ घ्यावया जेथें । उजू होती ॥ १५ ॥ तेथें संबंधु होय न होये । तंव इंद्रियांचें तें नोहे ॥ मग असताचि आहे । संबंधू ना ॥ १६ ॥ जियें पेरीं दिसती उसी । तियें लाभती कीं रसीं ॥ कांती जेवी शशी । पुनवे-चिया ॥ १७ ॥ पडिलें चांदावरी चांदिणें । समुद्रीं जालें वरखणें ॥ विषया करणें । भेटती तैशी ॥१८॥ ह्मणोनी तोंडा-आड पडे । तेही वाचा वावडे ॥ परी समाधी न मोडे । मौन-मुद्रेची ॥ १९ ॥ व्यापाराचे गाडे । मोडताही अपाडे ॥ अक्रियेचें न मोडे । पाऊल केंही ॥ २० ॥ पसरूनि वृत्तीची बावे । दिठी रुपातें दे खेंवे ॥ परी साचाचेनि नांवें । कांहींच नलगे ॥ २१ ॥ तमातें घ्यावया । उचलूनि सहस्र बाहिया ॥ शेवटीं रवी यया । हाचि जैसा ॥ २२ ॥ स्वप्नीचिया विलासा । भेटइन या आशा ॥ उठिला तंव जैसा । तोंचि मा तो ॥२३॥ तैसा उदैलियानि विषये । ज्ञानी विषयी हो लाहे ॥ तंव दोन्ही न होनी होये । काय नेणो ॥ २४ ॥ चंद्र वेंचूं गेला चांदिणें । तंव वेंचिलें काय कोणें ॥ विऊनि वांझे स्मरणें । होती जैशीं ॥ २५ ॥ प्रत्यहारादि आंगीं । योगें आंग टेकिलें योगी ॥ तों जाला ये मार्गीं । दिहाचा चांदु ॥ २६ ॥ येथें प्रवृत्ति बहुडे जिणे । अप्रवृत्तिसी वाधावणे ॥ आतां प्रत्यङ्-मुखपणे । प्रचारु दिसे ॥ २७ ॥ द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण ॥ भेदु तंव तंव दुण । अभेदासी ॥ २८ ॥ कैवल्याही चढावा । करित विषयसेवा ॥ जाला भृत्यु भज्य

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

कालोवा। भक्तीच्या घरीं ॥ २९ ॥ घरामाजी पाये। चालता मार्गूही तोचि होये ॥ ना बैसे तऱ्ही आहे। पावणेंची ॥ ३० ॥ तैसें भलतें करितां। येथें पाविजे कांहीं आतां ॥ ऐसें नाहीं न करितां। ठाकिजेना ॥ ३१ ॥ आठवू आणि विसरू। तयातेंही घेउ नेदी पसरु ॥ दशेचा व्यवहारु। असाधारणु ॥ ३२ ॥ जाली स्वेच्छाची विधि। स्वैर जाली समाधी ॥ दशे इये मोक्षरिद्धि। बैसो घापे ॥ ३३ ॥ जाला देवोचि भक्तु। ठावोचि जाला पंथू ॥ होऊनि ठेला येकांतु। विश्वचि हे ॥ ३४ ॥ भलतेउतेन देवें। भलतेन भक्त होआवे ॥ बैसला तेथें राणिवे। अकर्मू हो ॥ ३५ ॥ देवाचिया दाटणी। देऊळा जाली आटणी ॥ देशकालादि वाहणी। येइचिना ॥ ३६ ॥ देवी देवोचि न माये। मा देवी कें अन्वयो आहे ॥ तेथें परिवारु बहुये। उघडता कीं ॥ ३७ ॥ ऐसाही स्वामीभृत्युसमंधा। लागी उठली श्रद्धा ॥ ते देवोचि नुसधा। कामविजे ॥ ३८ ॥ अवघीयाचि उपचारा। जपध्यान निर्धारा ॥ नाहीं आन संसारा। देवेवांचुनी ॥ ३९ ॥ आतां देवातेंचि देवें। देववरी भजावें ॥ अर्पणाचेनि नांवें। भलतिया ॥ ४० ॥ देव देऊळ परिवारु। कीजे कोरूनि डोंगरु ॥ तैसा भक्तीचा वेव्हारु। कां न व्हावा ॥ ४१ ॥ पाहे पा अवघेया। रूखारूखचि यया ॥ परी दुसरा नाहीं तया। विस्तारु नेणें ॥ ४२ ॥ अहो भ्रुगी भ्रुग जैसें। घेतां न घेतां नवल नसे ॥ केलें देवपण तैसें। दोहींपरी ॥ ४३ ॥ अखताचि देवता।

CC-0. Jangamwadi Math Collection. Digitized by eGangotri

